
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

किंमत रुपये १५

जुलै २००८






# सप्तपदीचे झाले सार्थक



आपण विवाहवेदीवर सप्तपदीद्वारे विवाहोत्तर आयुष्य एकमेकांच्या जोडीने, एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होऊन घालवायचे असा संकल्प घेतो.

आपल्या विवाहाला पंचवीस वर्षे झाली असतील तर आपण या लेखस्पर्धेत भाग घेऊन मेहता मराठी ग्रंथजगतच्या दिवाळी अंकात झळकू शकता.

आपल्या पतीबद्दल वा पत्नीबद्दल आपण लिहायचे आहे.

दोघांचे स्वभाव, त्यातील वेगळेपण, सासर-माहेरच्या जीवनशैलीतला फरक, असे असूनही आपल्या पतीने / पत्नीने एकमेकांशी समरस होण्यासाठी केलेले परिश्रम, परस्परांना दिलेला मानसिक आधार, मुलाबाळांचे संगोपन, आर्थिक अडीअडचणीतून काढलेला मार्ग, आपत्तीच्या प्रसंगी दिलेले बळ...

आपण त्याबद्दल मोकळेपणाने लिहा.

**शब्द मर्यादा - १००० शब्द.**

**मुदत १ ऑगस्ट २००८**

**पहिल्या तीन लेखांना**

**प्रत्येकी ५००/- रुपयांचे पुरस्कार पुस्तकरूपाने.**

लेख पाठवण्याचा पत्ता

**संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत, मेहता पब्लिशिंग हाऊस**

**१९४१, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**

◆ जुलै २००८
◆ वर्ष आठवे
◆ अंक सातवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

## — अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ११ |
| **पुस्तक परिचय** | |
| **काळाकभिन्न** : स्वाती चांदोरकर | ५२ |
| **रंगांधळा** : रत्नाकर मतकरी | ६० |
| **मानसी** : छाया महाजन | ६८ |
| **मुलाखत** : उर्वशी बुटालिया | ७४ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ८० |
| **पुरस्कार** | ८५ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९५ |
| **श्रद्धांजली** | १०० |
| **बालनगरी** | १०२ |

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - info@mehtapublishinghouse.com**
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षाची ३५०रु. पाच वर्षाची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*




## कथाकथनाचे पुनरुज्जीवन

कथाकथनाद्वारे मनोरंजन आणि प्रबोधन हे मानवी संस्कृतीच्या आरंभकाळापासून होत आलेले आहे आणि मुलांवर संस्कार करण्यासाठी तसेच व्यावहारिक ज्ञान देण्यासाठी कथाकथनाचा वापर हा पिढ्यानपिढ्या चालू आहे. पूर्वी लेखनाची वा मुद्रणाची साधने उपलब्ध नव्हती. तेव्हा आपल्या इतिहासाचा आणि अनुभवाचा वारसा पुढच्या पिढ्यांना देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे कथाकथन हाच होता. लिपीचा शोध लागला, कागदाचा शोध लागला, मुद्रणाचा शोध लागला, पुस्तकांची निर्मिती होऊ लागली, पुढे संदेशवाहनाचे रेडिओ, चित्रपट, टीव्ही वगैरे पर्याय उपलब्ध झाले. मात्र त्यामुळे कथाकथनाचे महत्त्व कमी होत गेले असे नाही. आजच्या काळातही कथाकथनाचे आकर्षण, उपयुक्तता आणि महत्त्व अबाधित आहे. वृत्तपत्रे असोत किंवा दूरचित्रवाणीवरच्या बातम्या असोत, त्यांना 'स्टोरी' असेच म्हणतात आणि 'स्टोरी' म्हणून त्या उत्कंठावर्धक शैलीत सादर केल्या जातात. अमेरिकेत तर बातम्या वाचनीय करण्यासाठी वार्ताहरांना कथालेखनाचे तंत्र शिकवण्यावर भर देण्यात येतो.

सानेगुरुजी कथामाला गेली ५० वर्षे कथाकथनाचे कार्यक्रम शाळाशाळांतून होत राहावेत यासाठी प्रयत्नशील आहे. कथाकथन कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी मळेकर गुरुजींनी एक ॲकॅडमीही चालवली होती. बालकुमार साहित्य संमेलनात कथाकथनाचे कार्यक्रमही होतात. परंतु आज नावाजण्यासारखे कथाकथनकार फारच दुर्मिळ आहेत. मुलांना आकर्षणपणे गोष्टी सांगणाऱ्यांची वानवा आहे. शाळाशाळांमध्ये शिक्षक खूप आहेत; पण गोष्टी सांगण्यात सिद्धहस्त असणारे वा ते तंत्र आत्मसात केलेले शिक्षक कमी आहेत. बालवाड्या, अंगणवाड्या यात तर लहान मुलांना गोष्टी सांगूनच ज्ञान द्यावे लागते. त्यासाठी कॅसेट्स, डीव्हीडी वगैरे मुद्दाम तयार केल्या जात आहेत. परंतु चांगले कथाकथनकार त्यामानाने फारसे तयार होत नाहीत, असे दुर्दैवाने मान्य करावे लागते. रामायण-महाभारत-भागवत वगैरे कथा सांगणाऱ्यांची काही घराणी

एकेकाळी भारतात होती. कीर्तनकारांचीही परंपरा होती. लोककलाकारांमध्येही गोंधळी, पिंगळ्या वगैरे गावोगाव हिंडत. दंतकथा, लोककथा, लोकगीते, पंचतंत्र, हितोपदेशातील कथा, ऐतिहासिक कथा, चातुर्यकथा... यांचा मोठाच खजिना आपल्याकडे आहे.

कथाकथनाला अमेरिकेत कळसूत्री बाहुल्या, मुखवटे, ध्वनिमुद्रित आवाज वगैरेंची जोड देऊन अधिक श्रवणीय आणि प्रेक्षणीय बनवले जाते.

इंग्लंडमध्येही कथाकथनाचे पुनरुज्जीवन व्हावे या दिशेने पावले टाकली जात आहेत; आणि या पुनरुज्जीवनामध्ये एका भारतीय महिलेचा पुढाकार आहे ही आपल्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे.

मूळ हैद्राबादच्या डॉ. वायू नायडू यांनी १९९४ मध्ये इंग्लंडमधील लीड्स युनिव्हर्सिटीकडून 'कथाकथना'मध्ये डॉक्टरेट मिळवली. प्रा. मीनाक्षी मुखर्जी आणि प्रा. राजन हर्षे (सध्या अलाहाबाद विद्यापीठाचे कुलगुरू) यांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले; आणि कथाकथनकार म्हणून स्वत:ची स्वतंत्र प्रतिमा तयार करण्याची प्रेरणा त्यांनी जागवली. कथाकथनामध्ये लोकांशी संवाद साधता येतो, दुराव्याच्या भिंती जमीनदोस्त करता येतात, रूढीपरंपरांना आव्हान देता येते आणि जीवनाचे वेगवेगळे तुकडे गोळा करून त्यांना एकसंध परिपूर्ण आकार देता येतो अशी त्यांची खात्री पटली. कथाकथनाचे कार्यक्रम त्या वेगवेगळ्या ठिकाणी करतात. त्यासाठी त्यांनी आपले पती क्रिस बॅनफील्ड यांच्या सहकार्याने वायू नायडू कंपनी इ. स. २००१ मध्ये सुरू केली. या संस्थेतर्फे फिरत्या नाटक संस्थेप्रमाणे वेगवेगळ्या ठिकाणी प्रयोग करण्याची संधी त्यांना मिळते. कँटरबरी युनिव्हर्सिटी ऑफ केन्ट या विद्यापीठाच्या मानव्य संशोधन केंद्राने तीन वर्षांसाठी पोस्ट डॉक्टोरल ग्रँटही त्यांना दिली आहे. कथाकथनकला ही सर्जनशील सादरीकरणासाठी इंटरडिसिप्लिनरी ट्रान्स-कल्चरल उपक्रमांचा वापर कशा प्रकारे करू शकेल यावर संशोधन करण्यासाठी हे अनुदान आहे.

कथाकथन ही अगदी सोपी गोष्ट आहे; कोणीही कथा सांगू शकते असा सर्वसामान्यांचा समज असतो. हा एक कौशल्यपूर्ण कलाप्रकार आहे हे त्यांच्या ध्यानातच येत नाही. मुलांना जमवून काहीतरी सांगणे इतके हे साधे प्रकरण नाही. आपल्या मानसिक आणि बौद्धिक आकलनाशी कथांमधील तपशील हे संवादी-विसंवादी प्रतिक्रिया निर्माण करून आपल्या आवडीनिवडीवर आणि मूल्यप्रणालीवर प्रभाव टाकत असतात. कथाकथनाद्वारे वेगवेगळे सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक संदेश कळत-नकळत श्रोत्यांना मिळत असतात. संघर्षांनी आणि समस्यांची व्यावहारिक उत्तरे सुचवणे, त्याकडे पाहण्याची सम्यक्, समंजस दृष्टी मिळणे, घरगुती हिंसाचाराबाबत जाणीवजागृती होणे, अडल्यानडल्याच्या मदतीची प्रेरणा मिळणे, आपत्तीच्या वेळी एकमेकांना मदत करण्याची भावना प्रबळ होणे, निसर्गातील विविध घटकांबद्दल

जिव्हाळा वाटणे वगैरे भाव आणि आदर्श कथासूत्रात आणि आशयात गुंफले गेलेले असतात. इसापनीतीसारखा कथेच्या शेवटी मुद्दाम बोध देणे टाळावे हे खरे असले तरी कथांच्या माध्यमातून संदेश व प्रबोधन हे अटळच असते. पं. विष्णुशर्माने तीन राजपुत्रांना अवघ्या सहा महिन्यात प्राणिकथा आणि नीतिकथा सांगून व्यवहारकुशल बनवलेय या कथांमधील नीतितत्त्वे आजही प्रभावी ठरतात. तेव्हा कथेच्या या सामर्थ्याकडे डोळेझाक करण्याचे काहीच कारण नाही. उलट त्याचा योग्य प्रकारे वापर करून मुलामुलींच्या व्यक्तिमत्त्वाला आणि मूल्यभानाला इष्ट ते वळण देता यावे हेच उद्दिष्ट असायला हवे.

डॉ. वायू नायडू यांना कथाकथनात करीयर करावे हे फार उशिरा सुचले. त्यांची आजी त्यांना लहानपणी तेलगूतून रामायणातील कथा सांगायची. त्यात खूप गाणीही असायची. ती आजी गाऊन दाखवायची. तिची कथाकथनाची शैली इतकी प्रभावी असे की आपले सर्व शरीर, शरीराचा प्रत्येक अवयव कान बने, श्रवण करण्यात रंगून जाई असे छोट्या वायूला जाणवत असे. तिच्या आजीने स्वत:ही खूप गाणी रचली होती. त्यापैकी काहीही कधी पुस्तकरुपाने प्रसिद्ध झाले नाही, परंतु तिचे या माध्यमावरचे प्रभुत्व वादातीत होते अशी डॉ. वायू नायडू यांची भावना आहे. हैद्राबादला मोगल आणि द्रविडीयन संस्कृतीचा संगम झालेला आहे आणि त्यामुळे या शहराला एक वेगळेच व्यक्तिमत्त्व लाभले आहे. चेन्नईच्या स्टेला मारिस कॉलेजमध्ये लेक्चररशिप करताना अमेरिकेला जाण्याची संधी मिळाली. अमेरिकन इतिहासाचे अध्ययन करायचा बेत सिद्धीला जात नाही असे लक्षात आल्यावर त्या भारतात परतल्या. हॉटेलमध्ये मार्केटिंगचे काम त्यांनी पत्करले. त्यावेळी कथाकथनाचे आपले कौशल्य त्यांना जाणवले. ब्रिटनमध्ये जाऊन कथाकथनावर संशोधन करण्याचे मनात आले. चांगले मागदर्शक मिळाल्याने 'कथाकथना'मधील डॉक्टरेट मिळणे शक्य झाले. आपल्याकडे नृत्य, संगीत यात डॉक्टरेट मिळते; त्याप्रमाणे इंग्लंडमध्ये कथाकथनाच्या सादरीकरणातील कौशल्याला डॉक्टरेट मिळवून त्या क्षेत्रात अधिक काम करण्याची जिद्द त्यांनी बाळगली. कथाकथनकार तयार करणे, कथाकथनासाठी उपयुक्त साधने उपकरणे बनवणे, कथाकथनाच्या दृष्टीने उपयुक्त कथांची सूची तयार करणे वगैरे कामे चालू आहेत. गेल्या वर्षी त्यांनी 'ॲनी बेझंट इन इंडिया'चे अलाहाबाद, दिल्ली, चेन्नई वगैरे ठिकाणी प्रयोग करून दाखवले.


सानेगुरुजी कथामाला वगैरे संस्थांनाही या दिशेने काही काम करता आले तर उत्तम होईल. मुलांना बौद्धिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लहान वयात कथाकथनाद्वारे श्रवणाची गोडी लावायलाच हवी. त्याचप्रमाणे पिक्चरबुक्सच्या सहाय्याने वाचनाची क्षमता त्यांच्यात विकसित करायला हवी. वाचन संस्कृतीसाठी या दोन्ही बाबी पायाभूत आहेत.

कथाकथनकलेचे एका परीने पुनरुज्जीवनच व्हायला हवे.

## * प्रभाकर पुस्तकालयाचा अमृतमहोत्सव

अहमदनगरच्या प्रभाकर पुस्तकालय या ग्रंथविक्रीकेंद्राने एप्रिल २००८ मध्ये अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले. १९३३ मध्ये गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर प्रभाकर मोहिनीराज धर्माधिकारी यांनी नगरकरवाड्यात वीस-पंचवीस रुपयांच्या जुन्या पुस्तकांच्या भांडवलावर प्रभाकर पुस्तकालयाचा श्रीगणेशा केला. त्यावेळी पुस्तकांच्या किंमती चार-आठ आणे एवढ्या कमी असत. त्यामुळे वीस-पंचवीस रुपयातही शेदीडशे पुस्तके येत. ती पुस्तके पिशवीत घेऊन ते मागणीप्रमाणे घरोघर पुस्तके देत. कोणाला वाचायला तर कोणाला विकत... अल्पावधीतच ग्राहकसंख्या वाढत गेली. प्रभाकरपंतांचे वडील बाबा धर्माधिकारी हे सामाजिक कार्यात आघाडीवर असत. आगरकरांच्या विचारसरणीचा त्यांच्यावर प्रभाव होता. १९३६ साली समतानंद अनंत हरी गद्रे आणि आचार्य अत्रे यांच्या नेतृत्वाखाली बाबांनी दलित-सवर्ण सहभोजनाचा कार्यक्रम अहमदनगरमध्ये आयोजित केला. त्यामुळे नगरमधील सनातनी ब्रह्मवृंद खवळला. बाबांवर दोन वर्षे बहिष्कार घातला. १९३८ मध्ये बाबा मृत्यू पावले तेव्हा त्यांच्या अंत्यविधीला जाण्याचे ब्राह्मणांनी नाकारले. त्यावेळी बाबांच्या पत्नीने धीरोदात्तपणा दाखवून अत्यंविधी सुरळीतपणे पार पाडला... प्रभाकरपंत जुनी पुस्तके गावोगाव हिंडून गोळा करीत आणि नगरला आणून त्यांची विक्री करीत. दुकानात नव्याने उपलब्ध होणाऱ्या पुस्तकांची माहिती गुंडाळी फळ्यावर नियमितपणे देत. दुर्मिळ ग्रंथही ते ग्राहकांना मिळवून देत. १९३९ मध्ये सध्याच्या जागी दुकान आले. त्यात उत्तरोत्तर पुस्तकांची संख्या आणि व्यवहाराची व्याप्ती वाढत राहिली. १९८८ मध्ये मराठी प्रकाशक परिषदेच्या सोलापूर अधिवेशनात प्रभाकरपंतांचा सत्कार करण्यात आला. १९९० मध्ये त्यांचे देहावसान झाले. त्यांचे पुत्र राजाभाऊ आणि नंदकुमार धर्माधिकारी हे या व्यवसायाची धुरा आता समर्थपणे वाहत आहेत. आता नव्या पुस्तकांच्या विक्रीचे प्रमाण जास्त असले तरी सर्व प्रकारच्या जुन्या दुर्मिळ पुस्तकांचीही मोठी उलाढाल होते.

नगरसारख्या ठिकाणी ७५ वर्षे पुस्तकविक्रीचा व्यवहार करून वाचन संस्कृतीची गुढी उंच उभारणारे 'प्रभाकर पुस्तकालय' हे एक मोठे सांस्कृतिक केंद्रच आहे. पुढील वाटचालीसाठी 'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या वतीने धर्माधिकारी परिवाराला शुभेच्छा.



## मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा
## 'ऐका' आता थेट आकाशवाणीवर...

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यवधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे आकाशवाणीच्या सहकार्याने दर सोमवारी, सकाळी ठीक आठ वाजून पंचावन्न मिनीटांनी आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

**चला तर मग... भेटूया दर सोमवारी सकाळी ठीक ८:५५ वाजता 'पुणे आकाशवाणीवर'.**



# साहित्यवार्ता

*** 'वळू'ला ४२ लाख! 'टिंग्या'ला ५१ लाख?**

मराठी चित्रपटसृष्टीला भरभराट आणण्यात सर्वांत मोठा वाटा उचललाय तो सॅटेलाइट, व्हिडिओ तसेच 'म्युझिक'विषयक हक्कांनी! गेल्या काही महिन्यांमध्ये प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपटांना व्हिडिओ कॅसेट कंपन्यांकडून अतिशय चांगली किंमत मिळाली आहे. त्याचाच परिणाम म्हणून सध्या गाजत असलेल्या 'टिंग्या' या चित्रपटाच्या निर्मात्यांनी आपल्या सॅटेलाइट आणि व्हिडिओ हक्कांची थेट विक्री न करता तब्बल ५१ लाखांची ऑफर दिली आहे.

सॅटेलाइट तसेच व्हिडिओ हक्कांच्या विक्रीमध्ये अग्रेसर असलेल्या तीन अमराठी व्यवसायिकांनी मराठी चित्रपटसृष्टीतील ९० टक्क्यांहून अधिक चित्रपटांचे हक्क विकत घेतले आहेत. नानूभाई जयसिंघानी (व्हिडिओ पॅलेस), संजय छाब्रिया (एव्हरेस्ट) आणि सुशील आगरवाल (अल्ट्रा) हे सध्या मराठीत चित्रपटांचे विविध हक्क विकत घेण्यात आघाडीवर आहेत. गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये लोकप्रिय ठरलेल्या 'वळू'चे सॅटेलाइट तसेच व्हिडिओ हक्क विकत घेण्यासाठी संजय छाब्रिया यांनी ४२ लाख रुपये मोजले आहेत. याबद्दल ते म्हणाले, ''मराठी चित्रपटांना व्हिडिओ क्षेत्रात प्रचंड मागणी आहे. आम्ही फक्त चांगल्या कलाकृतींच्या निर्मितीच्या शोधात होतो. 'वळू'ला चित्रपटगृहामध्ये अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला असून, व्हिडिओ क्षेत्रातही आम्ही तशाच प्रकारच्या कामगिरीची अपेक्षा करीत आहोत.''

चित्रपटगृहांमध्ये जेमतेम कामगिरी केलेल्या चित्रपटांनाही सध्या चांगली किंमत मिळत आहे. त्यामुळेच नवीन चित्रपटनिर्मिती करणाऱ्या मंडळींचा उत्साह सध्या वाढला आहे. चित्रपटाच्या मुहूर्ताच्या वेळीच आपली कंपनी विविध प्रकारचे हक्क विकत घेत असल्याची माहिती नानूभाई यांनी दिली. 'राइट्स' ची ही 'बूम'

लक्षात आल्याने काही निर्माते सर्व हक्क विकण्याऐवजी आपले नशीब टप्प्याटप्प्याने आजमावू पाहत आहेत. निर्माते-दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांनी 'आम्ही सातपुते' चित्रपटाचे केवळ संगीत हक्कच आत्तापर्यंत विकले आहेत; मात्र ज्या निर्मात्यांना कसलाही धोका पत्करायचा नाही, अशी मंडळी मुहूर्ताच्या वेळीच सर्व हक्क विकून आपला चित्रपट 'सेफ' करीत आहेत. 'टिंग्या'ला चित्रपटगृहांमध्ये मिळत असणारा प्रतिसाद पाहून त्याच्या निर्मात्यांनी आता ५१ लाखांची मागणी केली आहे.

*** महादेवी वर्मांच्या कवितांचा अनुवाद**

''हिंदीतील ज्येष्ठ कवयित्री महादेवी वर्मा यांच्या कविता मराठीत अनुवादित झाल्यामुळे मराठी साहित्यात मोलाची भर पडली आहे.'' असे 'ऐक्यभारती'च्या संचालिका डॉ. दुर्गा दीक्षित यांनी सांगितले.

वर्मा यांच्या काही कवितांचा अनुवाद डॉ. अंजली पर्वते यांनी केला असून 'जाग तुजला दूर जाणे' या नावाने काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्यात आला आहे. या काव्यसंग्रहाचे प्रकाशन दीक्षित यांच्या हस्ते झाले.

दीक्षित म्हणाल्या, ''हिंदीतील 'छायावाद प्रवाहा'च्या माध्यमातून वर्मांवर अन्याय झालेला आहे. उत्तर प्रदेशात स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांविषयी बुरसटलेले विचार होते. वर्मा या उच्चशिक्षित व विद्वान होत्या. त्या विद्यार्थ्यांच्या संवेदना जाणणाऱ्या होत्या. त्यांच्या साहित्यवाचनातून दुहेरी अनुभूती मिळते.''

या वेळी ज्येष्ठ कीर्तनकार लीलाताई गोळे म्हणाल्या, ''पद्याचे एक पान ही गद्याच्या चार पानांच्या बरोबरीची असतात. त्यामुळे सर्वच प्राचीन वाङ्मयात काव्याला महत्त्वाचे स्थान आहे.''

या वेळी महादेवी वर्मा यांच्या साहित्यातील काही भागाचे अभिवाचन करण्यात आले. त्यात मुग्धा देशपांडे, नूतन कुलकर्णी, श्रेया पर्वते, श्रीहरी पर्वते, अंजली पर्वते यांचा सहभाग होता. सूत्रसंचालन मुग्धा ओंकार यांनी केले.

*** भागवत व देवी पुराण - दिव्यशक्तीची रूपे**

''भारतीय धार्मिक ग्रंथांच्या परंपरेत श्रीमद्‌भागवत आणि देवीपुराण ही दिव्यशक्तीची पुरुषप्रधान आणि स्त्रीप्रधान अशी दोन रूपे आहेत आणि त्यातील वात्सल्याचा परिपोष कथारूपाने पुस्तकात आला असून, आबालवृद्धांना ते प्रिय बनले आहे.'' असे मत डॉ. अजित कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

अरुण देशपांडे लिखित 'श्रीमद्देवीकथारूप' या ग्रंथाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी रजनी पत्की म्हणाल्या, ''आपल्याकडे अनेक ठिकाणी देवीची पीठे व स्थाने आहेत. ती एकाच आदिदेवीची रूपे आहेत. त्यांतील सूत्र एकच आहे.''

*** वृद्धांची काळजी - अभ्यासक्रम**

वृद्धांचे जीवन सुखकर करण्यासाठी 'वृद्धांची काळजी' हा शैक्षणिक कोर्स

महत्त्वपूर्ण ठरणारा असून, तो विद्यार्थी व शिक्षकांच्या दृष्टीनेही एक नवा अनुभव होईल, असे सिम्बॉयसिस संस्थेचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी सांगितले.

नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल डिफेन्स, आयसीएल व सिम्बॉयसिस विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात 'वृद्धांची काळजी' या शैक्षणिक कोर्सचे उद्‌घाटन कास्प भवन, पाषाण येथे झाले. यावेळी मध्य प्रदेश हौसिंग बोर्डाचे अध्यक्ष डॉ. संदीप खन्ना, डॉ. एम. ए. तुटकणे, डॉ. एम. डी. गोखले, डॉ. अरुण निगवेकर आदी उपस्थित होते.

डॉ. संदीप खन्ना म्हणाले, ''वृद्धांच्या मानसिक आरोग्याच्या प्रश्नाकडे लक्ष केंद्रित करणे सध्या आवश्यक आहे.''

डॉ. एम. ए. तुटकणे म्हणाले, ''मृत्युपूर्वीचे वृद्धापकाळाचे जीवन अधिक त्रासदायक वाटते. वृद्धांची काळजी घेण्याचे प्रशिक्षण घेतले तर इतरांबरोबरच स्वतःच्या वृद्धापकाळातही याचा उपयोग होईल.''

यामध्ये वृद्धांचे आजार, आहार, सामाजिक वर्तन, आर्थिक व्यवहार, मानसिकता, वृद्धांसाठीच्या योजना, सामाजिक कार्य आदी बाबींचा समावेश आहे. सध्या सहा महिन्यांचे हे प्रशिक्षण सिम्बॉयसिस नर्सिंग कॉलेजमध्ये सुरू करण्यात आले.

हे प्रशिक्षण पूर्ण वेळ असून, विद्यार्थ्यांना दरमहा सहाशे रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिक अनुभवही दिला जाणार आहे.

या प्रशिक्षणासाठी ६३ जणांची निवड करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या व विभक्त राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना अशा प्रशिक्षणाचा फायदा होणार आहे.

* १९९०नंतर आर्थिक क्षेत्रातील वाढ; तसेच शिक्षण व ज्येष्ठ नागरिक संख्येत वाढ; तसेच शिक्षण व ज्येष्ठ नागरिक संख्येत वाढ यामुळे हा कोर्स महत्त्वाचा आहे.

* भारतात ६० वर्षे वयाचे सात कोटी ६६ लाख ज्येष्ठ नागरिक (२००१ च्या सर्व्हेनुसार)

महाराष्ट्रात ८.७ टक्के ज्येष्ठ नागरिक (६०वर्षांवरील)

पुण्यात ७.४२ टक्के, तर पिंपरी-चिंचवडमध्ये ४.४५ टक्के (२००१ नुसार)

महाराष्ट्रात ७.८ टक्के पुरुष, तर ९.७ टक्के स्त्रिया (६० वर्षांवरील)

*** स्त्री अभ्यासकेंद्राचे दोन नवीन अभ्यासक्रम**

स्त्रीअभ्यासातील मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्यासाठी पुणे विद्यापीठाचे 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र' येत्या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदवी, तसेच स्त्री अभ्यासातील आंतर-विद्याशाखीय पदव्युत्तर प्रमाणपत्र असे दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करीत आहे.

पदव्युत्तर पदवीचा अभ्यासक्रम हा चार सत्रांचा तर पदव्युत्तर प्रमाणपत्र हा सहा महिन्यांचा अर्धवेळ अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमांतून स्त्रीअभ्यासातील मूलभूत संकल्पना समजावून देण्यावर भर दिला जाईल. भारतातील स्त्री चळवळीच्या

इतिहासाचा आढावा घेतला जाईल. या दोन नवीन अभ्यासक्रमांखेरीज २००३ पासून स्त्रिया आणि विकास या विषयातील पदवीपूर्व प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालू आहेत. स्त्रियांकरिता राबविलेल्या 'राष्ट्रीय सक्षमीकरण धोरणा'वर आधारित हा अभ्यासक्रम एका सत्राचा आणि अर्धवेळ आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बदलत असलेल्या स्त्रीप्रश्नाचे आकलन आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी विविध संरचना, विचारप्रणाली यांचा अभ्यास करण्याच्या गरजेतून 'स्त्री अभ्यास' ही ज्ञानशाखा विकसित झाली. पुणे विद्यापीठात १९८७ मध्ये स्त्री अभ्यास केंद्राची सुरुवात झाली. अध्यापनासोबतच या केंद्रामार्फत चर्चासत्रे, कार्यशाळांचे आयोजन, पुस्तक प्रकाशनाचेही काम केले जाते. केंद्राने आतापर्यंत काही महत्त्वाचे संशोधन प्रकल्पही पूर्ण केले आहेत. त्यात 'महाराष्ट्रातील सात विद्यापीठांतील अध्यापन आणि संशोधन पत्रिकेतील लिंगभाव प्रश्नाचे विश्लेषण', 'धर्मनिरपेक्ष सुसंवादी लोकशाही समाजाच्या दिशेने', 'स्त्रियांच्या कामाचे बदलते स्वरूप', 'पुणे जिल्ह्यातील परित्यक्ता स्त्रियांचा अभ्यास' या विषयांचा समावेश होता. केंद्राने स्त्री अभ्यासातील २९ पुस्तिका आणि संसाधित साहित्याचेही प्रकाशन केले आहे, अशी माहिती स्त्री अभ्यास केंद्रातील अध्यापिका स्वाती देहाडराय यांनी दिली.

### * 'अस्वस्थ आत्मा' : याकूब सईद यांचे दिग्दर्शन

ज्येष्ठ साहित्यिक आणि नाटककार विजय तेंडुलकर यांच्या हयातीतील अखेरचे चित्रीकरण करणाऱ्या 'अस्वस्थ आत्मा' या एक तासाच्या लघुपटात तेंडुलकरांचे मनोगत आणि त्यांची नाटके करणाऱ्या मान्यवरांचे जिव्हाळ्याचे बोलही आहेत. लघुपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन याकूब सईद यांचे आहे.

'पुणे फेस्टिव्हल' आयोजित कार्यक्रमात हा लघुपट दाखवण्यात आला. या वेळी 'पुणे फेस्टिव्हल'चे मुख्य संयोजन कृष्णकांत कुदळे, संयोजिका निकिता मोघे, तेंडुलकर यांच्या कन्या सुषमा, रवींद्र दुर्वे तसेच स्वत: याकूब सईद उपस्थित होते. लघुपटात गिरीश कर्नाड, विजया मेहता, डॉ. श्रीराम लागू, निळू फुले आदी अनेक मान्यवरांनी भाष्य केले आहे.

तेंडुलकर म्हणतात, ''माझ्यातील लेखकावर चित्रपट माध्यमाचे विशेषत: 'प्रभात'च्या 'माणूस'सारख्या चित्रपटांचे संस्कार आहेत. या चित्रपटांतील व्यक्तिरेखा अगदी स्वाभाविक बोलतात आणि वागतात. मी प्रत्येक 'माध्यमा'चे स्वत:चे बलस्थान मानतो. त्यामुळे जो विषय कादंबरीचा आहे तो मी कादंबरी या आकृतिबंधातूनच मांडला आहे. ज्या विषयांत 'नाट्य' दिसले ते 'नाटका'तूनच लिहिले.''

सईद म्हणाले, ''तेंडुलकरांच्या जीवनकार्यावर आधारित लघुपट निर्माण करावा, अशी विनंती मी साहित्य अकादमीला केली आणि त्यांनी ती मान्य करून त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. तेंडुलकरांच्या अखेरच्या आजारपणातच या लघुपटाचे चित्रीकरण झाले.''

### * जेफ्री आर्चरची पुण्याला भेट

''भारतातील इंग्रजी लेखन बहरत आहे. दक्षिण आफ्रिका ऑस्ट्रेलिया या तत्कालीन ब्रिटिश वसाहतींतील अन्य देशांपेक्षा भारतातील दर्जेदार इंग्रजी साहित्यिकांची संख्या अधिक आहे... '' ही कौतुकाची थाप दिली आहे, राजकारणापासून उद्योगजगापर्यंत आणि गुन्हेगारीपासून कारावसातील जीवनापर्यंतचे विश्व आपल्या कथा-कादंबऱ्यांमध्ये जिवंत करणारे ख्यातनाम आणि 'बेस्टसेलर' लेखक जेफ्री आर्चर यांनी.

'ए प्रिझनर ऑफ बर्थ' या नव्या कादंबरीच्या प्रसारासाठी भारताच्या दौऱ्यावर आलेले आर्चर २२ मे रोजी पुण्यात आले होते. प्रथमच भारत भेटीवर आलेल्या आर्चर यांनी भारत आणि भारतीयांबद्दलची आत्मीयता व्यक्त केली; मात्र येथील वाहतूक खूपच बेशिस्त असल्याची तक्रारही त्यांनी केली.

आपली पुस्तके भारतात मोठ्या प्रमाणावर खपत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला.

''गेले काही दिवस माझ्या पुस्तकांबद्दलची चर्चा येथे आहे. प्रत्येकजण माझे पुस्तक विकत घेतोय आणि वाचतोय. त्यामुळे माझी पुस्तके येथे खपताहेत. मराठी, हिंदी, बंगाली या भाषांतही माझी पुस्तके गेली आहेत,'' असे त्यांनी नमूद केले.

### * 'लोक बिरादरी'चे संकेतस्थळ

डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांनी चालविलेल्या 'लोक बिरादरी प्रकल्पा'ची वेबसाइट सुरू झाली आहे. www.lokbiradariprakalp.org या संस्केतस्थळावर याची माहिती मिळेल.

डॉ. आमटे पती-पत्नी आणि त्यांचे सुपुत्र डॉ. दिगंत व सर्व कुटुंबानेच या प्रकल्पात स्वत:ला झोकून दिले आहे. बाबा आमटे यांनी डिसेंबर १९७३ मध्ये हेमलकसा येथे या प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली. डॉ. प्रकाश आमटे यांनी पदवी मिळविल्यानंतर स्वेच्छेने याच प्रकल्पात राहून, माडिया गोंड या मागास आदिवासी जमातीमध्ये राहून त्यांची सेवा करण्याचा निर्णय घेतला. अत्यंत मागास जमातीतील या गोंडांचा पुजाऱ्यावर डॉक्टरांपेक्षा अधिक विश्वास होता. मात्र डॉ. प्रकाश यांच्या सेवाभावी स्वभावामुळे अखेर माडिया गोंड त्यांच्याकडे मोठ्या विश्वासाने येऊ लागले. केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशातील आदिवासीही त्यांच्याकडे उपचारांसाठी येतात. ही बेवसाइट सहा विभागात आहे. वैद्यकीय सुविधा, माडिया गोंड मुला-मुलींसाठी प्राथमिक ते माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय, वन्य पशूंसाठी चिकित्सालय यांची माहिती देण्यात आली आहे.

### * 'मायस्पेस'ने जिंकली ऐतिहासिक लढाई

'मायस्पेस' या सोशल नेटवर्किंग वेबसाईटच्या सदस्यांनी 'स्पॅममेल' उर्फ 'जंकमेल्स' पाठविणाऱ्या दोघा 'स्पॅमर्स'विरुद्ध तब्बल २३ कोटी डॉलरच्या (सुमारे

९२० कोटी रुपये) नुकसानभरपाईचा खटला जिंकला आहे. ऑनलाइन धुमाकूळ घालणाऱ्या 'स्पॅमर्स'विरुद्धच्या या सर्वांत मोठ्या खटल्याचे वर्णन ऐतिहासिक असे केले जात आहे. मात्र, हे दोन भामटे फरार असल्याने ही रक्कम वसूल हाईल की नाही, याबाबतच शंका व्यक्त केली जात आहे.

सॅनफोर्ड वॉलेस आणि वॉल्टर राईन्स अशी त्यांची नावे आहेत. १९९० च्या दशकात हे दोघे दिवसाला तीन कोटी 'स्पॅममेल्स' किंवा 'जंकमेल्स' पाठवीत होते. त्याचमुळे 'स्पॅमकिंग' किंवा 'स्पॅमफोर्ड' या नावांनी ते कुप्रसिद्ध आहेत. या दोघांनी 'मायस्पेस'वर स्वत:चे खाते उघडले आणि 'फिशिंग'च्या (जिथे 'पिन', युझरनेम, पासवर्ड चोरून तुमच्या ऑनलाइन खात्याचा गैरवापर केला जातो...) मदतीने त्यांनी 'मायस्पेस'च्या सदस्यांची सर्व संवेदनशील माहिती मिळवली होती. पुढे त्याचा वापर करून 'मायस्पेस'च्या सुमारे साडेसात लाख सदस्यांना विविध आमिषे दाखविणारे 'स्पॅममेल्स' पाठविल्या. या ऑफर 'मायस्पेस'कडूनच आल्या आहेत, असे समजून हजारो जणांनी त्यात पैसे गुंतविले होते. त्यात अनेकांची फसवणूक झाली होती.

या सर्व पार्श्वभूमीवर 'मायस्पेस'ने लॉस एंजलिस न्यायालयात खटला दाखल केला होता. ''या स्पॅममेल्समुळे बँडबिड्थचा मोठा खर्च तर आलाच आणि त्याहीपेक्षा आमच्या विश्वासार्हतेचा गैरवापर केला गेला. या निकालामुळे स्पॅमर्सच्या चालबाजीला थोडा आळा बसेल, असा विश्वास आहे,'' अशी प्रतिक्रिया 'मायस्पेस'चे प्रमुख सुरक्षा अधिकारी हिमांशू निगम यांनी व्यक्त केली.

'स्पॅम' म्हणजे कोणत्याही इलेक्ट्रॉनिक सिस्टिमचा वापर करून लाखोंच्या संख्येमध्ये खोटे, बनावट मेसेज पाठविण्याचा गैरव्यवहार. 'स्पॅममेल्स' हे त्याचे प्रातिनिधिक उदाहरण.

चॅटरूम्स, वेबसाईट्स, युझर्स अॅड्रेस यांचा वापर करून ई-मेल अॅड्रेस मिळविले जातात. दर दिवसाला असे तब्बल शंभर अब्ज स्पॅममेल्स पाठविले जातात. यातील ऐंशी टक्के स्पॅममेल्स केवळ दोनशे स्पॅमर्स पाठवितात.

### * 'विनिंग हॅबिट'चा लोकार्पण सोहळा

भीष्मराज बाम लिखित 'विनिंग हॅबिट'या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. गुप्तचर विभागाचे संचालक व्ही. जी. वैद्य सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. हरिश्चंद्र बिराजदार, चाणक्य मंडळाचे संचालक अविनाश धर्माधिकारी उपस्थित होते. बाम व बिराजदार यांची भाषणे झाली.

### * महक चित्रपटाचा अभ्यासक्रमात समावेश

पुण्यातील प्रसिद्ध चित्रकर्मी क्रांती कानडे यांच्या 'महक'या नव्या हिंदी चित्रपटाचा अमेरिकेतील विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. ओहियो राज्यातील वेस्टरव्हिल येथील ऑटरबिन विद्यापीठाने या चित्रपटाची निवड केली.

ऑटरबिन विद्यापीठाची स्थापना १८४७ मध्ये झाली. हे अमेरिकेतील जुन्या व प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक समजले जाते. या विद्यापीठाने 'आधुनिक भारत' या विषयासाठी या चित्रपटाची निवड केली आहे. यापूर्वी अपर्णा सेन यांच्या 'मि. अँड मिसेस अय्यर', झुंपा लाहिरी यांच्या 'नेमसेक' आणि अॅटनबरोच्या 'गांधी' यांची निवड झाली होती. एका स्त्रीचा आत्मभानाकडे जाणारा प्रवास क्रांती यांनी अतिशय सुरेख रेखाटला आहे. श्रेया शर्मा, अनुया भागवत, मदन देवधर, अनुजा बोरकर, धीरेश जोशी व लालन सारंग यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत.

*** विश्वाच्या निर्मितीचे गूढ**

'महास्फोट सिद्धांता'ला (बिगबँग) पुष्टी मिळेल अशी अनेक निरीक्षणे मिळाल्याने विश्वाची निर्मिती एका प्रचंड स्फोटातून झाली हे जवळजवळ सर्वमान्य झाले आहे, तरीही विश्वाचे नेमके स्वरूप जोपर्यंत स्पष्ट होत नाही, तोपर्यंत विश्वाचे गूढ कायम राहील, असे प्रतिपादन ज्येष्ठ विज्ञान लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांनी केले.

साधना साप्ताहिकातर्फे आयोजित 'आर्यभट्ट ते बिगबँग : अर्थात विश्वाच्या निर्मितीची कथा' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

डॉ. गोडबोले म्हणाले, ''रात्रीच्या आकाशात पसरलेल्या असंख्य ताऱ्यांकडे पाहणाऱ्या माणसाला विश्वाविषयीचे आकर्षण हजारो वर्षांपासून राहिले आहे. यातून त्याच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांचा मागोवा घेत खगोलशास्त्राचा विकास झाला आहे. अनेक बुद्धिवंतांनी या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांना आतापर्यंत मिळालेल्या यशातून विश्वाचे ढोबळ स्वरूप आणि त्याच्या निर्मितीचे सिद्धांत विकसित झाले आहेत. न्यूटनला गुरुत्वाकर्षणाचे स्वरूप शोधण्यात मिळालेले यश, आइनस्टाइनचा अवकाश आणि काळावर आधारित सापेक्षतावादाचा सिद्धांत आणि हबल या शास्त्रज्ञास विल्सन वेधशाळेतून निरीक्षण करताना आकाशगंगांमधील वाढत जाणाऱ्या अंतराचे मिळालेले निरीक्षण हे आधुनिक खगोलशास्त्रामधील सर्वांत महत्त्वाचे शोध ठरले आहेत. याच शोधांच्या आधारावर विश्वाची निर्मिती आणि त्याचे कार्य याविषयी आपणास नवे ज्ञान प्राप्त झाले आहे.''

ते म्हणाले, ''विश्वाच्या निर्मितीसंबंधी 'बिगबँग' आणि 'स्टेडीस्टेट' हे प्रमुख दोन सिद्धांत प्रचलित आहेत. त्यातील 'बिगबँग'ला पुष्टी मिळेल, अशी निरीक्षणे अनेक वर्षे मिळत आहेत. त्यामुळे महास्फोटाचा सिद्धांत जवळजवळ सर्वमान्य झाल्यासारखा आहे; मात्र विश्वाचे नेमके स्वरूप जोपर्यंत स्पष्ट होणार नाही, तोपर्यंत हे गूढ कायम राहणार आहे.''

*** लग्नपत्रिकांचे बदलते स्वरूप**

विवाह हा मानवी जीवनातील महत्त्वाचा संस्कार. त्याचे लिखित साधन म्हणजे लग्नपत्रिका. या लग्नपत्रिकांचा अभ्यास करून लग्नपत्रिकांच्या बदलत्या स्वरूपाबरोबरच

लग्नपत्रिकांनी सांस्कृतिक अवकाश व्यापले आहे, असा निष्कर्ष डॉ. नारायण भोसले यांनी काढला आहे.

''प्राचीन काळापासून लग्नाची आमंत्रणे देण्याची प्रथा आहे. शिवकाळ आणि पेशवाईतही विवाहाची आमंत्रणे दिली जात होती. त्यात लग्नाला 'शरीरसंबंध' असा शब्द वापरलेला दिसतो. पुढे हा शब्द मागे पडून 'विवाह' किंवा 'शुभविवाह' असा शब्द रूढ होत गेला. वधू आणि वराची माहिती अशी लग्नपत्रिकेची सरळसरळ दोन भागांत रचना केलेली दिसते. जागतिकीकरणानंतर साध्या लग्नपत्रिकांमध्ये वधू-वरांचे कृष्ण-धवल आणि रंगी छायाचित्र छापले जाऊ लागले.

लग्नाला भपकेबाजपणा आणण्यासाठी मदत करणाऱ्यांना, तसेच राजकारण्यांना कार्यवाह, कार्याध्यक्ष, स्वागतोत्सुक, प्रेषक, विनीत, नम्र, परिवार अशा विविध पदावलींमध्ये सामावून घेतले जाऊ लागले. ग्रामीण, निमशहरी, शहरी भागात राजकीय लोकांचे वाढलेले महत्त्व अशा पत्रिका अधोरेखित करतात. विविध देव-देवता, संत-महंत यांचे महत्त्व त्यांच्या नावांसह छायाचित्रावरूनही दिसते.''

हा अभ्यास पुढे नेण्यासाठी नागरिकांनी आपल्याकडील लग्नपत्रिका पाठवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले आहे. डॉ. नारायण भोसले, द्वारा किशोर दरक, फ्लॅट नं. ८, शिवम, घारपुरे कॉलनी, ११६०-६१/६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००२. (मोबाईल क्र. ९८२२३४८३६१)

### * तेंडुलकरांचे आत्मचरित्र?

ज्येष्ठ दिवंगत नाटककार विजय तेंडुलकर यांचे मूळ हस्ताक्षरातील सर्व लेखन एकत्रित करण्याचा संकल्प तेंडुलकरांच्या कन्या सुषमा तेंडुलकर आणि तनुजा मोहिते यांनी सोडला आहे. मृत्यूपूर्वी काही महिने तेंडुलकर लिहित असलेले त्यांचे सामाजिक आत्मचरित्रही जेवढे लिहून झाले आहे तेवढे प्रकाशित करण्याचा निर्णय या दोघींनी घेतला आहे.

'बाबांपाशी मी शेवटपर्यंत असल्यामुळे ते आजारपणातही 'त्यांच्या कालखंडा'वर गांभीर्याने माहिती गोळा करत होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून गेल्या सात आठ दशकांतील घडामोडींवर संशोधन करण्यासाठी त्यांना दिल्लीतील भाभा स्कॉलरशिपही मिळाली होती. संदर्भ साहित्य वाचण्यासाठी ते मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात जाऊन बसत.' या काळात घरात ते लॅपटॉपवर जमेल तसे लेखन करत असत.

'बऱ्याच दिवसात नाटक माझ्याकडे फिरकलंच नाही, त्यामुळे मी कथा कादंबरी आणि इतर लेखनच करत राहिलो,' असे खुद्द तेंडुलकरांनीच जानेवारी महिन्यात याकुब सईद यांनी घेतलेल्या शेवटच्या मुलाखतीत म्हटले होते. तेंडुलकरांवर साहित्य अकादमीतर्फे सईद यांनी काढलेल्या 'अस्वस्थ आत्मा' या डॉक्युमेंटरीमध्ये ही मुलाखत समाविष्ट आहे.

## * शनिवारवाड्यात आता 'लेझर शो'

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्यापासून पेशव्यांपर्यंत, मराठी साम्राज्याची पताका फडकवत ठेवणाऱ्या निवडक राजांची लघुचित्रे आणि त्यांचे कर्तृत्व यांची माहिती पर्यटकांना लवकरच शनिवारवाड्यात पाहायला मिळणार आहे.

यामध्ये एकूण १२ लघुचित्रांचा समावेश असून, श्रीकांत प्रधान आणि मधुकर जिनगारे हे चित्रकार त्या चित्रांना अंतिम स्वरूप देत आहेत.

''मराठ्यांचा देदीप्यमान इतिहास सर्वांसमोर यावा, तसेच त्या काळातील राजांचे कर्तृत्व आणि त्यांचा पेहराव, याची माहिती व्हावी, यासाठी ही लघुचित्रे शनिवारवाड्यात लावली जाणार आहेत. शनिवारवाड्याची खास प्रतिकृतीही त्यासाठी तयार केली जात असून, पहिल्या टप्प्यातील सहा चित्रे पुढील महिन्यात लावली जातील.''

प्रधान म्हणाले, ''ही चित्रे काढताना देशातील विविध संग्रहालयात असलेल्या संबंधित राजांच्या चित्रांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. प्रामुख्याने सर्वांचा चेहरा आणि पेहराव कायम ठेवण्यात आला असून, त्यांच्या कर्तृत्वानुसार काही सूक्ष्म बदल चित्रचौकटीत केले आहेत.''

शनिवारवाड्यात सध्या सुरू असणाऱ्या 'लाईट अँड साऊंड शो' मध्येही लवकरच काही बदल केले जाणार आहेत. त्याला 'लेझर शो'ची जोड डिसेंबर अखेरीस दिली जाईल.

## * डॉ. के. के. चौधरी लिखित 'झुंजार पुणे'चे प्रकाशन

ब्रिटिशांविरुद्ध पुण्यातून झालेला लढा फक्त पुण्यापुरताच मर्यादित नाही, तर देशव्यापी स्वातंत्र्य लढ्याचा निदर्शक आहे, असे ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी पुण्याच्या लढ्याचे कौतुक केले.

महाराष्ट्राच्या गॅझेटियर विभागाचे माजी कार्यकारी संपादक आणि इतिहासाचे अभ्यासक डॉ. के. के. चौधरी यांनी लिहिलेल्या 'झुंजार पुणे' पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, कॉंटिनेंटल प्रकाशन संस्थेचे अनिरुद्ध कुलकर्णी, माजी महापौर अंकुश काकडे व्यासपीठावर उपस्थित होते. कर्णिक यांनी १८५७ पासूनच्या लढ्यातील पुण्याचा सहभाग स्पष्ट केला. 'झुंजार पुणे' या पुस्तकात लेखकाने तपशिलाने पुण्यातून झालेल्या लढ्याच्या नोंदी बिनचूकपणे दिल्या आहेत, त्यामुळे पुण्याची नवी ओळख होते, असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

केतकर यांनीही पुस्तकाचे कौतुक करून दीडशे वर्षांच्या इतिहासातील काही माहीत नसलेली माहिती लेखकाने करून दिली आहे, असे सांगितले. डॉ. चौधरी यांनी पुस्तकाची माहिती दिली. काकडे यांनी पालकमंत्री अजित पवार यांचे मनोगत वाचून दाखविले. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

## * ब्लॉगच्या माध्यमातून काव्यांजली कम्युनिटी

ऑर्कुट या ब्लॉगचा उपयोग फक्त चॅटिंगसाठी केला जातो हा समज दूर करणारा 'शरपंजरी आज मी... एक दक्षिणायन' हा काव्यसंग्रह सीडी आणि पुस्तकरूपात काव्यांजली या कम्युनिटीच्या प्रतिनिधींनी प्रकाशित केला.

नाट्यसमीक्षक माधव वझे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. गायक रवींद्र साठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ऑर्कुट या ब्लॉगवर सोनाली घाटपांडे यांनी तयार केलेल्या 'काव्यांजली' या कम्युनिटीचे सदस्य असलेल्या डॉ. राहुल देशपांडे यांनी 'शरपंजरी' ही भीष्माचार्यांच्या जीवनावर आधारित कविता प्रसिद्ध केली आणि इतर सदस्यांकडून त्याबाबत प्रतिक्रिया मागविल्या. यावर त्यांना द्रौपदी, कुंती, नारद, यमराज, गंगा, श्रीकृष्ण, श्रीमद्भगवद्गीता आदी विविध भूमिकांमधून साडेतीनशेहून अधिक काव्यरूपी प्रतिक्रिया मिळाल्या. या प्रतिक्रियांमधून काही निवडक कवितांचे प्रकाशन नागपूरच्या विद्या विकास प्रकाशनाच्या मदतीने पार पडले.

वझे म्हणाले, ''या संग्रहातील प्रत्येक कविता एका वाग्बाणासारखी आहे. आजच्या तरुणांनी आपल्या विलक्षण कल्पनेतून हे इंटरनेट महाभारत सजविले आहे.'' रवींद्र साठे म्हणाले, ''मराठी मागे पडत असल्याचा आवाज आजकाल उठत आहे. पण इंटरनेटच्या माध्यमातून एवढ्या उत्स्फूर्तपणे मराठी कवितांद्वारे प्रतिसाद मिळणे ही समाधानकारक बाब आहे.''

या काव्यसंग्रहाला प्रशांत कुलकर्णी यांनी संगीत दिले आहे तर संकल्पना सुनीता अनगळ आणि दिग्दर्शन हरीश कुलकर्णी यांचे आहे. डॉ. जयेश रहाळकर आणि मानसी इनामदार यांनी कवितांचे अभिवाचन केले आहे.

## * 'मराठी नाटक-नाटककार'चे प्रकाशन

मराठी रंगभूमीवरील संगीत, व्यावसायिक, प्रायोगिक, समांतर, हौशी असे विविध प्रवाह सामावून घेणाऱ्या मान्यवरांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडेलिखित 'मराठी नाटक - नाटककार : काळ आणि कर्तृत्व' या त्रिखंडात्मक ग्रंथांचे प्रकाशन अभिनेते विक्रम गोखले यांच्या हस्ते झाले.

'दिलीपराज प्रकाशन'तर्फे हे खंड प्रकाशित करण्यात आले आहेत. या प्रसंगी प्रकाशक राजीव बर्वे, लेखक डॉ. देशपांडे, ज्येष्ठ अभिनेते प्रभाकर पणशीकर, भाषाशास्त्रज्ञ डॉ. रमेश धोंगडे व्यासपीठावर उपस्थित होते.

अभिनेते भालचंद्र पेंढारकर, चित्तरंजन कोल्हटकर, निळू फुले, जयमाला शिलेदार, लालन सारंग, मनोहर कुलकर्णी, सतीश आळेकर, डॉ. मोहन आगाशे, डॉ. वीणा देव, डॉ. सरोजा भाटे, म. श्री. दीक्षित आदी मान्यवरांची या वेळी उपस्थिती होती.

पणशीकर म्हणाले, ''नट हाच नाटकाला संजीवनी देत असतो. नाटककाराचे शब्द नट रक्तात मिसळून घेत असतो. नटाचा आपल्या भूमिकेविषयीचा विचार काय आहे, ती भूमिका त्याला कशी सापडली, त्यालाच का मिळाली, या अनुभवांचे लेखन नटाने केले पाहिजे. नाटक म्हणजे शेवटी माणूस वाचणे असते. मानवी संबंध, विचार, विकार यांचे संबंध नाटकांतून प्रकट होत असतात. डॉ. देशपांडे यांनी हा धांदोळा घेण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र संपूर्ण रंगभूमीचा साकल्याने विचार करणारे लेखनही त्यांनी करायला हवे.''

डॉ. धोंगडे म्हणाले, ''नाटक हा मिश्र साहित्यप्रकार आहे. नाटक हे लेखक, दिग्दर्शक, निर्माता, नट आणि प्रेक्षक यांच्या सहभागातून घडते. ढोबळ मानाने मराठी रंगभूमीचे संगीत नाटक, कौटुंबिक नाटक, विनोदी नाटक आणि साऱ्यातून मोकळे होत गेलेले नाटक, असे विभाग पाडता येतात. देशपांडे यांनी सोप्या भाषेत प्रयोगांचे तपशील देत या खंडांचे लेखन केले आहे.''

''नाटकांकडे केवळ मनोरंजन करणारे साधन म्हणून न पाहता त्यांचा साहित्यिक दृष्टिकोनातून अभ्यास झाला पाहिजे. गेल्या काही वर्षांत नाटकांविषयी जे लिहिले जाते त्याला मी 'समीक्षा' म्हणणार नाही. नाटकावर नटांनी, दिग्दर्शकांनी लिहिले पाहिजे आणि तसा प्रयत्न मी एक नट म्हणून सुरू केला आहे. देशपांडे यांनी आता अन्य भारतीय भाषांतील नाटकांचाही अभ्यास करून लेखन करावे,'' अशी अपेक्षा विक्रम गोखले यांनी व्यक्त केली.

*** आचार्य अत्रे पुरस्कार**

आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या वतीने साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांच्या (सासवड, ता. पुरंदर) जन्मगावी पुरस्कार देण्यात आला.

अत्रे पुरस्कारांचे हे सतरावे वर्ष आहे. आचार्य अत्रे यांच्या पुण्यतिथीनिमित्त १३ जून रोजी दर वर्षीप्रमाणे या पुरस्कारांचे वितरण होते. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे संस्थापक-सचिव तथा राज्य कृषी परिषदेचे उपाध्यक्ष विजय कोलते यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. रोख रक्कम, मानचिन्ह, प्रशस्तिपत्रे, शाल, श्रीफळ असे या तीनही पुरस्काराचे स्वरूप आहे.

नीला सत्यनारायण या महसूल व वन विभागाच्या अपर मुख्य सचिव आहेत. साहित्यनिर्मितीत त्यांचे योगदान मोठे आहे. सहा मराठी कवितासंग्रह, राज्य पुरस्कारप्राप्त एक मराठी गद्य, तीन हिंदी कवितासंग्रह, सहा चित्रपट गीते, आठ मराठी व हिंदी ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध आहेत. लवकरच मराठी व इंग्रजीत त्यांच्या कादंबऱ्या येत आहेत. डॉ. संजीवकुमार पाटील वैद्यकीय द्विपदवीधर आहेत. गेल्या पंधरा वर्षांपासून त्यांचे रंगभूमीशी नाते आहे. सौजन्याची ऐशी तैशी, कार्टी प्रेमात पडली, फुलपाखरू. मोरूची मावशी, तरुण तुर्क म्हातारे अर्क, वस्त्रहरण, मार्ड या नाटकात त्यांनी

भूमिका केल्या. शासनाच्या नाट्य स्पर्धेत ‘बॅरिस्टर’ नाटकासाठी त्यांना प्रमुख भूमिका, दिग्दर्शनासाठीचे २००४ मध्ये पारितोषिक मिळाले होते, तर तानाजी कोलते पिसर्वे (ता. पुरंदर) येथील रहिवासी असून, १९७८ पासून लोकसत्तामध्ये उपसंपादक ते दिल्लीचे विशेष प्रतिनिधी म्हणून काम केले. त्यानंतर केसरी, सामना या वृत्तपत्रांतही त्यांनी काम केले. सध्या औरंगाबाद येथील ‘लोकपत्र’चे संपादक आहेत. पत्रकारितेत त्यांचे तीस वर्षांचे योगदान आहे.

*** पुस्तकप्रेम वाढविण्यासाठी**

‘‘मुलांसाठी तुम्ही पुस्तके खरेदी करण्याऐवजी त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके निवडण्याचे स्वातंत्र्य द्या, त्यांनी विनोदी चुटक्यांची पुस्तके निवडली तरी त्यांना परावृत्त करू नका.’’ असे आवाहन या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांनी केले आहे. ‘मुले पुस्तके वाचत नाहीत.’ अशी ओरड होत असताना पुण्यात मुलांना पुस्तकांची गोडी लावण्याचे यशस्वी प्रयत्न खेळघर, बालरंजन केंद्र आणि बालभवनमध्ये सुरू आहेत.

घरात वाचनाला पोषक वातावरण नसतानाही लक्ष्मीनगर परिसरातील झोपडपट्टीतील मुलांना त्यांच्या अनुभवविश्वातून पुस्तकांकडे नेण्याचा प्रयत्न कोथरूडमधील ‘खेळघर’मध्ये होत आहे. संस्थेच्या प्रमुख शुभदा जोशी यांनी सांगितले, ‘‘मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून त्यांचे रोजचे अनुभव, विनोद त्यांच्या शब्दांत लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. आपणच लिहिलेले वाचून मुले पुस्तकांकडे वळतात. संस्थेसाठी पुस्तकांची खरेदी करताना मुलांना आवर्जून नेले जाते. मुलांनी निवडलेली पुस्तके खरेदी केली जातात. ‘चाचा चौधरी’सारखी विनोदी पुस्तके, कार्टूनवर आधारित पुस्तके खरेदी करण्याची मुभा मुलांना दिली जाते. अशा स्वातंत्र्यातून मुलांना पुस्तकांची गोडी लागते, असा अनुभव आहे.’’

‘बालभवन’मध्ये गेली अनेक वर्षे अडीच ते पाच या वयोगटासाठी ‘पुस्तकप्रेम शिबिर’ घेतले जाते. हे शिबिर घेणाऱ्या कल्पना संचेती म्हणाल्या, ‘‘या वयोगटातील मुले एका जागी फार काळ बसण्यास उत्सुक नसतात. ती पुस्तकातल्या गोष्टींशी जोडलेली राहावीत यासाठी पपेट, छोटी खेळणी वापरली जातात. पुस्तकातल्या गोष्टींवर आधारित नाटक बसवले जाते. या नाटकात सगळी मुले सहभागी होतात. ज्या मुलांना गोष्ट ऐकता-ऐकता समजत नाही त्यांना नाटकात सहभागी झाल्यावर कळते.’’

प्रभात रस्ता परिसरातील बालरंजन केंद्रात गेली तीन वर्षे ‘भाषेची गोडी’ शिबीर घेतले जाते. नीला शर्मा यांनी सांगितले, ‘‘विशिष्ट शब्दांवर आधारित कथा-कविता रचण्यासाठी मुलांना प्रोत्साहन दिले जाते. काल्पनिक सहलीसारख्या संकल्पना राबविल्या जातात. गंध, स्पर्श, रंग या अनुषंगाने विविध शब्द मुले सुचवतात. मुलांच्या वाढत्या शब्दसंग्रहामुळे पालकांनाही समाधान वाटते.’’

## * प्रभात कंपनीचा वर्धापनदिन

'प्रभात समयो पातला', 'हासत नाचत जाऊ', 'लखलख चंदेरी तेजाची', 'दोन घडीचा डाव', 'आधी बीज ऐकले', 'आम्ही दैवाचे शेतकरी' अशी आठ दशकांची मोहिनी असलेली 'प्रभातगीते' सादर करून 'प्रभात फिल्म कंपनी'चा ऐंशीवा वर्धापनदिन साजरा झाला.

मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ संगीतकार प्रभाकर जोग यांच्या हस्ते 'संत तुकाराम' या १९३६ मधील गाजलेल्या चित्रपटात बालकलाकाराची भूमिका केलेले यशवंत दामले आणि चित्रपट अभ्यासिका अरुणा दामले यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ समीक्षिका सुलभा तेरणीकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण वाळिंबे, सचिव राजा महाजन 'प्रभात'च्या संस्थापकांपैकी बाबासाहेब फत्तेलाल यांचे चिरंजीव यासीन फत्तेलाल, अभिनेत्री आशा काळे या वेळी उपस्थित होत्या.

दामले म्हणाले, ''सर्वांच्या सहकार्याने 'प्रभात'ची ध्वजा फडकत राहिली याचे समाधान वाटते.'' जोग म्हणाले, ''सदैव प्रयोगशीलता दाखविणाऱ्या 'प्रभात'ने अनेक नवोदितांना संधी देऊन त्यांचे कर्तृत्व फुलविले. सुधीर फडके यांनी मला संधी दिली आणि माझे आयुष्य घडले.'' अरुणा दामले म्हणाल्या, ''दामले यांच्या घराची सदस्य झाल्याने कलेला वाव मिळाला. त्यामुळे मी आनंदी आहे.''

## * 'काला पत्थर' मोहिमेवरील डॉ. संदीप श्रोत्री यांचे पुस्तक

देशाच्या उत्तर दिशेला आपला हिमशुभ्र संभार घेऊन पसरलेला 'हिमालय नावाचा नगाधिराज' जगभरातील गिर्यारोहकांना सतत खुणावतो. जगातील सर्वोच्च शिखर असणाऱ्या 'माउंट एव्हरेस्ट'ची एखादी झलक मिळावी, यासाठी गिर्यारोहकांची धडपड असते. हिमालयाची ही साद सातारा येथील प्रसिद्ध सर्जन डॉ. संदीप श्रोत्री यांच्याही कानी पडली आणि आपल्या अकरा सहकाऱ्यांसह त्यांनी नुकताच 'माउंट एव्हरेस्ट'चा पायथा मानला जाणारा 'काला पत्थर' येथील ट्रेक जिद्दीने पूर्ण केला. जगातील प्रत्येक गिर्यारोहकाच्या मनात २९ मे दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच दिवशी १९५३ मध्ये सकाळी साडेअकरा वाजता शेर्पा तेनसिंग नोर्गे आणि न्यूझीलंडचे गिर्यारोहक सर एडमंड हिलरी यांनी या सर्वोच्च शिखरावर पहिले मानवी पाऊल ठेवले होते. तेव्हापासून आजपर्यंत हजारो जिगरबाज गिर्यारोहकांनी 'माउंट एव्हरेस्ट'चा माथा गाठला आहे. ज्यांना 'माउंट एव्हरेस्ट'वर जाणे आर्थिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या शक्य नाही. पण हिमालयाची साद दुर्लक्षितही करता येत नाही, अशा गिरिप्रेमींसाठी २९ मे या दिवसाचे औचित्य साधून डॉ. श्रोत्री यांनी 'एव्हरेस्टच्या पायथ्याशी' हे पुस्तक लिहून पूर्ण केले आहे. या पुस्तकाला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे दोन शब्द आणि महाराष्ट्राचे पहिले एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण यांची प्रस्तावना लाभली आहे.

पुस्तकाविषयी डॉ. श्रोत्री म्हणाले, ''हिमालय हे व्यसन आहे. ते सुटत नाही. ही देवभूमी पुन्हा पुन्हा साद घालते. तो एक संमोहित करणारा चक्रव्यूह आहे. त्यामध्ये हजारो अडकले, कुणी तिथेच गरगर फिरत राहिले, कुणी तिथेच चिरविश्रांती घेतली. रांगांमागून रांगा, दऱ्यांपाठोपाठ दऱ्या. शिखरांमागोमाग शिखरे चालत राहिलीे तरी समाधान होत नाही, हा प्रत्येकाचा अनुभव आहे. 'काला पत्थर'च्या निमित्ताने मीही तो नुकताच घेतला आणि या मार्गावरील अनुभवांचे, तेथील गावांचे, माणसांचे, निसर्गाचे, प्रतिकूलतेचे, संघर्षाचे आणि सौंदर्याचे एक स्वरूप या पुस्तकाच्या रूपाने शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.''

*** अत्याधुनिक 'वृद्धी' संगणकप्रणाली**

वेळखाऊ प्रवेश प्रक्रिया, विविध शैक्षणिक संस्थांच्या वेगवेगळया कार्यपद्धती यामुळे शैक्षणिक संस्थांना कामात अडचणी येतात. शैक्षणिक संस्थांच्या या अडचणी लक्षात घेऊन प्रा. उपेंद्र लाड यांनी 'वृद्धी' ही संगणकप्रणाली (सॉफ्टवेअर) विकसित केली आहे.

शैक्षणिक संस्थांना उपयोगी पडतील, अशी सॉफ्टवेअर्स सध्या बाजारात आहेत, मात्र महाविद्यालयाची कार्यपद्धती बदलल्यानंतर अशी सॉफ्टवेअर्स निकामी ठरतात. त्यांना नवीन सॉफ्टवेअर विकसित करावे लागते. त्यामुळे महाविद्यालयांना आर्थिक तोटा सोसावा लागतो, तसेच नवीन सॉफ्टवेअरच्या प्रशिक्षणासाठी वेळही खर्च करावा लागतो.

विद्यार्थी, कर्मचारी, ग्रंथालय, वसतिगृह, परीक्षा विभाग, अकाऊंटस ॲण्ड फायनान्स असे विभाग या सॉफ्टवेअरमध्ये आहेत. पालक, विद्यार्थी, महाविद्यालय, विद्यापीठ यंत्रणेला सहजपणे हे सॉफ्टवेअर हाताळता येते. विद्यार्थीनिहाय सर्व प्रकारची माहिती या सॉफ्टवेअरमधून मिळते.

प्रा. लाड यांनी त्यांच्या 'वृद्धी'या सॉफ्टवेअरचा वापर सर्वप्रथम त्यांच्या मालेगाव येथील सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात केला. त्याचा चांगलाच उपयोग झाला. सध्या या सॉफ्टवेअरचा उपयोग पुण्यात महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीत केला जात आहे.

प्रा. लाड म्हणाले, ''शैक्षणिक संस्थांचा आर्थिक ताळेबंद, प्रवेश अर्ज, शिष्यवृत्ती, वैद्यकीय, अभियांत्रिकी, बी.एड., डी.एड. अभ्यासक्रमाचे नियम, अटी यानुसार सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. त्यात शैक्षणिक संस्थेच्या विविध संस्था एकमेकांना जोडण्यात आल्या आहेत. कामाच्या आवश्यकतेनुसार प्रत्येकाला वेगवेगळे 'पासवर्ड' देण्यात आले आहेत. या सॉफ्टवेअरच्या मदतीने संस्थेच्या सर्व महाविद्यालयांच्या कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता आणता येते.''

अधिक माहितीसाठी संपर्क : WWW.vriddhi-software.com.

### * लष्कराला पुस्तकांची भेट

''शिक्षण आणि राष्ट्राची सुरक्षा हे दोन्ही विषय एकमेकांना जोडलेले आहेत. जो माणूस शिकतो, त्याला आपल्या सभोवताली घडणाऱ्या गोष्टींची जाण येते आणि असा माणूस देशाच्या सुरक्षिततेविषयी सदैव जागरूक असतो.'' असे मत 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन'चे संचालक डॉ. गौतम सेन यांनी व्यक्त केले.

डॉ. सेन यांनी आपल्या संग्रहातील संरक्षणशास्त्र, सामरिकशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध, इतिहास आदी पुस्तके लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाच्या ग्रंथालयास भेट दिली. या वेळी डॉ. सेन म्हणाले, ''लोकांचा असा समज असतो, की लष्करी सेवांमधील व्यक्तींचा पुस्तके आणि अभ्यास या गोष्टीशी खूप कमी संबंध असतो. पण वास्तविक पाहता लष्करी सेवेत असताना इतर कोणत्याही सेवेपेक्षा मी अधिक अभ्यास केला.''

लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल नोबल थंबूराज म्हणाले, ''जेव्हा एखादा माणूस अभ्यास किंवा संशोधन करीत असतो, तेव्हा त्याच्या जीवनात पुस्तकांना अनन्यसाधारण महत्त्व असते. डॉ. गौतम सेन यांनी पस्तीस वर्षांपासून जमा केलेल्या खजिन्यातील अमूल्य ठेवा ग्रंथालयासाठी दिला, ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे.''

### * 'पाऊलखुणा'चे प्रकाशन

हुशार, समंजस आणि चौकस बुद्धीच्या युवा पिढीमध्ये चांगल्या संस्कारांचा अभाव आहे; ती उणीव दूर करण्याचे सामर्थ्य 'पाऊलखुणा' या पुस्तकात आहे, असे मत पद्मभूषण डॉ. के. एच. संचेती यांनी व्यक्त केले. सिग्नेट पब्लिकेशन्सतर्फे श्याम भालेराव यांच्या 'पाऊलखुणा' या पुस्तकाचे प्रकाशन 'सिम्बायोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार आणि 'सकाळ'चे कार्यकारी संपादक (कॉर्पोरेट) अभय कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. संचेती म्हणाले, ''सुख, समाधान या गोष्टी मॉलमध्ये मिळत नाहीत, तर त्या संस्कारक्षम पुस्तकातूनच मिळतात.'' मुजुमदार म्हणाले, ''बालपणी संस्कारासाठी 'मनाचे श्लोक' पुस्तक देण्यात येते. हे पुस्तक म्हणजे मनाचे श्लोक आहे.'' कुलकर्णी म्हणाले, ''कुटुंबव्यवस्था हे आपल्या समाजाचे बलस्थान आहे. कुटुंबात होणाऱ्या संस्कारातून युवा पिढी घडेल. ते काम कायद्याच्या बडग्याने होणार नाही.'' या वेळी श्याम भालेराव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रकाशक प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविक केले.

### * वृत्तपत्रांच्या जगात भारत दुसऱ्या क्रमांकावर

वाढती साक्षरता आणि नवे तंत्रज्ञान यामुळे वृत्तपत्रांच्या जगात भारताने दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्यूजपेपर्स'च्या (वॅन) नव्या पाहणीनुसार वृत्तपत्रांच्या जगात चीन पहिल्या क्रमांकावर आहे. तेथे वृत्तपत्रांच्या दहा कोटी ७० लाख प्रती दररोज खपतात. त्यापाठोपाठ भारत असून, आपल्याकडे

वृत्तपत्रांच्या दररोज नऊ कोटी ९० लाख प्रती खपतात. सहा कोटी ८० लाख प्रतींच्या खपासह जपान तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर 'सुपर पॉवर' असलेली अमेरिका चौथ्या क्रमांकावर आहे. तेथे वृत्तपत्रांच्या पाच कोटी दहा लाख प्रती दररोज खपतात. भारतातील वृत्तपत्रांचा खप गेल्या वर्षी ११.२ टक्क्यांनी, तर गेल्या पाच वर्षांत ३५.५१ टक्क्यांनी वाढला आहे.

उत्तम खप असलेल्या जगातील शंभर वृत्तपत्रांपैकी ७४ वृत्तपत्रे आशिया खंडातून प्रसिद्ध होतात. त्यातील ६२ वृत्तपत्रे चीन, भारत व जपानमधून प्रसिद्ध होतात. अनेक आव्हाने व कठीण काळ असूनही वृत्तपत्रांच्या जागतिक खपात गेल्या वर्षी २.५७ टक्के, तर पाच वर्षांत ९.३९ टक्क्यांनी वाढ झाल्याचे या पाहणीत आढळले. ५३ कोटी २० लाख प्रतींच्या खपाने नवा विक्रम प्रस्थापित झाला. यात मोफत वाटप करण्यात येणाऱ्या दैनिकांचा समावेश केल्यास हा आकडा ५७ कोटी ३० लाख प्रतींवर जातो. वृत्तपत्रांच्या जागतिक खपात मोफत वृत्तपत्रांची टक्केवारी ७ आहे. जाहिरातींच्या क्षेत्रातही मुद्रण माध्यमाने, म्हणजे वृत्तपत्रांनी आघाडी मारली आहे.

### * 'पॉप्युलर बुक हाऊस'चा मान्सून सेल

'पॉप्युलर बुक हाऊस'च्या 'मान्सून सेल'चे उद्घाटन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले.

'मान्सून सेल' ३० जूनपर्यंत सुरू होता. या काळात विविध प्रकारच्या पुस्तकांवर भरघोस सवलत देण्यात येणार आहे.

'कॉम्प्युटर सायन्स' (२५ टक्के), इंग्रजी, फिक्शन, इंग्रजी नॉन फिक्शन, पाककला, आरोग्य, व्यवस्थापन, मराठी कादंबऱ्या तसेच हिंदी ललित कथा आणि कादंबऱ्या यावरही १५ टक्के सवलत देण्यात आली. शेरोशायरी आणि काही जुन्या पुस्तकांवर तब्बल ३० ते ७० टक्के सवलत होती, अशी माहिती 'पॉप्युलर बुक हाऊस'चे सुनील गाडगीळ यांनी दिली.

### * 'अक्षरधारा'चा बालकुमार पुस्तक मेळा

'अक्षरधारा'तर्फे भरविण्यात आलेल्या पहिल्या बालकुमार पुस्तक मेळ्याचे उद्घाटन 'टिंग्या' फेम शरद गोयेकर याच्या हस्ते झाले. कर्वे रस्त्यावरील अंबर हॉल येते २२ जूनपर्यंत हा मेळा सुरू होता. बालकुमार साहित्यावर २५ टक्के सवलत देण्यात आली होती.

'विविध विषयांची पुस्तके वाचा, वाचनातूनच पुढे जा आणि वाचताना लेखकांचीसुद्धा ओळख करू घ्या' असा सल्ला शरद गोयेकर याने उद्घाटनप्रसंगी बालमित्रांना दिला. प्रसिद्ध कवयित्री हेमा लेले, नाट्यसंस्कार कला अकादमीचे अध्यक्ष प्रकाश पारखी. सुनील पाठक, 'अक्षरधारा'चे संचालक रमेश राठिवडेकर, राजेंद्र देशपांडे, लक्ष्मण राठिवडेकर या वेळी उपस्थित होते. सिद्धार्थ बेंद्रे यांनी गोयेकर याच्याशी संवाद

साधला. उत्तरार्धात 'डम डम डंबोला' हे बालनाट्य सादर झाले.

गोयेकर म्हणाला, ''मी आळेफाट्याजवळील राजुरी गावाचा. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात विशेष पारितोषिक घेण्यासाठी पुण्याला आलो होतो. तेव्हा प्रिया पाटील यांनी 'मी तुझ्या शिक्षणाचा खर्च करेन, तू आमच्याकडे राहशील का?' असे विचारले. मला खूप शिकायचे असल्याने मी लगेच होकार दिला. आई-बाबांप्रमाणेच हे आई-बाबादेखील माझे खूप लाड करतात. आता मी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणार आहे. अभिनयाप्रमाणेच मला अभ्यासातूनही पुढे जायचे आहे.''

### * विद्यापीठ अभ्यासक्रमात यशवंत, पवार यांची पुस्तके

दलित कवितेला वेगळे वळण देणारा लोकनाथ यशवंत यांचा 'आता होऊन जाऊ द्या' हा काव्यसंग्रह आणि समाजव्यवस्थेने भटक्या विमुक्तांच्या पदरात बांधलेल्या अथांग वेदना जगासमोर मांडणारे अशोक पवार यांचे 'बिराड' हे आत्मकथन पुणे विद्यापीठ एम. ए. च्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाले आहे. कवी लोकनाथ यशवंत यांचा १९८९ मध्ये प्रकाशित झालेला 'आता होऊन जाऊ द्या' हा कवितासंग्रह इंदूरच्या अहिल्याबाई होळकर विद्यापीठात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एम. ए. च्या अभ्यासक्रमाला लागला आहे.

### * सलील कुलकर्णी यांचे संगीत विद्यालय

संगीतकार-गायक सलील कुलकर्णी लवकरच कोथरूडमध्ये संगीत विद्यालय (म्युझिक स्कूल) सुरू करणार आहेत. विविध गटातील होतकरी गायक-गायिकांना भावसंगीत शिकविणे हा त्याचा मूळ उद्देश असेल.

सलील कुलकर्णी यांच्यासह गायिका अंजली मराठे-कुलकर्णी, चैतन्य कुलकर्णी, मेघना सरदार, प्राची कोकीळ, सई टेंभेकर असे अनेक जण तेथे शिकवणार आहेत.

त्याशिवाय नामवंत गायक, संगीतकार, कवी यांची संगीताविषयी व्याख्याने, प्रशिक्षण असेही उपक्रम असतील. 'प्रामुख्याने संगीत शिकण्याची अनिवार ओढ आणि किमान जाण हेच प्रवेशासाठी निकष असतील. गाण्याबरोबरच काव्य, संगीतरचना, संगीतकारांची शैली या सर्व अंगाने शिक्षण देण्याचा विचार आहे.'

''माझ्याकडे सध्या काहीजण गायन शिकतात, पण सर्वांसाठी काहीतरी करावे, अशी इच्छा होती. 'सारेगमप'च्या निमित्तानेही अनेक जणांनी गाणे शिकण्याची इच्छा व्यक्त केली. सादरीकरणाच्या दृष्टीने भावसंगीत शिकविण्यासाठी संगीत शिक्षण विद्यालय सुरू करण्याचा निर्णय सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने घेतला आहे,'' असे सलील कुलकर्णी यांनी सांगितले.

### * शासकीय ग्रंथालयांचे संगणकीकरण

राज्यातील शासकीय ग्रंथालयांच्या संगणकीकरणाचे काम लवकरच हाती

घेण्यात येणार असून पुण्याच्या शासकीय विभागीय ग्रंथालयाची यासाठी 'पथदर्शी प्रकल्प' (पायलट प्रोजेक्ट) म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने (एमकेसीएल) या संगणकीकरणासाठी पुढाकार घेतला आहे. राज्यातील शासकीय ग्रंथालये संगणकाच्या जाळ्याने जोडण्यात येणार आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात या आधुनिक पद्धतीचा अवलंब करण्याच्या उद्देशातून संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

विश्रामबागवाडा येथे १२ जून रोजी राज्यातील ग्रंथालयांचे ग्रंथपाल आणि प्रतिनिधी यांची बैठक झाली. 'एमकेसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत आणि मुंबई विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल ए. सी. टिकेकर या वेळी ग्रंथालयामध्ये संगणकाचा वापर आणि संगणक जाळ्याच्या साह्याने ग्रंथालये कशी जोडता येतात याविषयी मार्गदर्शन केले.

या संदर्भात माहिती देताना ग्रंथपाल गणेश म्हणाले, ''विश्रामबागवाडा शासकीय ग्रंथालयाचे संकेतस्थळ सुरू करण्यासंदर्भात 'ट्रान्स लिटरल टेक्नॉलॉजीज'चे दिलीप खापरे यांनी विनामोबदला सहकार्य करण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यातून ग्रंथालय संगणकीकरणाच्या प्रक्रियेस चालना मिळाली. संगणकीकरणाबरोबरच संकेतस्थळ सुरू करण्याचा प्रस्तावदेखील मार्गी लागेल.''

कोलकाता येथील राजा राममोहन रॉय फाउंडेशतर्फे शासकीय ग्रंथालयास दोन लाख रुपयांचे अनुदान मिळाले आहे. ग्रंथालयामध्ये मुलांसाठी स्वतंत्र दालन सुरू करण्यासाठी दीड लाख रुपये, तर पुस्तक प्रदर्शन आणि ग्रंथालय जागृती उपक्रम राबविण्यासाठी पन्नास हजार रुपये असे या अनुदानाचे स्वरूप आहे. या निधीचा विनियोग तीन महिन्यांमध्ये करावयाचा आहे. मुलांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांचे त्यासाठी मार्गदर्शन घेण्यात येणार असून, १५ ऑगस्टपूर्वी हे दालन मूर्त रूपात यावे या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचे तायडे यांनी सांगितले.

*** समाजशास्त्रीय अभ्यासासाठी 'वंशावळ'**

''इतिहास कसा आणि कोणी घडवला, तो घडवणाऱ्या व्यक्ती कुठल्या वंशाच्या होत्या, याची समाजशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त मिळते.'' असे मत ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी व्यक्त केले.

दिगंबर देशपांडे लिखित 'वंशावळ' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. गोखले यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रतापराव पवार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. शं. ना. नवलगुंदकर आणि ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार उपस्थित होते.

डॉ. गोखले म्हणाले. ''महाराष्ट्र ही रत्नांची भूमी आहे. त्यातील शिक्षण, समाज कलाकार, राजकारण, उद्योजक, पत्रकारिता आणि संघटन क्षेत्रातील मान्यवरांच्या वंशावळी आणि अल्पचरित्रांचा या पुस्तकात समावेश आहे. आजच्या परदेशी जाणाऱ्या मुलांना जर आपल्या पूर्वजांची अशी माहिती मिळाली तर त्यांना घराविषयी

कुटुंबाविषयी आणि देशाविषयी अभिमान वाटेल. या पुस्तकातून समाजात त्या काळी झालेले आंतरजातीय विवाहदेखील दिसतात. समाजातील हे चलनवलन समाजशास्त्राच्या दृष्टीने मोलाचे वाटते. देशपांडे यांनी असेच काम अन्य क्षेत्रांतील मान्यवरांच्या संदर्भातही करावे.''

पवार म्हणाले, ''दस्तऐवजीकरणाची परंपराच आपल्याकडे नाही. त्यामुळे इतिहासाचे मोलाचे साधन कायमच दुर्लक्षित राहिले आहे. युरोपीय आणि अन्य देशांत ही परंपरा मोठी आहे. त्यांच्यातही धर्म, पंथ, जात यांची भिन्नता होती; पण ते बाजूला ठेवून त्यांनी प्रगती साधली. आपण मात्र आजही जाती, वंश, प्रांत यांच्या भिन्नतेत अडकलो आहोत. त्याचा फायदा राजकारणी घेतात. आपण बोलताना 'हे विश्वचि माझे घर' असे म्हणतो; पण वागताना भिन्न कृती करतो. हा ढोंगीपणा जेवढा कमी होईल तेवढे समाजाचे भले होईल. या पुस्तकाच्या निमित्ताने देशपांडे यांनी 'रेकॉर्ड' जपण्याचे काम परिश्रमपूर्वक केले आहे.''

प्रा. मिरासदार म्हणाले, ''हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्राचा इतिहास आहे. यामध्ये थोर व्यक्तींची चरित्रे आणि वंशावळी आहेत आणि तोच इतिहास आहे. कारण थोर व्यक्तीच इतिहास घडवतात.''

*** बाळगोपाळांसाठी 'घटोत्कच'**

'बालगणेश'च्या यशानंतर शेमारू एंटरमेन्टचा 'घटोत्कच-द मास्टर ऑफ मॅजिक' हा नवा ॲनिमेशनपट ता. २३ मे रोजी प्रदर्शित झाला. या ॲनिमेशनपटाची मध्यवर्ती व्यक्तिरेखा घटोत्कच उर्फ घट्टू ही आहे. महाकाय भीमपुत्राने बालपणात केलेले उदंड प्रताप लहान मुलांना नक्की आवडतील. हिंदी, इंग्रजी, बंगाली आणि चार दाक्षिणात्य भाषांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होत आहे.

'पुष्पक विमान', 'अप्पू राजा' आणि 'सन ऑफ अलादिन' या चित्रपटांचे दिग्दर्शक सिंगतम श्रीनिवास राव यांनीच या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. धमाल जादू आणि महाकाय भीमपुत्राचे अचाट खाणे लहान मुलांना आकर्षित करील.

श्रीनिवास राव यांनीच या चित्रपटाला संगीत दिले आहे. गीतकार समीर यांनी या चित्रपटातील आठ गाण्यांना शब्द दिले आहेत. दलेर मेहंदी, शान आणि श्रेया घोषाल यांनी ही गीते गायली आहेत.

यातील ॲनिमेशनचा दर्जा उत्तम राखण्यासाठी भारतासह अमेरिका, फिलिपिन्स, कॅनडातील ॲनिमेशनतज्ज्ञांनी एकत्रित प्रयत्न केले आहेत. शेमारू एन्टरटेनन्मेंट आणि सन ॲनिमेटिक्सने या चित्रपटाची सहनिर्मिती केली आहे.

*** कोथरूड येथे राष्ट्रीय कीर्तन महोत्सव**

''सध्याच्या आधुनिक युगात श्रोतृवर्गही बदललला असल्याने कीर्तनकारांची आकलनशक्ती, बौद्धिक पात्रता वाढविण्यासाठी कीर्तनाचे प्रशिक्षण आवश्यक आहे,''

असे मत कीर्तन महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दिलीप डबीर यांनी व्यक्त केले.

'विश्वसखा' संचालित कीर्तन महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय कीर्तन महोत्सव व कीर्तन प्रशिक्षिण शिबिराचे उद्घाटन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले.

डबीर म्हणाले, ''पत्रकार व कीर्तनकार यांचे संबंध फार जुने आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळात 'काळ'चे संपादक शि. म. परांजपे खुन्या मुरलीधराच्या मंदिरात कीर्तन करत असत. दोन्ही माध्यमांतून त्यांनी ब्रिटिशसत्तेविरुद्ध आवाज उठविला होता.''

कीर्तनात ध्वनिऊर्जा आणि संगीतातील लय-तालाचा वापर केला जातो; यामुळे कीर्तनातून समाजप्रबोधन प्रभावीपणे होऊ शकते.

''कीर्तन महाविद्यालयातील विद्यार्थी रामटेकच्या कवी कालिदास विद्यापीठाच्या माध्यमातून बी. ए.ची पदवी परीक्षा देणार आहेत.'' अशी माहिती प्राचार्य अपामार्जने यांनी दिली.

कीर्तन महोत्सव २० ते २८ मेपर्यंत चालू होता. पुढील कीर्तनकार त्यात सहभागी होते. मोरेश्वर जोशी (२२ मे), न. चि. अपामार्जने (२२ मे), डॉ. दिलीप डबीर (२३ मे), योगेश्वर उपासनी (२४ मे), अजय अपामार्जने (२५ मे), सुनील चिंचोळकर व स्मिता आजगावकर (२६ मे), गोपाळकाल्याचे कीर्तन न. चि. अपामार्जने (२८ मे).

*** पहिले ग्रामीण दलित आदिवासी साहित्य संमेलन**

बुलडाणा जिल्ह्यातील जळगाव (जामोद) येथे महाराष्ट्र दिनी साहित्य दलित आदिवासी साहित्य संमेलन आयोजित केलं होतं.

संमेलनाध्यक्ष औरंगाबादचे ज्येष्ठ कवी तुळशी परब आणि उद्घाटक कविवर्य डॉ. वसंत आबाजी डहाके होते.

उद्घाटनपर बोलताना डहाके म्हणाले की, ''मानव जीवनाशी साहित्याचा संबंध येतो. साहित्यातून केवळ मनोरंजनाची अपेक्षा ठेवता येणार नाही. जीवनाला प्रबोधन करणारे साहित्य एक सशक्त माध्यम ठरते. राजसत्ता, धार्मिक सत्ता, आर्थिक सत्ता या तिन्ही सत्तांपेक्षा साहित्याची सत्ता ही प्रभावी ठरते. कारण ही सत्ता माणसाच्या मनावर राज्य करते.''

ग्रामीण दलित आदिवासी जनतेच्या शोषणाचा आलेख तुलसी परब यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मांडला. अज्ञान, दारिद्र्य आणि अंधश्रद्धा या चक्रव्यूहात तळागाळातील जनता सापडली आहे. चळवळीच्या अभावाने त्यांचे शोषण सुरू आहे. त्यांना शोषणमुक्त करण्यासाठी लेखणीबरोबरच साहित्यिकांनी चळवळीच्या माध्यमातून पुढे यावे असे आवाहन केले.

यावेळी आमदार संजय कुटे, माजी आमदार कृष्णराव इंगळे, स्वागताध्यक्ष प्रकाश पाटील, दिनकर दाभाडे, नगराध्यक्ष गजानन वाघ, शब्दवेधचे संपादक दा.

गो. काळे, लालाशेठ चांडक, विकास पुंडलिक (इंदौर) सभापती गजानन भटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### * ग्रंथालीच्या पुस्तकांचे प्रकाशन

''उच्चशिक्षित तरुण हजारो निरपराधांचा जीव घेण्यासाठी स्वत: मानवी बॉम्ब होण्यास तयार होतात. दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी आधुनिक दहशतवाद्यांच्या प्रेरणांचा शोध घेणे आवश्यक आहे,'' असे विचार विश्वास मेहेंदळे यांनी व्यक्त केले.

'नाझी नरसंहार' आणि 'तांबडे रक्त नवा हल्ला' या ग्रंथालीच्या दोन पुस्तकांच्या प्रकाशनानिमित्त आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार अरविंद गोखले, लेखक कुमार नवाथे, अरुण मोकाशी, किशोर गायकवाड, सतीश राजमाचीकर, दिनकर गांगल उपस्थित होते. मेहेंदळे म्हणाले, ''नाझींच्या दहशतवादाला आर्य वंशाचा अभिमान आणि ज्यूंविषयीचा तिरस्कार कारणीभूत होता. त्यानंतरही घडलेल्या अनेक नरसंहारांमागे काही ना काही कारणमीमांसा होती. मात्र सध्या जगात सर्वदूर पसरलेल्या दहशतवादामध्ये सहभागी उच्चशिक्षित तरुण पाहता, त्यांच्या प्रेरणांचा शोध घेण्याची आवश्यकता वाटते. हजारो निरपराधांचे बळी घेणारे हे उच्चशिक्षित धार्मिक विद्वेषाला बळी कसे पडतात, याचे कारण शोधणे आवश्यकत आहे.''

गोखले म्हणाले, ''नाझी, तालिबान असो किंवा व्यक्तिस्वातंत्र्यावर होणारा हल्ला असो, ही सर्व दहशतवादाचीच विविध रूप आहेत. मतांच्या राजकारणाचा परिणाम असणारा हा दहशतवाद संपवण्यासाठी देशाच्या सर्वसामान्यांमधून चळवळ निर्माण होणे आवश्यक आहे.''

### * म. द. हातकणंगलेकर आणि जीए

स्वत:भोवती स्वत:च्या साहित्यकृतींप्रमाणेच 'गूढता' असणाऱ्या जी. ए. कुलकर्णी यांच्या आठवणींचा पट साहित्य संमेलनाध्यक्ष म. द. हातकणंगलेकर यांनी 'साहित्य अकादमी'च्या 'थ्रू माय विंडो' या उपक्रमांतर्गत जी. ए. कुलकर्णी : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर बोलताना उलगडून दाखवला.

कृष्णा किंबहुने यांनी प्रा. हातकणंगलेकरांचा परिचय करून दिला.

हातकणंगलेकर म्हणाले, ''सांगली आणि धारवाड येथील शैक्षणिक संस्थांमध्ये जीए अध्यापक म्हणून कार्यरत होते. तब्बल तीस वर्षे त्यांनी धारवाड येथे काम केले. त्यांचे बरेच लेखन या काळातले आहे.'' जीए ज्या घरात वास्तव्यास होते, ती इमारत त्यांचे स्मारक म्हणून घोषित व्हावी, यासाठी प्रयत्नशील असल्याचे हातकणंगलेकर म्हणाले. ''स्वत:चे खासगीपण जीए पराकोटीने जपत असत. त्यात अधिक्षेप केलेला त्यांना रुचत नसे. तसेच कुणी त्यांना 'गृहीत' धरलेलेही आवडत नसे. त्यांच्या सहवासात जी मोजकी माणसे आली ती त्यांच्या लेखनातून काही ठिकाणी प्रकट

झाली आहेत. मला त्यांचा सहवास मिळाला आणि पत्ररूपानेही आमचे संबंध टिकून राहिले. त्यामुळे त्यांचे आयुष्य, स्वभाव, चरित्र आणि साहित्य यांच्यातील काही गोष्टींची संगती लावणे मला शक्य झाले.''

*** आता तरी हसा ना : मुलांसाठी नवे नाटक**

बालनाट्य चळवळीत मोलाचे कार्य करणाऱ्या 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर'तर्फे १४ जूनला 'आता तरी हसा ना' हे नवे बालनाट्य सादर झाले. लेखन प्रमोद काळे यांचे तर दिग्दर्शक सचिन जोशी आणि काळे यांचे होते.

हसवणे हरवलेले दोन विदूषक चार व्रात्य मुलांना भेटतात. त्यांचे हसणे परत मिळवण्यासाठी सर्वजण प्रयत्न करण्याचे ठरवतात. त्या शोधाच्या प्रवासाचे परिणाम नाटक सांगते. हसतखेळत मुलांमध्ये चांगले-वाईट, योग्य-अयोग्य यांची जाणीव हे नाटक निर्माण करते. हे नाटक मुलांसह पालकांनीही पाहावे असे आहे. सेंटरने आजवर 'पहिलं पान', 'पण आम्हाला खेळायचंय', 'आई पण बाबा पण', 'मित्र माझे', 'रस्त्याचं गाणं' अशी बालनाट्ये रंगमंचावर आणली आहेत. नाटकाचे संगीत प्रदीप वैद्य यांचे आहे. अपूर्व साठे, भक्ती रत्नपारखी, हर्षद राजपाठक, अनुजा कोल्हटकर, मुग्धाली जातेगावकर, प्राची मते, अमोल गोखले, अमिता धडफळे, अमिता घुगरी आणि दुर्गेश काटकर यांनी भूमिका केली.

*** 'दंगलनामा' लंडनच्या नाट्यमहोत्सवात**

आशिया खंडातील आठ देशांच्या रंगकर्मींचा महोत्सव १३ ते २१ जूनपासून लंडनमध्ये भरला होता. 'लंडन इंटरनॅशनल फेस्टिवल फॉर थिएटर'(लिफ्ट)ने आयोजिलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन प्रसाद वनारसे यांनी बसविलेल्या 'दंगलनामा' या नाटकाने झाले. लंडनमध्ये 'थिएटर रॉयल स्ट्रॅटफर्ड ईस्ट'इथे या नाटकाचे सात प्रयोग झाले.

ईस्ट लंडन भागातील स्ट्रॅटफर्डच्या मंडळींनी हा महोत्सव आयोजित केला होता. कुठले विषय महोत्सवात मांडले जावेत, हे वेगवेगळ्या ९० कार्यशाळांतून नक्की झाले. त्यातूनच जगात चाललेल्या चळवळी आणि प्रश्नांची चर्चा करणारे विषय पुढे आले.

१९९३ च्या मुंबई बॉंबस्फोटानंतर 'अक्षर'च्या दिवाळी अंकात 'दंगलनामा' ही सात लेखांची मालिका आली होती. या मूळ लेखांवरून कलावंतांनी तालमीत सदर केलेल्या प्रसंगच इथे नाटकात घडतात. यातले सारे कलावंत 'फ्लेम'या संस्थेचे विद्यार्थी होते. ते वेगवेगळ्या प्रांतांतून आलेले असल्याने नाटकाची भाषाही मराठी नव्हती. हिंदी, इंग्रजी, गुजराती, कानडी व पंजाबी भाषाही यात होत्या. असे लेखकांनी सांगितले.

संयम, अहिंसा ही मूल्ये आपण प्रत्यक्ष व्यवहारात कशी विसरतो हा विचारही

या नाटकातून मांडला आहे.

*** प्रा. लीला अर्जुनवाडकर यांचा अमृतमहोत्सव**

वृत्ती आणि वर्तनशील अभिजातता, जागरूक आणि रससिद्ध श्रोत्या, सखोल चिंतन आणि चिकित्सा यांचा अनोखा मिलाफ असलेल्या प्रा. लीला अर्जुनवाडकर यांच्या 'लीलाकमलपत्राणि' या ललितलेख संग्रहामध्ये संस्कृत आणि संस्कृतीचे सौंदर्य सामावले आहे, असे मत प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केले.

वैदिक संशोधन मंडळातर्फे प्रा. अर्जुनवाडकरलिखित 'लीलाकमलपत्राणि' या लेखसंग्रहाचे प्रकाशन झाले. या वेळी अमृतमहोत्सवानिमित्त अर्जुनवाडकर यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी भगवान जोशी होते. फादर फ्रान्सिस डिसा याप्रसंगी उपस्थित होते.

डॉ. ढेरे म्हणाल्या, ''केवळ अर्जुनवाडकरबाईंमुळेच संस्कृत हा माझा प्रेमाचा, आवडीचा विषय झाला. त्या मला संस्कृत शिकवायला होत्या, हे माझे भाग्य आहे. बाईंच्या तासाला बसण्याचा आनंद काही और असायचा. बाई या अभ्यासू शिक्षक तर आहेतच, पण विद्यार्थ्यांना समृद्ध करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. सुसूत्र, नेमकं आणि रेखीव बोलणं हे वैशिष्ट्य असलेल्या बाईंच्या पुस्तकातून त्यांच्या लेखनाचा विस्तार आणि समृद्धी जागोजागी दिसते.''

फादर डिसा म्हणाले, ''लीलाबाई विवेक आणि ज्ञानाच्या मूर्तिमंत उदाहरण आहेत. मैत्री ही ठरवून होत नसते, ती आपोआप घडते. त्या अर्थाने लीलाबाई या माझ्या सच्च्या मित्र आहेत.'' जोशी म्हणाले, ''बाईंचे शिकविणे वाचिक आणि कायिक अभिनयाचा वस्तुपाठ असायचे. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, रसिकता आणि संस्कृती जोपासण्याचे काम करणाऱ्या बाईंचे जीवन नंदादीपासारखे तेवत राहो.''

अर्जुनवाडकर म्हणाल्या, ''काही वेळा सहजपणाने, तर काही वेळा आवश्यकता म्हणून लेखन केलेले 'लीलाकमलपत्राणि' हे पुस्तक म्हणजे कमळाच्या पाकळ्या आहेत. त्यासाठी मी केलेला अभ्यास, घेतलेले कष्ट आणि मला मिळालेला आनंद यातच सगळं वसूल झालं. पण डॉ. आशा गुर्जर, डॉ. भाग्यलता पाटसकर, डॉ. शैलजा कात्रे यांनी या पुस्तकासाठी खूप कष्ट घेतले. प्रसंगी माझा सासुरवास त्यांना सोसावा लागला. तुमच्या सगळ्यांचे प्रेम असेच माझ्यावर राहो.''

*** गुलजार यांच्या हस्ते कुसुमाग्रज अल्बमचे प्रकाश**

'मराठी मेरी मादरी जबान नही लेकिन उस जमीन की बोली है जिसने पिछले पचास बरसों से मेरी परवरिश की है' अशी कृतज्ञता बाळगणाऱ्या गुलजार यांच्या उपस्थितीत 'टाईम्स म्युझिक' निर्मित आणि 'महाराष्ट्र टाइम्स' प्रस्तुत 'वि. वा' कुसुमाग्रज या अल्बमचे प्रकाशन करण्यात आले.

'कुसुमाग्रजकी चुनी-सुनी नज्मे' नावाच्या हिंदी-उर्दू संग्रहातून गुलजार यांनी

कुसुमाग्रजांच्या कविता भावांतरी केल्या आहेत. 'तात्यासाहेबांच्या कवितांचा हा संग्रह मी नाशिकमध्ये त्यांच्या चरणी आणून ठेवत नाही तोपर्यंत अपुरा होता,' अशी भावना जपत गुलजार नाशिकमध्ये आले होते. त्यानिमित्ताने कुसुमाग्रज प्रतिष्ठानने मराठी विद्या प्रसारक समाजच्या रावसाहेब थोरात सभागृहात 'मु. पो. कुसुमाग्रज' हा अनोखा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात गुलजार यांनी कुसुमाग्रजांच्या भावांतरीत केलेल्या हिंदी-उर्दू कविता सादर केल्या; त्यांचे मुळ मराठी रूप सौमित्रनी सादर केले.

'व्यावसायिकता सांभाळत टाइम्स म्युझिक साहित्यामध्ये या अल्बमद्वारे फार मोलाची भर घालत आहे.' अशी दाद गुलजार यांनी दिली. कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल म्हणाले, ''गुलजारांसारखा प्रतिभावान माणूस कवितांच्या माध्यमातून कुसुमाग्रजांना रसिकांसमोर घेऊन आला आहे. कुसुमाग्रजांचे शब्द एका वेगळ्या भाषेत सादर करतानाच, त्या शब्दांचा भावार्थ तसाच ठेवण्याचा सुवर्णमध्ये त्यांनी यातून साधला आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेतील सामाजिक, राजकीय आणि विशेष म्हणजे माणसांसंदर्भातला आशय, त्यातला भाव गुलजारांना रुचला असावा म्हणूनच अनुवादित कवितेतील शब्द न् शब्द जणू तात्यांचाच वाटावा असा त्याचा बाज राहिला आहे.''

कुसुमाग्रजांच्या आशयांची गुलजार यांनी सहजपणे केलेली मांडणी साहित्याला भाषेची, प्रांताची बंधने नसतात याचाही अनुभव देत गेली. आपल्या कवितांमधून सामाजिक प्रश्नांबरोबरच जगण्याचा शोध घेणारी कुसुमाग्रजांची कविता अनेकांना जगण्यासाठी बळही पुरवत होती.

आश्चर्य, पुतळा, रद्दी, निरभ्र, आधार, कणा, प्रार्थना, नट अशा कवितांच्या सादरीकरणाबरोबरच कवितेतल्या सेन्सिबिलिटीची, कवितेतल्या भाषिक प्रयोगांची साध्या सोप्या शब्दकळेची अर्थसंपन्नता गुलजार यांनी उलगडून दाखवली.

*** 'भाषेच्या स्वाभिमानासाठी संगणक ज्ञान हवे'**

''मराठीचा स्वाभिमान आवश्यकच आहे, मात्र तो मनात ठेवायचा असतो. जागतिकीकरणाच्या युगात पोटाला भूक लागल्यावर मराठी म्हणून नोकरी मिळणार नाही. त्यामुळे भाषेच्या स्वाभिमानासाठी हातात काठ्या घेण्यापेक्षा संगणक व इंग्रजीचे ज्ञान घेणे आवश्यक आहे.'' असे मत भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस पूनम महाजन यांनी व्यक्त केले.

भारतीय जनता पक्ष व साने गुरुजी तरुण मंडळाच्या वतीने पेस कॉम्प्युटरच्या सहकार्याने आयोजित मोफत संगणक प्रशिक्षण वर्गाचा समारोप त्यांच्या हस्ते झाला.

त्या म्हणाल्या, ''जागतिकीकरणाच्या काळामध्ये देशाला महासत्तेकडे घेऊन जाण्याचा विचार होणे गरजेचे आहे. त्यासाठी संगणकाची क्रांती महत्त्वाची आहे. भारतीय तरुण आता प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहे. हाच तरुण भारताला महासत्तेकडे घेऊन जाणार आहे. त्यासाठी त्याच्याकडे आधुनिक विचार गरजेचा आहे. केवळ

मराठीचा स्वाभिमान मनात ठेवावा. मराठीतून शिक्षण असू द्या, पण इंग्रजीवरही तितकेच प्रभुत्व गरजेचे आहे.

वडील प्रमोद महाजन यांचे संगणक क्रांतीबाबतचे विविध विचार पूनम महाजन यांनी या कार्यक्रमात सांगितले. मोबाईलच्या क्षेत्रामध्ये त्यांनी क्रांती घडवून आणली. संगणक क्रांतीचे जनक राजीव गांधी ठरले, मात्र नंतरच्या काळात त्यावर काहीच झाले नाही. केवळ भाजपनेच सत्तेच्या काळात त्याबाबत काम केले. प्रमोदजी माहिती-तंत्रज्ञान खात्याचे मंत्री झाले, तेव्हा त्यांचा या विषयाचा अभ्यास होता. पण संगणकातील एबीसीडी येत नव्हती, त्यामुळे त्यांनी प्रथम संगणकाचे शिक्षण घेतले व सर्व खासदारांकडूनही ते सक्तीने करवून घेतले, अशी आठवण त्यांनी सांगितली.

*** लघुकथा - चर्चासत्र**

'शब्द द बुक गॅलरी' या प्रकाशन संस्थेने आयोजित केलेल्या मराठी लघुकथेवरील चर्चासत्रात या वाङ्मय प्रकाराच्या विविधांगांचा सखोल परामर्श घेतला गेला खुद्द लेखकाला काय वाटतं, हे जाणून घेणारं 'लिहित्या लेखकाचा दृष्टिकोण' हे निवेदनसत्र प्रांजळ मनोगतांमुळे रंगलं. रंगनाथ पठारे अध्यक्षस्थानी होते आणि जी. के. ऐनापुरे, मेघना पेठे, भारत सासणे, उर्मिला पवार, कृष्णा खोत, मोहन पाटील या भिन्नप्रकृती कथाकारांनी आपली मते मांडली.

मेघना पेठे आणि भारत सासणे यांनी, लेखन हे मानवी अस्तित्वाचा अर्थ लावण्याच्या अनिवार्य गरजेतून होते असे सांगितले. मेघना पेठे स्वत:च्या लेखनामागची कारणे शोधताना म्हणाल्या, बंद बरण्यांमध्ये कोंडलेल्या बदलत्या नात्यांची फडफड जाणवते तेव्हा मी लिहिते. भोवतालची विसंगती बदलून घ्यावीशी वाटते तेव्हा लिहिते. आपलं निबिड अरण्य आपल्यापुरतं उजळून घ्यावंसं वाटतं, तेव्हा लिहिते आणि चक्क स्वार्थापोटीही लिहिते.

सासणे म्हणाले की, लेखकाला काहीतरी शोधायचं असतं, हा प्रवास त्याला आंतरिक शोधापर्यंत नेतो. मानवनिर्मित नाती बुद्धिजन्य दु:ख आणि आत्मजन्य बेचैनी जन्माला घालतात. मी मनुष्यजीवनातल्या अपार रहस्यमयतेच्या शोधात असतो.

तरुण कथाकार कृष्णा खोत यांनी वाचकही लेखकाला रचत असतो असे सांगितले, तर जी. के. ऐनापुरे यांनी भ्रष्ट राजकारण आणि सामान्य माणूस यांच्यामधली भिंत बनून लेखकाने उभे राहायला हवे, असे म्हटले. उर्मिला पवार यांनी, दलित कथा मानवमुक्तीसाठी लिहिली गेली तरी दलितातील पुरुषप्रधान व्यवस्थेच्या काचाला भिडली नाही, असे स्पष्टपणे नोंदवले.

लेखक हा समाजातला माफीचा साक्षीदार असतो. तो लिहिणारा असल्यामुळेच इतरांना मिळणाऱ्या शिक्षेतून त्याला सूट मिळते, हे ग्रामीण कथाकार मोहन पाटील यांचं विधान मार्मिक होते.

*** भांडारकर प्राच्याविद्या संस्था - निवडणूक**

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या नियामक मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीत मो. गो. धडफळे, सरोजा भाटे, वा. ल. मंजुळ यांच्यासह बारा विद्यमान सदस्यांना मतदारांनी पुन्हा संधी दिली असून नियामक मंडळात यावेळी तेरा नवे चेहरे आहेत. संस्थेच्या नियामक मंडळाचे दीड हजारांहून अधिक आजीव सभासद आहेत. नियामक मंडळाच्या निवडणुकीसाठी त्यापैकी ४८७ मतदारांनी मतदान केले. त्यातील १५९ मते अवैध ठरली तर ३२८ मते वैध ठरली. सर्वाधिक मते मिळणाऱ्या पंचवीस सदस्यांची नियामक मंडळाच्या सदस्यपदी निवड होते.

*** हेमामालिनी यांचे चरित्र**

हेमामालिनी यांचे अधिकृत इंग्रजी चरित्र ज्येष्ठ पत्रकार भावना सोमय्या यांनी लिहिले आहे. त्याचा अरुणा अंतरकर यांनी केलेला मराठी अनुवाद अमेय प्रकाशनाने प्रकाशित केला आहे.

पुस्तकाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री म्हणाले, 'कलाकारांचा पडद्यावरचा चेहरा सर्वांना माहीत असतो, पण त्यामागे किती परिश्रम आणि संघर्षमय वाटचाल असते हे फारसे कुणाला माहीत नसते. हेमामालिनी यांचे हे चरित्र वाचल्यानंतर त्यांच्या या वाटचालीवर प्रकाश पडेल. हेमामालिनी यांनी मुंबई, महाराष्ट्र, मराठी रसिक यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.' त्या म्हणाल्या, 'माझी सारी कारकीर्द मुंबई आणि महाराष्ट्रात बहरली आहे. त्यामुळे मला महाराष्ट्राविषयी फार आपुलकी वाटते. त्यामुळे माझे चरित्र मराठीत प्रकाशि होणे, ही आनंदाची गोष्ट आहे.'

प्रकाशक उल्हास लाटकर, भावना सोमय्या, अरुणा अंतरकर यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

*** 'वॉटर'मधील भूमिकेचे वेगळेपण**

कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र अशा 'सौभाग्य लेण्यांपैकी' काही जरी एखाद्या स्त्रीने घातले नसले तर तिला लगेच नवऱ्याचा 'मी जिवंत आहे अजून' असा शेरा ऐकायला मिळतो. पण नवरा जिवंत असतानाच एका स्त्रीने ही सर्व सौभाग्यलेणी तर उतरवलीच पण चक्क केशवपनही केले असे 'वॉटर' या चित्रपटातील 'पतिराजी' या ८० वर्षांच्या विधवेची भूमिका करणाऱ्या डॉ. विदुला जवळगेकर यांनी एका मुलाखतीत स्पष्ट केले.

समाजवादी महिला सभेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या मुलाखतीत चित्रीकरणादरम्यानचे अनुभव सांगताना जवळगेकर म्हणाल्या, ''माझी या भूमिकेसाठी निवड झाल्यानंतर मला माझे संवाद पाठवण्यात आले, मात्र त्यात फक्त माझेच संवाद होते. मी कोणाशी बोलते आहे याचा काहीच संदर्भ नव्हता. माझी कल्पनाशक्ती अफाट आहे असे बहुधा त्यांनी गृहीत धरले असावे आणि माझ्या भूमिकेतून मला ते सिद्धही करता आले.''

''श्रीलंकेत प्रवेश केला तेव्हा स्वत: दीपा मेहता स्वागताला हजर होत्या. त्यामुळे सुरुवातीलाच आपलेपणा निर्माण झाला आणि चित्रीकरणाच्या वेळी कसलेही दडपण आले नाही.'' असा अनुभव त्यांनी सांगितला.

विधवांच्या स्थितीबद्दल त्या म्हणाल्या, ''मागचे आपण किती वेळा उगाळायचे? आता या सगळ्यातून मार्ग शोधला पाहिजे. कोणत्याही गोष्टीची लाज न बाळगता स्त्रियांनी अभिमानाने जगावे असे मला वाटते.'' मी जर चित्रपट दिग्दर्शित केला तर त्यावर दीपा मेहता यांचा निश्चितच प्रभाव असेल असे स्पष्ट केले. या प्रसंगी महिला सभेच्या अध्यक्षा विमल गरुड उपस्थित होत्या. नीना भेडसगावकर यांनी ही मुलाखत घेतली.

*** मोठ्या पडद्यावर येण्याचे स्वप्न पूर्ण - गिरीश परदेशी**

मी गेली काही वर्ष मुंबईत मराठी व हिंदी मालिकांमध्ये काम करतो आहे. परंतु माझे पहिल्यापासूनच मोठ्या पडद्यावर यावे हे स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण झाल्याने मला फार आनंद होत आहे, अशा शब्दात अभिनेता गिरीश परदेशी यांनी आपल्या मनातील भावनांना वाट करून दिली.

'फॉरेनची पाटलीण' या चित्रपटातील अनुभव व पुढील वाटचालीबद्दल माहिती देताना परदेशी म्हणाले, ''या चित्रपटामध्ये मी मुख्य कलाकाराची भूमिका केलेली असून चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच पुढील काही महिन्यात वेगळ्याच विषयाला हात घालणारे 'होतं असं कधी कधी' व 'मर्मबंध' असे दोन चित्रपट येत आहेत.''

परदेशी म्हणाले की, मी मूळचा पुण्याचा असून माझे शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल व बी. एम. सी. सी. मध्ये झाले. कॉलेज संपल्यानंतर मी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, दिल्ली येथे प्रवेश घेतला व अभिनयाच्या क्षेत्रात पाऊल टाकले. तेथे मला अनेक मोठ्या दिग्दर्शकांबरोबर काम करण्यास मिळाले. त्यानंतर मुंबईमध्ये दूरदर्शन वरील 'बुलबुलबाग', 'हुआ सवेरा', 'कोरा कागज' अशा हिंदी मालिकांमध्ये काम केले. तसेच मराठीमधील मयुरेश अधिकारीच्या भूमिकेसाठी सलग दोन वर्षे मला 'झी मराठी' पारितोषिक मिळाले.

*** 'डेव्हिल मे केअर'**

शत्रूच्या संभाव्य कारवायांची हेरगिरी असो, एखाद्या प्लानची धूळधाण करणे असो किंवा अकल्पित युक्त्या वापरून शत्रूला जेरीला आणणे असो... अमेरिकन हेरखात्याला प्रत्येक वेळा आठवला तो जेम्स बॉन्ड. लेखक इयान फ्लेमिंग यांच्या १४ कादंबऱ्यांतून पुढे आलेल्या या पात्राने अवघ्या जगावर गारूड केले. फ्लेमिंग यांचा तोच वारसा पुढे राखत लंडन येथील लेखक सॅबेस्टियन फॉक्स यांनी आता जेम्स बॉन्डवर 'डेव्हिल मे केअर' नावाचे पुस्तक लिहिले आहे.

फ्लेमिंग यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेली ही

कादंबरी बॉन्डच्या जीवनावरील १६ वी कादंबरी आहे. 'डेव्हिल मे केअर' वाचकांना पुन्हा शीतयुद्धाच्या काळात घेऊन जाते. इयान फ्लेमिंग यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांइतकीच ती प्रभावी झाली असून सध्याच्या काळाशीही नाते सांगते. कादंबरीतील कथासूत्र जगातील ड्रग व्यापाराभोवती गुंफण्यात आले आहे. त्यानिमित्ताने बॉन्डचा इराण, कॅस्पियन समुद्र तसेच रशियात झालेला प्रवास रंगवण्यात आला आहे. ब्रिटनमध्ये १९६० च्या दशकात आलेली अमली पदार्थांची लाट, इराकवरून जाताना अचानक गायब झालेले ब्रिटिश विमान तसेच मध्यपूर्वेत जमा झाले युद्धाचे ढग अशा घटनांची सूत्रबद्ध मांडणी आणि त्या त्या वेळी जेम्स बॉन्डने पार पाडलेली जबाबदारी याचे थरारक वर्णन यात आहे.

*** 'माईंड जिम' पुस्तकावरील ज्ञानावर आधारित मनाची व्यायामशाळा**

'माईंड जिम' या पुस्तकातील तंत्रावर आधारित मनाच्या व्यायामशाळेचे आयोजन शनि. दि. १४ जून २००८ रोजी मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे येथे करण्यात आले. पुस्तकाचे अनुवादक श्याम भुर्के यांनी मार्गदर्शन केले. निर्मिती क्षमता वाढविणे, तणाव कमी करणे, मतभेदांची दरी कमी करणे, स्वत:ला ओळखणे अशा विषयावरील प्रयोग करण्यात आले.

उपस्थितांना ही व्यायामशाळा उपयुक्त वाटली. अशा व्यायामशाळेचे आयोजन दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी सायं. ४ ते ६ या वेळात केले जाणार आहे.

संपर्क - श्याम भुर्के - २५६५२४६१, ९४२२०३३५००

❒



**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
दर रविवारी नियमित सुरु राहील.
वेळ - सकाळी १० ते दुपारी ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

**नवे कोरे**

# आलो-आंधारि




**मूळ बंगाली लेखिका**
बेबी हालदार

**बंगालीतून हिंदी अनुवाद**
प्रबोध कुमार


**हिंदीतून मराठी अनुवाद**
मृणालिनी गडकरी

| किंमत १२० रु. | पोस्टेज २५ रु. |
|---|---|

*जर तेरा वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच, सातवीतूनच शाळेला रामराम ठोकून, एका अडाणी, मंद बुद्धी आणि दुप्पट वयाच्या माणसाबरोबर तुझी गाठ बांधली गेली, अंगावर दूध पिणारं एक मूल असतानाच दुसऱ्याची चाहूल लागली आणि पाहता पाहता तीन मुलांची आई झालीस, पंचविशीतच शरीर आणि मन थकलं असतानाही मुलांसकट दूर एखाद्या अनोळख्या गावी जावं लागलं. पोटासाठी मोलकरणीचं काम करतानाच मुलांची दुखणी, अभ्यास, पैसा ह्यांची सतत काळजी वाहावी लागली आणि असं असतानासुद्धा, स्वतःच्या ह्या धकाधकीच्या आयुष्यात सर्व अडचणींना तोंड देत इथपर्यंत कसे आलो, हे सातवीपर्यंत शिकलेल्या मोडक्यातोडक्या पण अतिशय सरळ भाषेत सांगण्याची जिद्द तुझ्यात असेल, तर सखे, तुझं दुसरं नाव असेल बेबी हालदार. – जिच्या 'आलो-आंधारि'ह्या आत्मकथेनं साहित्य-जगतात खळबळ उडवून दिली.*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## आगामी




# धीरुभाईझम

**धीरुभाई अम्बानींचे कार्यविषयक असामान्य तत्त्वज्ञान**

मूळ इंग्रजी लेखक

**ए. जी. कृष्णमूर्ती**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

| | |
|---|---|
| ८० रु. | पोस्टेज २५ रु. |

गुजरातमधील छोट्या खेड्यापासून ते 'रिलायन्स'च्या साम्राज्यापर्यंतचा अतिभव्य विस्तार हा विलक्षण टप्पा सर करणाऱ्या धीरुभाई अम्बानींच्या कार्यकर्तृत्वाची निराळी ओळख करून द्यायची गरज नाही. फारसं औपचारिक शिक्षण नसलेले धीरुभाई स्वत:च एक चालतंबोलतं विद्यापीठ होते. त्यांनी स्वत:चं असं कार्यविषयक तत्त्वज्ञान व संस्कृती जोपासली होती. भव्य स्वप्न, खडतर परिश्रमांची तयारी, निश्चयाचं बळ यांच्या जोडीला त्यांनी काही साधी-सोपी तत्त्वं अनुसरली होती. अशक्य कोटीतल्या स्वप्नपूर्तीसाठी त्यांनी याच तत्त्वांच्या मार्गक्रमण केलं आणि नेत्रदीपक यशही मिळवलं. त्यांची ही तत्त्वं सर्वसामान्यांच्या जीवनालाही वेगळी झळाळी देतील.

# दखल

## * एनिड ब्लायटनच्या कथांमध्ये अँग्लो इंडियन 'ज्योती'ला स्थान



एनिड ब्लायटन

एनिड ब्लायटन ही गेल्या शतकातील सर्वात बहुप्रसव बालसाहित्यकार. तिची सातशेवर पुस्तके प्रसिद्ध झाली. तिने लिहिलेल्या कथांची संख्या दहा हजारावर जाते. तिच्या पुस्तकांच्या साठ कोटीवर प्रती खपलेल्या आहेत; आणि किमान सत्तर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झालेले आहेत. ती १९६८ साली वारली. यंदा तिचे ४० वे स्मृतिवर्ष.

तिच्या 'दि फेमस फाइव्ह' या मालिकेत ज्युलियन, डिक, ॲन आणि जॉर्ज ही चार मुले आणि त्यांचा कुत्रा टिमी - अशा पाच जणांच्या साहसाच्या कथा रंगवलेल्या आहेत. सत्तर वर्षापूर्वीच्या त्यांच्या साहसाला एकविसाव्या शतकाला साजेसे रूप देण्यात येत आहे आणि त्यांच्या हाती मोबाईल फोन, लॅपटॉप संगणक, पिझ्झा वगैरे दिसणार आहेत. साहसकथांच्या कथानकातही नवे कालसुसंगत तपशील देण्यात येणार आहेत आणि आजच्या मुलांना ही सर्व पात्रे आपल्या जवळची वाटावीत यासाठीही खास बदल केले जाणार आहेत. 'दि फेमस फाइव्ह' या मालिकेला सेक्सिस्ट, वंशवर्णवादी आणि सपक-सरळसोट म्हणून काही शिक्षकांनी आक्षेपार्ह ठरवून, शाळांच्या ग्रंथालयात तिला स्थान देऊ नये अशी मोहीम राबवली होती. तरीही या पुस्तकांना बालवाचकांचा पाठिंबा मिळतच राहिला आणि त्यांचा खपही होत राहिला. मध्यंतरी खप कमी होत आहे

असे आढळल्यावर बदलत्या वातवरणाची दखल घेऊन या पुस्तकांवर संपादकीय संस्कार करण्यात आले आणि त्यांच्या नव्या आवृत्त्या वितरित करण्यात आल्या. तसा बदल करण्याचे अधिकार एनिडची थोरली कन्या गिलियन बेव्हरस्टॉक हिने दोन वर्षांपूर्वी प्रकाशकांना दिले. तिचे नुकतेच निधन झाले.

'दि फेमस फाइव्ह' मधील चार टीन एजर्स आणि त्यांचा कुत्रा टिम यांच्या साहसांना कालोचित नवे रूप देताना भारतीय वाचकवर्ग डोळ्यांसमोर ठेवण्यात येत आहे की एक खास उल्लेखनीय बाबत आहे. या चौघा टीनएजर्सच्या नवीन पिढीची या मालिकेत साहसे बघायला मिळणार आहेत.

जॉर्जची मुलगी जो ही अँग्लो- इंडियन दाखवण्यात आली आहे. जो हे 'ज्योती'चे संक्षिप्त रूप आहे. ही आपल्या आईची लाडावलेली पोर आहे. मुलासारखा पोशाख करूनच ती सर्वांवर तोरा गाजवत असते.

ज्युलियनच मुलगा मॅक्स हा तेरा वर्षांचा आहे. त्याला स्केटिंग आवडते; त्याचप्रमाणे सायकलवरून फिरायला आवडते.

ॲनची मुलगी ॲली ही बारा वर्षांची असून कॅलिफोर्नियातील सिलिकन व्हॅलीमध्ये वाढलेली आहे. तिला मोबाइलवरून एसएमएस पाठवण्याचा छंद आहे. शॉपिंग मॉलमध्ये जाऊन वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी करण्याचीही तिला हौस आहे.

डिकचा मुलगा डायलन याला इलेक्ट्रॉनिक उपकरणे हाताळण्याचा नाद आहे. तो आपल्या लॅपटॉपवरून शेअर मार्केटमधील चढउतार बघत असतो. त्याला उद्योगपती व्हायचे आहे.

हे चौघे मित्र - त्यांच्यातील मैत्री, साहसाची आवड, घटनांच्या मुळापर्यंत जाण्याची त्यांची चिकाटी, त्यांची कल्पकता, हुशारी यांचा कस वेगवेगळ्या घटना प्रसंगांमध्ये लागतो.

एनिड ब्लायटनच्या मूळच्या कथांना नवे रूप देताना नव्या सुखसाधनांचा योग्य तो वापर करण्यात आला आहे. डिस्ने चॅनलवर या पाचजणांच्या साहसकथा २६ एपिसोडच्या स्वरूपात बालप्रेक्षकांना बघायला मिळतील आणि पुस्तकांद्वारे वाचायला मिळतील.

एकविसाव्या शतकाच्या दृष्टीने या कथांचे पुनरुज्जीवन करताना, नूतनीकरण करताना भारतातील प्रचंड बाजारपेठेचा विचार करणे भाग पडते आहे ही गोष्ट आपल्या अभिमानात थोडीफार भर नक्कीच घालणारी आहे.

या पुस्तकांच्या मराठी अनुवादाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसकडे येतील असा अंदाज आहे. दि सिक्रेट सेव्हनच्या १५ पुस्तकांच्या मालिकेचे हक्क त्यांना आधीच मिळालेले आहेत. सात गुप्तचर या नावाने ही मालिका प्रसिद्ध होईल.

## * भारतातील बेस्टसेलर कादंबरीकार


चेतन भगत

भारतातील बेस्टसेलर लेखक-कादंबरीकार हे स्थान 'फाइव्ह पॉइंट समवन' या कादंबरीचा लेखक चेतन भगत याला मिळाले आहे हे वाचून अनेकांना आश्चर्य वाटेल. त्याच्या नावावर फक्त तीनच कादंबऱ्या आहेत. फाइव्ह पॉइंट समवन, ए नाइट ॲट कॉल सेंटर आणि थ्री मिस्टेक्स आय मेड इन माय लाइफ. यापैकी शेवटची कादंबरी गेल्या महिन्यात प्रसिद्ध झाली आणि प्रकाशनपूर्व तिची नोंदणी दोन लाख प्रतींची होती. या सर्व कादंबऱ्यांची विक्री दहा लाख प्रतींपेक्षा जास्त झालेली आहे. तीन पुस्तकांच्या एवढ्या प्रती खपलेला चेतन भगतखेरीज दुसरा कोणी लेखक आज मितीला तरी भारतात नाही. या तीनही पुस्तकांच्या किंमती प्रत्येकी फक्त ९५ रुपये एवढ्या अल्प आहेत.

चेतन भगतच्या पहिल्या पुस्तकाचे, 'फाइव्ह पॉइंट समवन'चे मराठी भाषांतर मेहतांनी प्रकाशित केले. त्यामुळे 'थ्री मिस्टेक्स'चेही भाषांतर हक्क मिळवण्यासाठी त्यांनी संपर्क साधला. त्यावेळी चेतन भगतने ॲडव्हान्स रॉयल्टी म्हणून ५० हजार रुपयांची मागणी केली. शिवाय किंमत ९५ रुपये ठेवा असेही सुचवले. किमान दहा हजार प्रती खपल्या तरच ही रॉयल्टी परवडणार. त्यासाठी पाच-सात वर्षेही लागतील आणि तरीही मराठीत इतक्या प्रती विकल्या जातील अशी शाश्वती कमीच! हे सांगितल्यावर चेतन भगतने उत्तर दिले, ''ते काही मला ठाऊक नाही. पन्नास हजार मला आधी द्या... आय वॉन्ट टू मेक मनी...''

भारतातील लेखकांना झटपट श्रीमंत व्हायची अशी स्वप्ने पडू लागली आहेत ही चांगली गोष्ट आहे.

## * तस्लिमाला स्वीडनमध्ये आश्रय

बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन हिची युरोपमधील भटकंती तूर्त थांबली असून स्वीडनमध्ये दोन वर्षांच्या वास्तव्याची तिची व्यवस्था झाली आहे ही बातमी तिच्या चाहत्यांना दिलासा देणारी आहे.

दोन-तीन महिन्यांपूर्वी बांगलादेशी वादग्रस्त लेखिका तस्लिमा नसरीन हिला भारतातून मुक्काम हलवावा लागला. गेली दोन वर्षे ती कलकत्त्यात राहात होती. परंतु तेथील मुस्लिमांनी तिच्या विरोधी निदर्शने केल्यामुळे तिला दिल्लीला हलवण्यात

आले. अज्ञातस्थळी ठेवण्यात आले. नंतर जयपूर येथे तिच्या निवासाची सोय करण्यात आली. सुरक्षा अधिकाऱ्यांच्या कडक पहाऱ्याखाली राहावे लागले. नंतर पुन्हा दिल्लीत आणले गेले. तिला कडक बंदोबस्तात राहणे क्रमप्राप्त ठरले. तिला 'घराबाहेर' पडणे अशक्य झाले. कोणाशी बोलणे, कोणाशी संपर्क साधणे हे दुरापास्त ठरले. भारत सरकारला तिच्या सुरक्षिततेसाठी ही सर्व काळजी घेणे आवश्यक वाटत होते, परंतु सुरक्षा याचा अर्थ नोकरशाही हाऊस ॲरेस्ट असा घेऊन तिला आपल्या नजरेपासून क्षणासाठीही दूर होण्याची संधी देत नव्हते. त्यामुळे तिचा एक प्रकारे मानसिक कोंडमाराच चालू होता. बंगाली भाषा ही तिला प्रिय. बंगालीत बोलायला मिळावे, बंगाली मित्र-मैत्रिणींच्या सहवासात राहावे, बंगाली खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्यावा ही तिला एकमेव ओढ. त्यासाठी तर कलकत्त्यात राहण्याचा तिचा आग्रह. परंतु तिच्या 'लज्जा' या कादंबरीतील हिंदूकुटुंबाचे सकारात्मक चित्रण म्हणजे इस्लामवर टीका असा तथाकथित इस्लामविरोधाचा बडिवार माजवून तिची हत्या करणाऱ्याला भरघोस बक्षीस देण्याचा फतवा सनातनी मुस्लिम संघटनेने काढलेला... तो गेली बारा वर्षे जारी आहे आणि त्यामुळे तस्लिमाला बांगला देशातून तडीपार व्हावे लागले. फ्रान्स, स्वीडन, जर्मनी वगैरे देशात आश्रय घ्यावा लागला.

परंतु या सर्व देशातही तिला बंगाली भाषा ऐकणे किंवा बंगालीत कोणाशी संवाद साधणे दुरापास्तच! त्यामुळे भारत सरकारकडे तिने आश्रयाची याचना केली. भारत सरकारने तिला सहा सहा महिन्यांचा व्हिसा देऊन कुठल्याही क्षणी स्थलांतराची तलवार टांगती ठेवली. कलकत्त्यात तिचे अज्ञातवासाचे वास्तव्य ठीक चालले होते. परंतु ती हैद्राबादला एका कार्यक्रमाला गेली. तेव्हा सनातनी मुस्लीमांनी त्या कार्यक्रमात गोंधळ घातला. तेव्हापासून सर्व बिनसले. कलकत्त्याचे मुसलमानही तिच्या तेथील वास्तव्याविरुद्ध निदर्शने करू लागले... एखाद्या व्यक्तीला आपल्या देशातून हद्दपार व्हावे लागले तर पृथ्वीच्या पाठीवर इतर कुठल्याही देशात सुखात राहणे कसे अशक्य ठरते याचे तस्लिमा हे एक उदाहरण आहे. जगातील सगळे उदारमतवादी मूलतत्त्ववाद्यांच्या दहशतीमुळे हतबल ठरतात.

परंतु तूर्ततरी दोन वर्षांसाठी तस्लिमाला स्वीडनने आश्रय देण्याचे मान्य केले आहे ही आनंदाची गोष्ट आहे. उप्पसला विद्यापीठाने तिच्या निवासाची व्यवस्था करून तिला दरमहा ८३३ डॉलर्स वरखर्चासाठी देण्याचे ठरवले आहे. १९९४ मध्ये स्वीडनच्या लेखक संघटनेने तिला तुचालस्वी शिष्यवृत्ती दिली होती; त्यामुळे स्वीडनमध्ये वर्षभर राहणे तिला शक्य झाले हाते. यावेळी तस्लिमाच्या मदतीला स्वीडनने पुढे यावे याचे त्यामुळेच कौतुक वाटते.

## * फॅशन्सचा क्रांतिकारक अग्रदूत

पॅरिसला फॅशनची राजधानी मानण्यात येते. तेथील डिझायनर्सनी प्रदर्शनी

केलेल्या फॅशन्स जगभरच्या उच्चभ्रू वर्तुळात मान्यता मिळवतात. हा लौकिक आणि हा दबदबा पॅरिसला मिळवून देणाऱ्या फॅशन डिझायनर्समध्ये ईव सेंट लॉरेन्स याचे फार मोठे स्थान आहे. तो दि. २ जून रोजी वयाच्या ७१ वर्षी मरण पावला, त्याच्या मृत्यूने पॅरिसच्या फॅशन व्यवसायातले एक महान पर्व संपले. तसा तो सहासात वर्षांपूर्वी या व्यवसायातून निवृत्त झाला होता; आणि एकान्तवासाचे जिणे जगत होता. गेले काही महिने तर त्याची तब्येत फार खराब होती; तरीही त्याने स्त्री-पुरुषांच्या पोशाखात गेल्या ४० वर्षात जे परिवर्तन घडवून आणले, त्याची महती नाकारता येणार नाही.

आज जगभरच्या महिला पँटसूट घालतात. १९६० पूर्वी महिला स्कर्ट-ब्लाउझ, गाऊन वगैरे घालत. महिलांनी पँट घालणे, टॉप घालणे हे त्यावेळी कोणाच्या स्वप्नातही नव्हते आणि तसे करणे हे पाखंडीपणाचे मानले गेले असते. ईव सेंट लॉरेन्स याच्याकडे पँटसूटचे श्रेय जाते. १९५५ साली ख्रिस्तियन डायर या फॅशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने त्याला आपल्याकडे डिझायनर म्हणून पाचारण केले. त्याच्या अफलातून कल्पनांनी डायर कंपनीने फॅशन्समध्ये क्रांती घडवून आणली. पुढे १९६० साली त्याने स्वत:ची कंपनी काढली. १९६० नंतर महिलांना अधिक स्वातंत्र्य मिळाले. नोकऱ्या करणाऱ्या महिलांची संख्या वाढत राहिली. त्यावेळी ईव सेंट लॉरेन्सने स्कर्ट-ब्लाउझच्या ऐवजी पँटसूट घातलेल्या महिलांचे फॅशन शोमधून दर्शन घडवले. नोकरीला जाणाऱ्या महिलांना पुरुषांप्रमाणेच आपल्याबरोबरीचे स्थान आहे असा आत्मविश्वास देणारा हा पोशाख आपला वाटला; आणि 'ऑफिस गोअर' महिला स्कर्ट-ब्लाउझच्या पारंपारिक जोखडातून बाहेर पडल्या. स्लॅक्स, पँटस हा पोशाख सुटसुटीत आणि सोयीचा म्हणून त्यांनी स्वीकारला. कॉलेजमधल्या तरुणींनाही तो पसंत पडला. स्त्रियांचा पोशाख क्षेत्रातील मुक्तिदाता म्हणून ईव सेंट लॉरेन्स हा ओळखला जाऊ लागला.

एवढ्यावरच तो थांबला नाही. आज आपण जो सफारी सूट घालतो, त्याची निर्मितीही ईव सेंट लॉरेन्सने केली. टुक्सेडोचा पुरस्कार त्याने केला. आरंभी टुक्सेडो घातलेल्या ग्राहकांना पॅरिसमधील रेस्टॉरंटमध्ये प्रवेश मिळत नसे. लॉरेन्सने ते सर्व बदलले. 'रेडी टू वेअर' अशा कपड्यांची दालने लॉरेन्सने सुरू केली. 'फॅशन ही केवळ स्त्रीला सजवण्यासाठी नसते, तर तिचा आत्मविश्वास वाढवणारी, तिचा व्यक्तिमत्त्वाला खुलवणारी असते.' असे तो म्हणे. त्याने पारदर्शक परिधानाचाही पुरस्कार केला. स्त्री देहाचे अनोखे रूप प्रकट व्हावे म्हणून पोशाखात मध्ये मध्ये गोलाकार कट घेण्याचेही तंत्र त्याने विकसित केले. शिफॉनचा वापर प्रतिष्ठित केला. कॅटवॉक करण्यासाठी कृष्णवर्णीय मॉडेल्सचाही वापर केला. फॅशनही श्रीमंतांची मिरास राहू नये, ती सर्वसामान्यांनाही परवडावी म्हणून प्रयत्न केले. फॅशनक्षेत्रातला क्रांतिकारक अग्रदूत म्हणून त्याचे स्थान मोठे आहे.

## * चहाची टपरी आणि २१ पुस्तके

रेणू ही हिंदी कादंबरी नागपूर येथे काही दिवसांपूर्वी प्रकाशित झाली. तिचे लेखक आहेत लक्ष्मणराव शिरभाते.

पुण्यामुंबईत लक्ष्मणराव शिरभाते हे नाव आपल्याला फारसे परिचित नाही. परंतु या लेखकाचे हे २१ वे पुस्तक आहे असे त्यावेळी सांगण्यात आले.

आता तुम्ही म्हणाल, आपल्याला शंभर शंभर पुस्तके लिहिणारे लेखक माहीत आहेत; तर या लेखकाचे २१ पुस्तकांबद्दल काय मोठे कौतुक करायचे?

खरे आहे. शंभर शंभर पुस्तके प्रसिद्ध होणारे लेखक आहेत; आणि त्यापैकी एकही पुस्तक न वाचलेलेही असंख्य मराठी वाचक आहेत. तेव्हा त्यात कोणाचे काय कौतुक करायचे?

पण लक्ष्मणराव शिरभाते यांचे तरीही कौतुक करायला हवे.

का? असे तुम्ही विचाराल. ते रास्तच आहे.

हे लक्ष्मणराव शिरभाते. मूळचे अमरावतीजवळच्या तडेगाव दशासर या खेड्यातले, पण ते सध्या राहतात दिल्लीमध्ये आणि ते दिल्लीत डी. बी. पलुस्कर मार्गावर चक्क फूथपाथवर चहाची टपरी चालवतात. पानपट्टीचा ठेलाही चालवतात. आता चहाची टपरी टाकणारा व पानाचा ठेला चालवणारा माणूस लेखनवाचन करतो, एवढेच नव्हे तर तब्बल २१ पुस्तके छापून प्रसिद्ध करतो ही कौतुकाची बाब नव्हे का?

लक्ष्मणराव शिरभाते हे दहावी पास झाल्यावर अमरावतीच्या कापड गिरणीमध्ये कामगार होते. ती बंद पडली. तेव्हा ते भोपाळला धर्मशाळेत कामाला लागले. तेथून दिल्लीला आले. एका ढाब्यावर भांडी घासण्याचे काम मिळाले. एके दिवशी ढाबेवाल्याने त्यांना म्हटले, ''फूटपाथवर एक जागा आहे. तू चहाची टपरी टाक.'' १९७८ मध्ये लक्ष्मणरावांनी चहाची टपरी टाकली. १९७९ मध्ये त्यांचे नई दुनिया की नई कहानी हे पुस्तक एका प्रकाशकाने काढले. टाइम्समध्ये त्याची मोठी बातमी आली. हा चायवाला लेखक कुतूहलाचा विषय ठरला. रामदास, नर्मदा, परंपरा वगैरे हिंदी पुस्तके त्यांनी लिहिली. पंतप्रधान इंदिरा गांधींची १९८४ मध्ये भेट घेतली. 'प्रधान मंत्री' ही कादंबरी मग त्यांनी लिहिली... तिला बक्षीस मिळाले... लेखन चालू राहिले. यंदा २१ वे पुस्तक छापून झाले. मराठी बोलणारा हा लेखक हिंदीमध्ये आपले नाव गाजवतोय. आनंद आहे.

## * समित बसू सद्यःकालीन पहिला फँटसीकार ठरणार?

समित बसू हे नाव आपल्याला ओळखीचे वाटणार नाही. कोण हा समित बसू असा प्रश्न आल्याला पडेल आणि असा प्रश्न पडणे आजतरी स्वाभाविकच आहे.

परंतु काही दिवसातच हे नाव आपल्याला ओळखीचे वाटू लागेल. फाइव्ह पॉइंट समवन या कादंबरीचा लेखक चेतन भगत - याचे नाव तरी दोनतीन वर्षांपूर्वी आपल्याला कुठे माहीत होते? पण आज भारतातला सर्वाधिक खपाचा बेस्टसेलर लेखक म्हणून त्याचे नाव सर्वदूर पोचले आहेच ना! त्याची पहिली दोन पुस्तके - फाइव्ह पॉइंट समवन आणि ए नाइट ॲट कॉल सेंटर- या दोहोंच्या दहा लाखावर प्रती गेल्या तीन वर्षांत विकल्या गेल्या. त्याचे तिसरे पुस्तक थ्री मिस्टेक्स इन माय लाइफ गेल्या महिन्यात प्रसिद्ध झाले. प्रकाशनपूर्व अडीच-तीन लाख प्रतींची नोदणी झालेली ही त्याची कादंबरी! भारतात प्रकाशनपूर्व एवढी नोंदणी होणारे हे पहिलेच पुस्तक! कानपूरच्या आयआयटीचा हा हुशार विद्यार्थी - आता लेखन हा पूर्ण वेळचा व्यवसाय मानून त्यातच करीयर करायचे म्हणतोय. 'मला झटपट श्रीमंत व्हायचंय. तेही पुस्तके लिहून' असे त्याचे आता घोषवाक्य आहे... तर याच पंक्तीत समित बसू हाही कदाचित् येत्या दोनचार वर्षात स्थान मिळवेल, त्याचेही नाव घराघरात पोचेल अशी शक्यता आहे.

समित बसू हाही अहमदाबादच्या आयआमएमचा (इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंटचा) विद्यार्थी. व्यवसाय व्यवस्थापनातील पदव्युत्तर अभ्यास करणारा. परंतु एके रात्री एक गृहपाठ करताना त्याला वाटले- आपण हा काय खुळेपणा करतो आहोत? या गृहपाठात व्यर्थ वेळ का दवडत आहोत? या व्यवस्थापनाच्या वेगवेगळ्या सिद्धान्तात काहीच तथ्य नाही. प्रत्येक हुशार व्यावसायिक स्वत:ची वेगळी वाट चोखाळतो. तो वेगळा सिद्धान्त मांडतो. आधीचे सिद्धान्त रद्दबातल ठरवतो... इथे हे निरर्थक धडे कशाला गिरवत बसायचे?... तेव्हा तो अभ्यासक्रम सोडून चक्क घरी परतला.

त्याच्या डोक्यात एक फँटसीची कल्पना विजेच्या लखलखाटासारखी चमकून गेली. त्या कल्पनेवर त्याने चिंतन सुरू केले. हॅरी पॉटर, लॉर्ड ऑफ दि रिंग्ज यासारख्या फँटसीचे कथानक डोळ्यापुढे उभे राहिले आणि सहा महिन्याचे संशोधन झाल्यावर कथानकाचे सगळे धागेदोरे लक्षात आले. पुढचे चार महिने अखंड लेखनात व्यग्र राहिला आणि 'दि सिमोक्विन प्रॉफेसिज्' चे हस्तलिखित तयार झाले. कॉलेजचा अभ्यास करून फावल्या वेळात हे लेखन करता आले असते का? या प्रश्नाचे तो उत्तर देतो, ''हे ज्या त्या लेखकाच्या प्रकृतीवर अवलंबून आहे. मला ते जमले नसते.'' त्याला प्रकाशक मिळाला आहे आणि भारतातील पहिला फँटसी लेखक म्हणून त्याचा गाजवाजा करण्याची मोहीम लौकरच मार्गी लागेल. त्या दरम्यान समित बसूची दुसरी फँटसीही लिहून तयारी झाली आहे. 'दि मॅटिकोर्स सिक्रेट'. 'फँटसी'च्या क्षेत्रातही भारतीय कादंबरीकार आता आपली मुद्रा उमटवण्याच्या प्रयत्नात आहेत. समित बसू याला त्यात यश लाभावे अशी आशा बाळगायला हरकत नाही.

## * दिलीप प्रभावळकरांच्या 'गांधीगिरी'ला पुरस्कार

'लगे रहो मुन्नाभाई' या तुफान गाजलेल्या चित्रपटातील महात्मा गांधींच्या भूमिकेने दिलीप प्रभावळकर यांना अभूतपूर्व लौकिक मिळवून दिला. ५४व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचा पुरस्कार प्रभावळकरांना मिळाला. त्यांच्या 'गांधीगिरी'चा हा गौरव प्रत्येक मराठी माणसाला सुखावून जाईल यात शंका नाही. (या वर्षीच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये मधुर भांडारकर, स्वानंद किरकिरे, नीना कुलकर्णी, अमोल पालेकर, रवींद्र भोसले, मृणालिनी भोसले, अनिल पलांडे, दिव्या चाफाडकर, आरती अंकलीकर वगैरे मराठी माणसांनीही आपले कर्तृत्व दाखवले आहे, त्यामुळे मराठी प्रतिभेचा ध्वज उंचावला गेला आहे.) दिलीप प्रभावळकर यांना स्वत:लाही या पुरस्कारामुळे धन्यता वाटणे स्वाभाविक आहे. गांधींच्या भूमिकेत आपल्याला प्रेक्षक स्वीकारतील की नाही अशी शंका त्यांना वाटत होती. ॲटेनबरोच्या 'गांधी'मधील बेन किंग्जले यांची भूमिका अफलातून होती, 'गांधी विरुद्ध गांधी' मधील अतुल कुलकर्णी यांनीही 'गांधी' उत्तम प्रकारे उभे केले. इतरही दहाबारा अभिनेत्यांनी गांधींच्या भूमिका सजवल्या. प्रभावळकरांना गांधीजींमधील मिस्किलपणा, सर्व काही ठाऊक असूनही इतरांना कार्यप्रवण करण्याची हातोटी, विचाराचे व समस्येचे मर्म जाणण्याची क्षमता यांचा दिलीप प्रभावळकर यांच्यावर जास्त प्रभाव पडला आणि गांधीजींचे साहित्य वाचून तसेच त्यांच्या हालचालींचे, लकबींचे त्यांच्या उपलब्ध चित्रफितीवरून अवलोकन करून दिलीप प्रभावळकरांनी आपली भूमिका रंगवली. 'गांधीगिरी'ला त्यामुळे सर्वसामान्य प्रेक्षकाच्या दृष्टीनेही स्वीकारार्हता प्राप्त झाली. गांधी हा चेष्टेचा विषय होण्याची लाट उसळली असताना समकालीन विविध प्रश्नांवर तोडगा काढण्याचे आणि माणसांना प्रेमाने हाताळण्याचे, सत्य-अहिंसेचे, नि:शस्त्र प्रतिकाराचे, सत्याग्रहाचे, विरोधकांचेही मतपरिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य गांधींच्या शिकवणीत आहे हे लगे रहो मुन्नाभाई या चित्रपटाने पटवून दिले. दिलीप प्रभावळकर यांच्या मिस्किल अभिनयाने एक अशक्य गोष्ट शक्य करून दाखवली. त्यामुळे सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचा त्यांना मिळालेला पुरस्कार अगदी योग्यच आहे यात शंका नाही.

दिलीप प्रभावळकर यांची गेल्याच महिन्यात पुण्यात मुलाखत झाली होती. त्यावेळी त्यांनी आपल्या प्रवृत्तींच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकला होता. क्रिकेट, गाणे, लेखन आणि अभिनय अशा चारही आघाड्यांवर प्रभावळकरांनी आपला प्रभाव सिद्ध केला आहे. अलबत्या गलबत्या या बालनाट्यातील चेटकिणीची भूमिका, चौकट राजातील मतिमंद नंदू, हसवाफसवीतील सहा वेगवेगळ्या भूमिका, वासूची सासूमधील सासू अशा स्त्री-पुरुष-तरुण-वृद्ध यांच्या भूमिकांद्वारे त्यांनी आपले अभिनयाचे कौशल्य प्रकट केले. त्यांच्या 'चिमणराव'नेही मराठी

प्रेक्षकांना भरपूर हसवले. 'सरकार राज'मधील सुभाष नागरे या अमिताभ बच्चनच्या राजकीय गुरूची भूमिकाही विलक्षण परिणामकारक आहे. अमिताभ-अभिषेक पाया पडतात या दृश्याच्या रिटेकच्या वेळी प्रभावळकरांना अवघडल्यासारखे वाटले, असे त्यांनी सांगितले. बोक्या सातबांडेच्या निमित्ताने एक कुमार नायकही त्यांनी उभा केला आहे. प्रभावळकरांच्या गुगली, पुन्हा गुगली या पुस्तकांमध्ये क्रिकेटविषयक लेखन आहे. एकूण विविध आघाड्या लीलया लढवणारे प्रभावळकरांचे सादरीकरण ए वन् आहे यात शंका नाही.

## * सानेगुरुजींचे स्मरण





११ जून रोजी सानेगुरुजींची ५८वी पुण्यतिथी साजरी झाली. त्या निमित्ताने सानेगुरुजींचे एक निस्सीम भक्त, सानेगुरुजी कथामालेचे संस्थापक प्रकाशभाई मोहाडीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरत नाट्य मंदिरात हृदयस्पर्शी कार्यक्रम झाला. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, भारुडकार डॉ. रामचंद्र देखणे यांनी सानेगुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखवले. हा कार्यक्रम सानेगुरुजी कथामाला, संस्कार साधना आणि संगम रंगभूमी यांच्या विद्यमाने झाला. साधना ट्रस्टच्या वतीने एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात वेगळा कार्यक्रम झाला. त्यात साधनेच्या प्रादेशिक पक्षांवरील विशेषांकाचे प्रकाशन झाले. डॉ. सुहास पळशीकर यांनी भारतातील प्रादेशिक पक्षांच्या आजवरच्या वाटचालीचे आणि त्यांच्या समकालीन पडझडीचे अभ्यासपूर्ण विवेचन केले. सानेगुरुजींच्या 'साधना'साप्ताहिकाचे हे साठावे वर्ष असल्याने साधना ट्रस्टतर्फे वेगवेगळे उपक्रम वर्षभर राबवले जात आहेत. साठ वर्षातील 'साधने'मधील निवडक साहित्याचे आठ खंड प्रकाशित करण्यात आले. सानेगुरुजींच्या स्मारक स्वरूपात महाडजवळ एक केंद्र आकाराला येत आहे. कथामालेच्याही कार्याचा विस्तार होत आहे. 'श्यामची आई' च्या पुस्तकाच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघत आहेत. १९३४ मध्ये निघालेल्या श्यामच्या आईच्या प्रकाशनाने हक्क गुरुजींनी त्यावेळच्या अनाथ विद्यार्थी गृहाला दिले होते. आजवर त्याच्या काही लाख प्रती विकल्या गेल्या आहेत. दरवर्षी हजारो प्रती छापाव्या लागतात. मराठीतील सर्वाधिक खपाचे पुस्तक म्हणून 'श्यामची आई'चा उल्लेख होतो. 'श्यामची आई'चे इंग्रजी भाषांतरही काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाले होते. पुणे विद्यार्थी गृहाच्या शताब्दीच्या निमित्ताने आदिती कुलकर्णी यांनी

केलल्या इंग्रजी भाषांतराची रंगीत सचित्र आवृत्ती नुकतीच प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते प्रकाशित झाली. ''सानेगुरुजींच्या मातृहृदयी मनाने केलेले लेखन प्रत्येक उमलत्या मनाचा ठाव घेणारे ठरले आणि या लेखनाच्या माध्यमातून गुरुजींनी ज्ञानसंपादन, ज्ञानवितरण हा शिक्षकाचा धर्मच नव्हे तर मातृधर्म आहे असा संदेश दिला आहे'' असे प्रतिपादन प्राचार्य शेवाळकर यांनी केले. समाज बदलला तरी सानेगुरुजी, विनोबा भावे हे आमच्या भावजीवनाचे चैतन्यदायी, शिल्पकार आहेत, जग कितीही बदलले, बिघडले तरी सानेगुरुजींनी गायिलेले मातृधर्माचे हे स्तोत्र अभंग राहील, चिरस्मरणात राहील. मातेच्यापेक्षा जगात श्रेष्ठ अन्य काही नाही. जगाच्या उत्पत्तीचे आदिशक्ती हे कारण आहे आणि स्त्री हे मातृत्वाचे तीर्थस्थान आहे. जगात इतर सर्व गोष्टी विकत मिळू शकतात पण मातृप्रेम विकत मिळत नाही. श्यामची आई हे आचार्य अत्रे यांनी महटल्याप्रमाणे मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र आहे. त्याला तुलना नाही. असे विचार त्यावेळी प्रा. शेवाळकरांनी मांडले. सानेगुरुजींच्या विचारांचे स्मरण आणि त्यांच्या कार्याची पालखी पुढे नेण्याचे काम त्यांची धडपडणारी मुले आजही करीत आहेत ही महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनातील एक दिलासा देणारी, अभिमानास्पद गोष्ट आहे. साधना, कथामाला, आंतरभारती, विश्वभारती, सेवादल वगैरे सर्वच आघाड्यांवर गुरुजींचे स्मरण प्रेरक ठरत आहे.

**शंकर सारडा**


**नवरा म्हणावा आपला**

**चतुर्भुज**




**नवीन आकर्षक रूपात**

**वपु काळे**




**किंमत ८० रु.**
**पोस्टेज २५ रु.**

**किंमत १०० रु.**
**पोस्टेज २५ रु.**

## नवे कोरे

# परशुधारी परशुराम

## सुधाकर शुक्ल

**किंमत २००रु.**
**पोस्टेज ३०रु.**





*महान तपस्वी भृगुऋषींच्या कुलात जन्म घेतलेल्या भार्गवरामांचे चरित्र, गूढ आणि अतर्क्य असेच आहे. ब्रह्मज्ञानाने परिपूर्ण असलेले भार्गवराम हे खरे क्षत्रिय होते. पृथ्वीवरच्या अन्यायी आणि अधर्मी राजांचा पराभव परशुरामांनी स्वत:च्या सामर्थ्यावर केला. परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केली असे म्हणणे चुकीचे आहे. त्या काळात राजा दशरथ, राजा जनक यांसारखे अनेक राजे अस्तित्वात होते. पित्याच्या वधाने संतापलेल्या परशुरामानी सहस्त्रार्जुनाचा वध केला. जिंकलेला प्रदेश गुरू कश्यपांच्या हाती देताना परशुराम निर्विकार होते. गुरू कश्यपांच्या आज्ञेने, स्वत:च्या सामर्थ्याच्या बळावर परशुरामांनी अपरान्त भूमी निर्माण केली. निर्माण केलेली कोकणभूमी सुजलाम् सुफलाम् केली. विविध ठिकाणी देवदेवतांची स्थापना करून धर्मप्रसार आणि धर्मरक्षणाचे महान कार्य केले. लोककल्याण हेच परशुरामांच्या जीवनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. असंख्य भक्तांच्या अंत:करणात परशुरामांच्या बद्दल आदराचे आणि भक्तीचे जे स्थान निर्माण झाले ते अढळ आहे.*

## पुस्तक परिचय

# जीवनातील वेगवेगळे अनुभव आणि त्याद्वारे येणारे अनोखे आत्मभान

## काळाकभिन्न

**स्वाती चांदोरकर**



**स्वा**ती चांदोरकर यांचा दुसरा कथासंग्रह 'काळाकभिन्न'

हा कथासंग्रह त्यांनी आपली कन्या मृण्मयी हिच्या 'रुखवता'साठी सजवला आहे. व. पु. काळे यांनी आपली कन्या 'स्वाती वसंत काळे' हिला 'स्वाती राजन चांदोरकर' होताना सांगितले होते. ''गतकाळातल्या चांगल्या गोष्टींचं जतन कर म्हणजे तू अशीच हसत राहशील.'' तेच 'मृण्मयी राजन चांदोरकर' हिला 'मृण्मयी हर्षद पटवर्धन' होताना, स्वाती चांदोरकर तिची आई म्हणून सांगू पाहतात; निखळ आनंद देणारे अनेकक्षण आपल्या कन्येने आपल्या ओटीत टाकले. त्यांची परतफेड करणे काही शक्य नाही. तेव्हा वपुंनी आपल्याला दिला तसाच 'घरचा आहेर' आपल्या कन्येला देण्याची इच्छा पूर्ण केली आहे.

''मी अगदी माझा, स्वत:चा आहेर तुझ्यासाठी त्यांच्याच आशीर्वादाने तयार करू शकले... हे पुस्तक.... तुझ्या विवाहप्रसंगी रुखवत म्हणून सजवलं जाणार... उद्या मृण्यमी हर्षद पटवर्धन झाल्यानंतरही यशस्वी व्हावीस, सर्वांना प्रिय वाटावीस अशा शुभेच्छांसह...'' पुस्तकरूपी आहेर त्यांनी दिला आहे.

वपुंप्रमाणेच त्यांची कन्याही आपल्या भावनोत्कटतेचा हा जो आविष्कार करीत आहे तो वपुंच्या चाहत्यांना हेलावून टाकील यात शंका नाही.

स्वाती चांदोरकरांचा पहिला कथासंग्रह 'गोल गोल राणी' जून २००६मध्ये प्रकाशित झाला होता. त्यातील कथा वाचताना वपुंच्या निवेदन शैलीची, वपुंच्या पठडीतल्या व्यक्तिरेखांची, वपुंच्या जीवनशैलीविषयक भूमिकेची आठवण होत होती, चमत्कृतिपूर्ण शेवटांमुळे मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनातील सुखदु:खाचा मानवतावादी आणि काहीसा आदर्शवादी वेध घेताना वपु फँटसीचा आल्हादकारक कल्पक वापर करीत. 'गोल गोल राणी'मधील दिशाहीन, शुभमंगल, फूट आणि फूटवेअर, ऋणानुबंध, दिशा वगैरे कथांमधील व्यक्तिरेखा आणि त्यांच्या जीवनातील चमत्कृतिपूर्ण कलाटण्या या अंतर्मुख करणाऱ्या होत्या.

'काळाकभिन्न'मधील कथा वाचतानाही वपुंची आठवण होत राहते. पण विषयात, प्रतिपादनात थोडेफार वेगळेपणही जाणवते.

'हरवले आहेत' या कथेतले आडदांड, झुपकेदार मिशा, घारे डोळे असणारे किशाकाका घरी रात्री उशिरापर्यंत येत नाहीत म्हणून काकू आपल्या पुतण्याला फोन करतात... कुलाब्याहून डोंबिवलीला हा पुतण्या जातो. सर्वत्र शोध घेतो. पण काकाचा पत्ता लागत नाही... पोलिसांकडे तक्रार नोंदवतो. एक दिवस पोलिस स्टेशनवरून फोन येतो. जळगावला कुठल्याशा हॉस्पिटलमध्ये अशा वर्णनाची व्यक्ती आहे... जळगावला जाऊन बघितलं तर तशी कोणी व्यक्ती सापडत नाही. पत्र पाठवणाऱ्याचा पत्ताही बोगस... काकाच्या या शोधाशोधीत

पुतण्याचे तीन महिने जातात. पुतण्याची पत्नी नेत्रा वैतागून जाते. काकाच्या परदेशात राहणाऱ्या मुलाला ती बोलावून घेते...

पुतण्याला आपल्या पत्नीचा वैताग दिसतो. तिच्या वागण्यातला तुटकपणा दिसतो. परकेपणा दिसतो. तेव्हा त्याच्या मनात येते, ''किशाकाका हरवला, बेपत्ता झाला. तो कदाचित् सापडेल. त्याला वाटेल तेव्हा परतही येईल. तो शरीराने हरवला आहे. परंतु नेत्रा - आपली पत्नी मनाने हरवली आहे.ही आपली नेत्रा नाही; ही कुणी वेगळीच स्त्री आहे... डोंबिवलीच्या आपल्या फेऱ्या थांबल्या आणि नेत्राला नेहमीसारखा आपला सहवास मुबलक मिळाला म्हणजे ती पुन्हा आपली नेहमीची नेत्रा होऊन जाईन. पण तसं होण्यापूर्वी तिने स्वत:ला माझ्यासाठी हरवून दिलं आहे.'' त्यामुळे पुतण्याला प्रश्न पडतो, शरीराने बेपत्ता झालेली माणसे मिळतीलही. परंतु मनाने हरवलेली, बेपत्ता झालेली माणसे मिळतील का? नाही मिळणार. ती डोळ्यासमोर असतील, वावरतील, पण त्यांचं मन आपल्यापाशी नसेल असं मन हरवलेल्या शरीराबरोबर संसार निभावता येईल का? 'मन हरवलेल्या व्यक्ती'ची ही कल्पना वाचकांना वेगळी वाटेल. मानस शास्त्रालाही कदाचित् वेगळी वाटेल.

आई-वडील विभक्त होतात. मुलांना दुरावतात. कुठे कुठे संबंध पार बिघडतात. मुले आई किंवा वडील यापैकी एकाजवळ राहतात. त्यावेळी त्यांना काय वाटत असेल? आईजवळ असणाऱ्या मुलांना वडिलांची आठवण येत नसेल? वडिलांजवळ असणाऱ्या मुलांना आईची आठवण येत नसेल? परीक्षेतील यश, लग्न, अपत्यजन्म अशा आनंदाच्या क्षणी त्यांच्या हृदयात किती खळबळ माजत असेल? याकडे लक्ष वेधणारी 'टाहो' ही कथा आहे.

चित्रा आणि हनुमान या जोडप्याला कविता ही मुलगी. चित्रा कमावती. घरसंसार तिच्याच पगारावर चाले. हनुमानचे बस्तान नीट कधी बसले नाही. चित्राने घटस्फोटासाठी कोर्टात दावा दाखल केला. कन्या कवितावर हनुमानचे खूप प्रेम. पण कविताचा ताबा कोर्टाने चित्राकडे दिला. हनुमंत कोसळला. शहर सोडून गेला. अधूनमधून धूमकेतूसारखा येऊन तो कविताला जीव लावायचा. कविताची कुतरओढ वाढत राहिली. चित्रा त्यामुळे आपल्या या घटस्फोटित नवऱ्याचा जास्तच तिरस्कार करू लागली. कविताचे कन्यादान करण्याचे काम चित्राकडून हनुमानचे जवळचे मित्र अक्षय आणि अश्विनी यांच्यावर सोपवण्यात येते. हनुमंत लग्नाच्यावेळी मंडपात येऊ शकत नाही. तो जवळच्याच हॉटेलात येऊन थांबतो. अक्षयला हनुमंतचा मोबाईल येतो. ''कविता कशी दिसते आहे?... चित्रा कशी आहे?... चित्राला सांभाळ... आईने मंगलाष्टकं ऐकायची नसतात... मला फोनवरून मंगलाष्टके ऐकव.'' हे बोलताना अक्षयचे डोळे भरून येतात.

मंगलाष्टकाच्या वेळी अश्विनी चित्राजवळ जाऊन बसते. अक्षय अक्षता टाकता टाकता मोबाईल ऑन करतो. कविता म्हणते, ''बाबा पाहिजेत.'' अक्षय तिला मोबाईल दाखवतो. हनुमंत मोबाईलवरून मंगलाष्टके ऐकतो. कवितानंतर अक्षयला म्हणते, ''काका... बाबा पाहिजेत. मला बाबांच्या गळ्यात पडून भरपूर रडायचं आहे... इतक्या वर्षातले जमवलेले अश्रू त्यांच्या मिठीत वाहून टाकायचे आहेत... बाबा असा 'टाहो' फोडावासा वाटतंय....''

वपुंच्या 'पपा' या कथेतल्या आश्रमवासीय मुलीचा ''पपा'' हा टाहो ऐकून आश्रमाचे गुरुजी म्हणतात, ''हा तुझा टाहो तुझ्या स्वर्गवासी पपापर्यंत नाही पोहचणार मुली.''

या कथेतील अक्षय म्हणतो, वपुंच्या कथेतले पपा स्वर्गवासी झालेले होते. पण येथे शंभर-सव्वाशे पावलांच्या अंतरावर असलेल्या बापाला त्याच्या मुलीचा टाहो ऐकू येत नव्हता. बाप असूनही पोरगी पोरकीच राहिली... अक्षयच मग हनुमंतला जवळ घेत बापाच्या मायेने थोपटत राहतो.

लहान वयातच कवितेला हनुमंतने लावलेला लळा दाखवणारे अनेकविध प्रसंग लेखिकेने भावनेने ओथंबून रंगवलेले आहेत. कविता ही आपल्या आईला काही सांगू शकत नाही- ही तिची हतबलता... अक्षय-अश्विनीलाही हतबल बनवते. हळवेपणानेच या सर्व घटनेकडे पाहून ती तशी रंगवली जाते. ज्यांना हा हळवेपणा निरर्थक वाटेल त्यांना या कथेतले नाट्य जाणवणे मुश्किल!

शमीम या आपल्या मुलाच्या लग्नाची तयारी करताना, त्याच्या आई-वडिलांमध्ये आपल्या लग्नाच्या वेळच्या आठवणींची उजळणी होत राहते आणि जुन्या स्मृतींचा अल्बमच जणू डोळ्यापुढे येतो हे 'अल्बम' या कथेचे आशयकेंद्र. सत्तावीस वर्षांपूर्वी झालेले ते लग्न. नवरदेवाच्या आईचे दुधापाण्याने धुतलेले पाय पुसण्याचे राहिले म्हणून खवळलेली वरमाय; घराण्याचा दीप जन्माला आला तरी वरमाय हुप्प ती हुप्पच! जिलब्यांचे ताट पडले म्हणून नववधूवर धांदरट हा शिक्का बसला तो कायमचाच! होमाच्या वेळी फेंदारलेले नवऱ्याचे नाक... जाड्याभरड्या शालूच्या पोत्यात नवरीचा उकडून हैराण झालेला जीव. वरवधू पक्षातील चिडचिड... या पार्श्वभूमीवर या नव्या लग्नाची चाललेली तयारी... आहेर... लग्नपत्रिकेची छपाई... इत्यादीची चर्चा. लग्नानंतर शमीम-विशाखा या नवदांपत्यातही होणाऱ्या तशाच वळणाच्या चर्चा... लग्नाला आलेले इव्हेंटचे स्वरूप... त्यावरून पडलेला प्रश्न. एवढा पाण्यासारखा पैसा ओतून आपण लग्न करतो. पण त्यानंतर ते नवदांपत्य सुखात असते का? आनंदात असते का?... तसे असले तर घटस्फोटांचे प्रमाण का वाढतेय?.. तेव्हा लग्न कसे होतेय यापेक्षा ते टिकेल कसे हे आजच्या तरुणांना शिकण्याची गरज आहे. शमीम-विशाखा या नवदांपत्याला

भरारी मारण्यासाठी त्यांच्या पंखात बळ यावं म्हणून आपण पैसे तर देऊ पण नंतर गुण्यागोविंदाने ते नांदताना दिसायला हवे... ते सुख मिळायला हवे ही अपेक्षा शमीमचे माता-पिता व्यक्त करतात. बहुतांशी संवादातूनच ही सर्व कथा या संदेशापर्यंत पोचते.

शहरातील नाला हाही स्वाती चांदोरकर यांच्या कथेतले एक पात्र बनून वावरतो. 'अल्याडपल्याड'मध्ये एका पॉश टॉवरमध्ये राहणारे उच्चभ्रू लोक आणि त्याच्याच पलीकडच्या नाल्याच्या दुसऱ्या भिंतीला लागून असलेली झोपडपट्टी... यांच्यातील जीवनाची विविध दृश्ये लेखिकेने उभी केली आहेत. कामिनीराणी या अभिनेत्रीच्या वास्तव्यामुळे टॉवरचा भाव वाढतो. तिच्याकडे पार्ट्या होतात. झोपडपट्टी पुनर्वसन योजना पुढे करून त्या शेजारी वनरूम किचन-फ्लॅटचा टॉवर उभा केला जातो... कामिनी आपल्या हुकलेल्या पुरस्कारामुळे चिडून आपल्या प्रियकरालाच घराबाहेर काढते. हे सर्व पाहणारा नाला... त्याच्या अंतर्मुख आत्मचिंतनाने लेखिका ही दृश्यमालिका संपवते.

हा शहरातला नाला ओळोखेपिळोखे देत संथपणे वहात राहतो. त्याला वाटते, ''खरे तर आपण गोड पाण्याच्या नदीचा ओहोळ. पण या आधीच्या झोपडपट्टीने आणि टॉवरने, घाण, कागद, कचरा टाकून आपल्याला दुर्गंधीचा वारसा दिला आहे. पाणी गोड होतं तेव्हाही आपण मिरवलो. नाला झालो तेव्हाही मिरवलो. पण खरे आपण दुर्गंधीत झालो आहोत ह्या शब्दांनी! ही माणसं शब्दांनी दुखावतात. मग ती झोपडपट्टीतील असोत किंवा टॉवरमधली. माणसं शेवटी सारखीच मग ती कुठंही राहोत... वस्त्र भरजरी असो की फाटकं-तुटकं... वृत्ती सारख्याच!'' (७८)

माणसं कठोर, अभद्र, गैरशब्द वापरून एकमेकांमध्ये अकारण कटुता आणि दुरावा निर्माण करतात याचे त्या नाल्यालाही क्लेश होतात.

'वस्तुस्थिती'मध्ये लेखिका म्हणते, ''ही कथा नव्हे. कल्पनाविलासही नव्हे. जे मी आत्ता सांगितले आणि तुम्ही वाचले, ती एक वस्तुस्थिती होती. या वस्तुस्थितीला अंत नाही म्हणून कादंबरीइतकं की कथेइतकं मोजमाप नाही. लिहिता-लिहिता एकच जाणवलं. विषय नेहमीचाच. प्रत्येक काळात, प्रत्येक सनावळीत चालू राहिलेला. स्त्रीमुक्ती- नारेबाजी चालू. प्रत्येक काळात मोठमोठाले लेख लिहायचे आणि वस्तुस्थिती म्हणून सोडून द्यायचे.'' (१२७)

इंटरनेटवर चालणाऱ्या चॅटिंगवर 'मी आणि चॅमी'मधून एक 'कवडसा' टाकला आहे. इंटरनेटवर भेटलेल्या कोणा एकाला डॉक्टरशी झालेल्या चर्चेतून पंचावन्न वर्षे वयाच्या मास्तरांच्या मेनोपॉजचा विषय निघतो आणि त्यावर काळ हेच औषध असा उतारा सांगण्यात येतो. मेनोपॉज म्हणजे मन म्हणते जरा पॉज

घे. तारुण्य ओसरलेय, वार्धक्य जवळ येतेय. खूप धावपळ केलीस, आता थोडा थांब. चॅमी म्हणजे चॅटिंग मित्र. त्याचे एक बरे असते, नाही त्याच्याशी पटले तर त्याला टाळता येते.

'हिशोब' या कथेचे स्वरूप 'अल्बम'प्रमाणेच पती-पत्नीमधील संवादात्मक आहे. ही चर्चा कशाबद्दल आहे? तर आपल्या दोघांच्या पगारात व कमाईत बचत करून भविष्यकाळाची तरतूद कशी करायची याच्या संदर्भात ही चर्चा आहे. त्याने ओव्हर टाइम करायचा, दरमहा विविध बाबींबद्दल होणाऱ्या खर्चाची पाकिटे करून ठेवायची. उरलेली रक्कम बँकेत बचत खात्यात भरायची... पुढे अनपेक्षित खर्च उद्भवतात.

घराचे हप्ते थकतात... पाकिटावरून वाद होतात आणि बाळाचे आगमन झाल्यावर सर्वच पाकिटे बाद करावी लागतात... मध्यमवर्गीयांची ही परवड अजूनही संपत नाही, याची बोच लेखिकेला कुठेतरी सतावत असावी.

फँटसीकडे वळणाऱ्या काही कथा या संग्रहात आहेत.

'सहेलियोंकी बाडी' हे उदयपूरमधील एक प्रेक्षणीय स्थळ. तेथे राजघराण्यातील स्त्रिया कारंजांच्या तुषारात विसावत. सहा हौद... बाजूला महिरपी चौथरे... मधे कारंजी... भोवताली प्रशस्त वाडा.

लेखिका ही वाडी बघायला जाते. तिला प्रश्न पडतो, ''कसं असेल त्या काळचं वातावरण? त्या काळचे लोक? त्या काळचे राजे आणि राण्या?''

- आणि तिला पडलेल्या या प्रश्नाचे उत्तरही मनातल्या मनात मिळते. ''तुला माहित नाही? घाबरलीस.'' असे शब्द कानावर येतात आणि तिला दिसते एक नखशिखान्त नटलेली राजस्थानी स्त्री. ती स्त्री विचारते, ''ओळखलेस मला?''

नंतर ती स्त्री स्वत:ची ओळख करून देते. ''मी आहे महाराणी रती आणि तू होतीस त्यावेळी माझी मैत्रिण मीनाक्षी. पाचशे वर्षांपूर्वी... चल, तुला संपूर्ण महाल फिरवून दाखवते... त्यावेळच्या घटनांच्या आठवणी सांगते...''

...जुन्या इतिहासाची उजळणी होते. नव्या वातावरणाशी तुलना होते. आजचे डान्सबार, गुन्हेगारी टोळ्या, पैशाचा प्रभाव, स्त्रियांवर भर दिवसा होणारे अत्याचार...

''माझा विश्वासच बसत नाही..'' महाराणी म्हणते. माझं डोकं गरगरतंय.

''राणीसरकार. मी दुबळी आहे. हतबल आहे, पण तुमच्याशी बोलल्यानं मला मोकळं वाटतंय. तुम्ही माझी माझ्या आधीच्या जन्माशी भेट घालून दिलीत. त्यावेळची पवित्रता, शांतता आम्ही हरवून बसलोय... तुम्ही भाग्यवान... या तटबंदीत सुरक्षित, सुखी आहात.... माझ्याबरोबर चला.''

आणि तेवढ्यात गाईडचा आवाज येतो... तेथून बाहेर पडावे लागते.

राजस्थानच्या प्राचीन वैभवाचे दर्शन घडवण्यासाठी वापरलेली ही फँटसीची शैली वाचकांना आकर्षक वाटेल. आजच्या वास्तवाशी तुलनात्मक संबंध जोडून त्या फँटसीचा फुगा फोडला आहे. कदाचित् हा उत्तरार्ध वेगळ्या रीतीने अधिक काव्यात्मक होऊ शकला असता...

'आटपाट नगरी'मधील विदूषक अस्वस्थ असतो. महाराजांना नगराची खरी वार्ता देता येत नाही, प्रधानाचा कारभार नगरीला अधोगतीला नेत आहे, या प्रयलंकारी संकटाची कल्पना महाराजांना देता येत नाही- या विवंचनेत तो असतो. त्यावर त्याची पत्नी त्याला सल्ला देते, ''महाराजांना नगरीचा फेरफटका करण्यासाठी उद्युक्त करा... राजांना समक्षच सर्व दिसेल. तुमची कहाणी सत्य आहे हे कळेल.''

महाराज कॅम्प्युटरवर गेम खेळत दिवस घालवतात. कौन बनेगा करोडपतीसारखे बघतात... विदूषक त्यांना समकालीन शिक्षणातील, दुराग्रह, नगरातील उखडलेले रस्ते, त्यामुळे सर्वत्र दिसणारे खड्डे, भटक्या कुत्र्यांना विष घालून ठार मारण्याचे प्रकार, इंटरनेटवरील मेतकुट साइटवर दिसणारी तरुणींची उघडीवागडी चित्रे, झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनातले गैरप्रकार, टेलिव्हिजनवर दाखवण्यात येणारे क्रौर्य व अत्याचार, वगैरेंच्या कहाण्या सांगतो. राणीसाहेब त्याबाबत धोरणात्मक बदल जाहीर करतात. मुंगळ्यांच्या वारुळात डाळीचा एकेक दाणा आणून साठा करणे चालू असताना मुंगीला त्या साठ्याचा पत्ता लागला. ती आरामात त्याचा फडशा पाडू लागली. तिने इतर मुंग्यांनाही ही शुभवार्ता सांगितली. त्यामुळे असंख्य मुंग्या मुंगळ्यांच्या वारुळात वास्तव्य करून जमवलेल्या धान्याचा उपभोग घेऊ लागल्या. मुंग्यांनी मुंगळ्यांच्या भागात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. तेव्हा मुंग्यांना परत त्यांच्या भागात पाठवावे, त्यांची घुसखोरी थांबवावी असे राणीला जाहीर करावे लागते. टीव्हीवर चालणाऱ्या अवैचारिक मालिका बंद करण्यात येतात. मुंगळ्यांच्या वस्तीतून मुंग्यांना हद्दपार करण्यात येते... पण काही दिवस जातात आणि पुन्हा पूर्वीसारखेच सर्व होऊ लागते.

'आटपाट नगरी'मधील हे सर्व कल्पनारंजन समकालीन वर्मावर बोट ठेवते.

या कथासंग्रहाला शीर्षक पुरविणारी काळाकभिन्न ही कथा 'अल्याडपल्याड'मधील नाल्याप्रमाणे रस्त्याला केंद्रस्थानी बसवते.

काळाकभिन्न रस्ता. काळ्या डांबरी रंगाने चकाकणारा. नुकताच रोलरने मलमपट्टी केलेला, गुळगुळीत.

त्यावर भरधाव जाणाऱ्या दोन कार... त्या एका ट्रेलरला धडकतात... अपघात... हिमांशू वगैरे तरुण ट्रेलरखाली चिरडतात. रस्ता रक्ताने चिकट होतो.

रस्ता म्हणतो, ''अरे पावसा, तडातड तडतड. माझे हे मऊसूत अंग उखडून टाक... मला जखमा होऊ देत. खड्डे पडू देत, म्हणजे तरी हे लोक गाड्या हळू चालवतील. माझ्या अंगावर हे लाल चिकट स्राव ओघळणार नाहीत... मला उखडून टाक.''

रस्ता ओबडधोबड बरा. तो गुळगुळीत केला की वाहने भरधाव चालवली जातात, त्यातून अपघात होतात हे सांगण्यासाठी हा खटाटोप.

सदाशिव भोळे यांचा सपत्नीक पालीला जाण्याचा बेत. त्याची जय्यत तयारी आणि कॉलेज तरुणांची अलिबागला समुद्रकिनारी हॉटेलात रंगलेली पार्टी... या दोन स्तरावर चाललेले नाट्य...

.... आणि त्यात घडणारा हा अपघात.

विविध घटकांचा हा घातलेला मेळ....

रस्त्याच्या वर्णनाचे मधूनमधून येणारे पालुपद.

एखाद्या कवितेसारखी रचना करण्याची क्लृप्ती या कथेमध्ये वापरली आहे. कथा निवेदनाचे वेगवेगळे प्रयोग करण्यावर भर असल्याने कधी संवाद-संभाषणातून तरी कधी विरोधात्मक चित्रणातून, कधी नाट्यात्मक दृश्यमालिकेतून तर कधी फँटसीवजा वातावरण निर्मितीतून आशय प्रभावी किंवा गडद करण्याचा प्रयत्न दिसतो. संघर्ष नेमका कशात आहे हे लक्षात आले तर कथानकातील नाट्य खुलत जाते. तो नेमका पकडणे न जमले तर पाल्हाळ आणि पसारा वाढत जातो.

स्वाती चांदोरकर यांना एक कथालेखिका म्हणून जे सांगायचे आहे ते नेमकेपणाने आविष्कृत करणे कितपत जमते? जे सांगायचे आहे त्याचे आकलन नीट झालेले आहे का? संवाद-संभाषणात अकारण पसरटपणा तर येत नाही ना? अनावश्यक तपशीलाने कथेचा नेमकेपणा हरवत नाही ना? असा विचारही या सर्व लेखनप्रयोगांची निकड जाणून घेताना वाचकांच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. स्वाती चांदोरकर यांना स्वत:ची वाट शोधतानाही हे प्रश्न पडत असतील. पडायला हवेत. त्यातूनच कथांची आवाहकता अधिक धारदार आणि तीक्ष्ण होत जाईल.


**किंमत : १३०रु. सभासदांना : ९१रु. पोस्टेज : २५रु.**

# पुस्तक परिचय

## उत्कंठावर्धक निवेदनशैली आणि थरारक कथाकल्पना

## रंगांधळा

**रत्नाकर मतकरी**



रत्नाकर मतकरी यांनी गूढकथा लेखनात वेगवेगळे प्रयोग केले. वेगवेगळ्या संकल्पना वापरल्या. गूढकथा हा लेखन प्रकार घाऊक लेखनाचा नाही; त्यातील कल्पना साचेबंद होता कामा नयेत. त्यात प्रत्येक वेळी काहीतरी नावीन्य हवे याबद्दल ते जागरूक आहेत.

गूढकथेबद्दलच्या आपल्या कल्पना त्यांनी स्वत:ची मुलाखत या स्वरूपात प्रकट केल्या आहेत. 'गूढकथेचे गूढ' या शीर्षकाखाली संभ्रमाच्या लाटा या संग्रहाच्या आरंभी त्यांना ही मुलाखत दिली आहे.

* गूढकथा वाचताना वाचकांची उत्कंठा वाढली पाहिजे. गूढकथा रचताना वाचकाचा मनोव्यापार लक्षात घ्यावा लागतो.

* गूढकथेचा शेवट धक्का देणारा हवाच असे नाही; पण कथेला वेगळे वळण देणारा किंबहुना कथेला एक वेगळे परिणाम आणून देणारा असावा लागतो.

* शेवट धक्कादायक हवा असला तरी हा धक्का बाहेरून कुठूतरी एकदम नवीन काहीतरी सांगितल्यामुळे येता कामा नये तर तो बीजरूपानं कथानकातून हवा. बीजरूपानं असलेला रहस्यपूर्ण भाग हुषार वाचक ओळखू शकतो; परंतु त्याला तो ओळखता येऊ नये आणि सर्वसामान्य वाचकालाही पटेल असा शेवट देणे ही तारेवरची कसरत असते. हा शेवट नुसता चलाखपणाचा नसतो, लेखकाला मानवी जीवनाविषयी जे वाटतं किंवा लेखकाचं एकंदर जे व्यक्तिमत्त्व असतं त्यालाही साजेल असा शेवट हवा असतो.

* गूढकथा म्हणजे वाचकाला कूटप्रश्न सोडवायला देणे नव्हे. त्या कथेला विषयाचं आणि कथा या साहित्य प्रकाराचं काही तर्कशास्त्र हवं. कथेची मांडणी ही तर्कशास्त्राला धरूनच करायला हवी.

* गूढकथा म्हणजे रहस्यकथा नव्हे. मानवी मनाला जे गूढ वाटतं ते सारं काही त्यात येतं. पिशाच्च कथेपासून ते प्रत्यक्ष मानवी मनापर्यंत सर्व काही गूढकथेत येऊ शकले मरणाची कल्पना, मरणाचा अनुभव, पिशाच्च योनी, पुनर्जन्म यासारख्या गोष्टी आपल्याला गूढ वाटतात. परंतु जीवनात द्रष्टेपणा, स्वप्नं. अंतर्ज्ञान, उत्कट इच्छेमुळे काहीतरी घडणे, योगायोग, माणसाचं मानसशास्त्र या सर्व विषयांवरच्या कथा 'गूढकथा'च होत. मात्र त्यात शैली, शब्दसौंदर्य इत्यादी कशापेक्षाही त्यातल्या गूढतेमध्येच वाचकाची पकड घेण्याचे सामर्थ्य हवे.

* गूढ गोष्टही वास्तवतेच्या नजरेतून दिसू शकेल अशी हवी. सगळंच गूढ असलं तर वाचक त्याचा नाद सोडून देईल. बरंचसं अनुभवातलं आणि थोडसंच अनोखं असलं तर मात्र वाचकाला ते समजून घ्यावंसं वाटेल.

* परीकथा आणि गूढकथा या दोहोतही एक आंतरिक संगती आहे. दोहोतही

अद्भुत कल्पनाची बोली आहे. अद्भुताचे, अनिमानुषचे आणि रहस्यमयतचे भावरम्य (लीरिकल) कल्पनारम्य रूप परीकथेत साकार होते तर त्याचेच भयकारक रूप गूढकथेतून समोर येते. परंतु दोहोतही मानवी जीवनाचे आणि व्यक्तिमनाचे वास्तव आणि त्यांच्याशी अपरिहार्यपणे जडलेले कारुण्य यांचा संदर्भ सतत जागा असतोच.

* परीकथा व गूढकथा ही कथेचीच वैशिष्ट्यपूर्ण रूपे. अनुभवदर्शनासाठी कथाकार विविध माध्यमे योजू शकतो. अद्भुत अथवा गूढ हे केवळ एक माध्यम असते याचे भान ठेवले पाहिजे.

* भुतांच्या गोष्टी व खुनांच्या गोष्टी म्हणजे चित्तथरारक, भयोद्दीपक, रंजक वाङ्मय या दृष्टीने गूढकथेकडे पाहणे गैर आहे. रहस्यकथा व गूढकथा यांचीही गल्लत करू नये.

तसे पाहिले गेले तर कोणतीही उत्कृष्ट वास्तवदर्शी कथा ही एक व्यापक अर्थाने गूढकथाच असते. कारण अखेर तीही मानवी मनाच्या आणि जीवनाच्या गूढतेचीच प्रचीती आपल्याला घडवीत असते. तसेच कोणतीही गूढकथा ही अद्भुताची, प्रसंगी अतिमानुषाची योजना करीत असली तरी ते अतिमानुष वा अद्भुत वास्तवलक्षीच असते.

* गूढ कथेतील अतिमानुष हे वास्तवाभिव्यक्तीचे एक माध्यम असते.

* गूढकथा ही एक प्रकारे व्यावहारिक पातळीवरल्या गूढाकडून तात्त्विक पातळीवरच्या गूढाकडे आपल्याला नेत असते.

* वाचकाला गूढाचा प्रत्यय घडविणे, अज्ञाताविषयीचे भय त्याच्या मनात जागविणे, भयाचा आणि रहस्यमयतेचा ताण त्याला अनुभवायला लावणे हा गूढकथेच्या संपूर्ण अनुभवातला एक टप्पा मानावा लागेल. हा प्रत्यय घडवणे एवढेच गूढकथेचे लक्ष्य नव्हे. या प्रत्ययाद्वारे वाचकाला जीवनातील गूढाकडे नेण्याची ताकद गूढकथेत असते. असली पाहिजे.

* अतिमानुषाचे माध्यम, त्याच्या उपयोजनेतील विविध शक्यता अजमावून पाहताना हे अतिमानुष प्रतीकात्म पातळीवरच वाचकाला भावते. माणसाच्या अंतर्मनाचे, त्याच्या सुप्त, गूढ अंतस्थ प्रवृत्ती प्रेरणांचे रूप त्यातून वाचकाच्या प्रत्ययास येते.

* भुते ही भयकारक किंवा केवळ भयकारक नव्हेतच. भयावहता हा त्यांच्या व्यक्तिदर्शनाचा फक्त एक घटक असतो. ही भुते आपल्यासमोर अनेक पदरी, अनेक पैलू असलेली व्यक्तित्वे घेऊन ठाकतात. ही व्यक्तित्वसंपन्नता स्वाभाविकच म्हणावी लागेल. कारण ही भुते माणसांचीच आहेत आणि भूत योनीत गेल्यावरही ती आपले मूलभूत माणूसपण सोडत नाहीत.

* काही कथांमध्ये अवतारणारे अतिमानुष हे मानवी नसते. ते निखळपणे अतिमानुषच असते.

* चांगली गूढकथा ही त्या त्या लेखकाची विशिष्ट शैली आणि त्याचे व्यक्तिमत्त्व यातूनच बनत असते.

* गूढकथेचा सगळा भर गूढ खरंखुरं वाटण्यावरच असतो. वातावरण खोटं वाटलं तर भय किंवा उत्कंठा कशी वाटणार? गूढ कथांची रुचीही थोडीफार तयारी व्हावी लागते.

* गूढ विषयावर लिहूनही स्पष्ट, सुबोध लिहिणं शक्य असतं. आपल्याला हवा तो अनुभव वाचकाला अचूकपणे यावा असं वाटत असेल तर तसं लिहिणं आवश्यकच असतं कधीकधी एका शब्दानंही दिशाभूल होण्याचा संभव असतो आणि वाचक नको त्या दिशेनं विचार करायला लागला की गूढकथेला अपयश येतं.

रंगांधळा, मृत्युंजयी, संभ्रमाच्या लाटा आणि फाशीबखळ ही मतकरींच्या गूढकथांची चार पुस्तके नुकतीच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे बाजारात आली आहेत. गूढकथेची वर दिलेली अनेकविध वैशिष्ट्ये या कथांमधून दिसतात आणि मतकरींच्या या क्षेत्रातील प्रयोगशीलतेचे कौतुक वाटते. या कथांमध्ये अतींद्रिय पातळीवरचे वैशिष्ट्यपूर्ण अनुभव येतात. एखाद्या व्यक्तीच्या अकाली वा अपघाती मृत्यूनंतर तिच्या अतृप्त इच्छापूर्तीसाठी वा आधीच्या जन्मातील हिशेब वा सूड पूर्ण करण्यासाठी कोणातरी व्यक्तीच्याद्वारे पुन्हा अस्तित्व जाणवणे हा प्रकार मतकरींना बराच विश्वासार्ह वाटत असावा. त्याची वेगवेगळी रूपे त्यांनी अनेक कथांमध्ये दाखवलेली आहेत.

'संभ्रमाच्या लाटा' या संग्रहातील त्याच नावाची कथा या बाबतीतील संदिग्धतेवर, संभ्रमावर चांगला प्रकाश टाकणारी आहे. या कथेतील स्वामी निर्भय निरंतरांना व त्यांची जोडीदार नंदिनी यांना श्रीमंत वाड्यावर बोलावून विचारतात, ''आमच्या कानावर आपल्याविषयी तक्रारी आलेल्या आहेत. आपण मठामध्ये पिशाचं नाचवता... परलोकाविषयीच्या खोट्या कल्पना जनतेत पसरवून नरक आणि यमदूत नाहीत असे सांगून लोकांच्या चैनीला आणि पापाला प्रोत्साहन देता...''

स्वामी त्यावर उत्तर देतात, ''मुळीच नाही. उलट परलोकात आत्म्याला विषयोपभोग मिळू शकत नाहीत म्हणून त्याबद्दलची लालसा इथेच नष्ट करावी असे आम्ही सांगत असतो. परलोकातले आत्मे... आमचा मध्यस्थ म्हणून वापर करून इंहलोकातल्या माणसांशी संपर्क साधतात.''

त्याचा प्रतिवाद करणाऱ्या आणि त्यांना तुरुंगात टाकू पाहणाऱ्या श्रीमंतांच्या अंगावर छतावर टांगलेले झुंबर खाली कोसळते. श्रीमंत वाचतात. स्वामी आणि नंदिनी यांना कोठडीत नेऊन देहदंड द्या म्हणतात.

... कोठडीत स्वामी नंदिनीला सांगतात, ''मला मरणाची भीती वाटते... मला सुख हवं. शरीरसुख हवं. मला जिवंत राहायचंय... मी एक सामान्य माणूस आहे... मानसन्मानासाठी हपापलेला... मी स्वत:चं तत्त्वज्ञान उभारलं... पण ते खरं नाही. खरी आहे ती मरणारी भीती.''

... येथे ते स्वामीचे खोटेपण दांभिकपण त्याच्याच तोंडून प्रकट करतात.

परंतु अनेक कथांतून अतींद्रिय आत्म्यांनी परत येऊन सूडपत्र चालू ठेवल्याचे वा अतृप्त इच्छांची पूर्तता करून घेतल्याचेही त्यांना दाखवले आहे.

'रंगांधळा' मधील आरंभीचीच रंगांधळा ही कथा एका चित्रकाराच्या जीवनावर आहे.

रंगनाथ महिंद्र आंतरराष्ट्रीय ख्यातीचा मॉडर्न शैलीतला रंगांशी विलक्षण ताकदीने खेळणारा चित्रकार. त्याच्या चित्रांबद्दल आकर्षण असणाऱ्या, विज्ञानाची प्राध्यापिका असणाऱ्या तरुणीला वाटते की त्याच्या चित्रातल्या रंगांमध्ये एक जिवंतपणा आहे. चित्रात त्या रंगांना एक अपूर्व तेज चढल्यासारखे दिसायचे. त्या रंगांचे एकमेकांशी काही नाते आहे, त्यांची भाषा एकमेकांना समजते आहे. कॅनव्हासवर हा चित्रकार नुसते रंग चोपडीत नाही तर तो रंगांची एक नवी सृष्टी निर्माण करतो आहे असे तिच्या लक्षात येते. त्याच्या लँडस्केपमध्ये देऊळ, झाड, पाणी, डोंगर यांच्याऐवजी नुसते रंग असत. ''तुमची चित्रं मला आवडतात पण समजतात असं नाही. ती दृष्टीच मला नाही.''

तेव्हा रंगनाथ तिला आपल्या कलेचे एक गुपित सांगतो. ''तू हुषार आहेस. मी काही सांगितलं तर ते तुला समजेल... कुणाकडे तरी बोलावे असं खूप वाटायचं, पण ते समजू शकले असं माणूसच भेटलं नाही.. तुला सांगायचं होतं की मी नॉर्मल नाही. माझे डोळे नॉर्मल नाहीत. इतरांना नसलेली एक चमत्कारिक दृष्टी त्यात आहे... मला रंग दिसतात... इतरांना दिसतात तेवढेच नाहीत. तर फार वेगळे, फार मोठ्या प्रमाणावर दिसतात.... हे हलत असतात; श्वासोच्छ्वास करीत असतात. जिवंत असतात. नेहमीच्या जगातले रंग रेषांनी बांधलेले असतात.. माझ्या चित्रातले रंग रेषांची बंधने सोडून बाहेर पडतात... मला रेषांनी बांधलेल्या वस्तूंची चित्रं काढता येत नाहीत. रेषा पुसट झाल्या आणि रंगांनीच माझा ताबा घेतला. त्यावेळी मी नॉर्मल राहिलो नाही आणि तेव्हाच मॉडर्न आर्टिस्ट म्हणून माझा लौकिक वाढू लागला... आता आता मला रंगांवाचून वेगळं मीपण राहिलेलं नाही. आंधळ्याला काळोख दिसावा, तसा मला रंगांचा स्वत:भोवती पूर आलेला दिसतो... नुसते रंगच मला दिसतात... रेषा कमीतकमी दिसतात.. एक प्रकारचा आंधळेपणाच म्हण हा! नुसती चित्रं काढतानाच नव्हे, एरव्हीसुद्धा मला रंगांखेरीज दुसरं काही दिसत नाही... कधी हर्ष होतो कधी भीती वाटते. काय होईल माझं? मी कदाचित रंगांधळा होईल... काही बरंवाईट... तू मला आवडतेस... मला

समजेल असं वाटतंय म्हणून हे सर्व मी तुला सांगतो आहे.''

...लँडस्केप पेंटिंगसाठी रंगनाथ तिला बरोबर घेऊन एका पहाडावर जातो... आकाशात मावळतीच्या वेळी सोनेरी छटा अवतरतात... हे बघ... लखलखत्या ज्वाला... पाऊस... निळा सोनेरी पाऊस... गोल्डन ब्ल्यू... धीस इज लाइफ, धीस इज ब्युटी... करीत तो म्हणतो, ''मी चाललो! रंगांकडे चाललो'' आणि कड्याच्या टोकावरून पुढे जात राहतो... दुसऱ्या दिवशी खालच्या दरीत त्याचे प्रेत मिळते. छिन्नविच्छिन्न देह... रक्ताचा शिडकावा होऊन लालकाळे पडलेले दगड...

... उजेडात रक्ताने माखलेले ते दगड बघताना तिला विचित्र अनुभव येतो. दगडावरचे वाळलेले ते काळे रक्त पुन्हा लाल होत आहे, आपल्या रोखाने रंगांची लाट चालून येत आहे असे तिला जाणवते. ती बेशुद्ध पडते.

... रात्री तिला आवाज येतो, ''तू ऐकते आहेस ना? इथं दाट काळोख आहे. मी त्यात गुदमरतोय. मला रंग हवे आहेत. मी तुझ्या नजरेतून आता रंग पाहीन... आपल्यात एक नातं आहे... मला रंग पाहू देत. तुझ्या नजरेतून...''

ती घाबरून किंचाळते, ''नाही नाही.. आपल्यात कसलंही नातं नाही. तू येऊ नकोस. काळोखातून परत येऊ नकोस.''

... पण तिला कळून चुकते, तो आपल्या नजरेत आला आहे

दुसऱ्या दिवशी ती कॉलेजला जाते... सर्वत्र रंगच रंग तिला जाणवतात. ती गॉगल घालते तरी रंग गर्दी करतात. ''मी आलो आहे'' असा आवाज येत राहतो. तो आता जाणार नाही. तो आपल्या डोळ्यात कायमचा राहणार... आपण रंगांधळी होणार... रंगाची गुलाम होऊन सारे आयुष्य घालवावे लागणार....

ती कॉलेजच्या प्रयोगशाळेत जाते. सारे धैर्य एकवटून डोळ्यांत ॲसिडचे थेंब टाकते.... तिची दृष्टी जाते. रंगांच्या त्या लाटांपासून दूर होते. नित्य काळोख तिला सुखाचा वाटतो. ''या काळोखात रंगनाथचा आत्मा तडफडत असेल, पण माझ्या डोळ्यांची दारे त्याला बंद केली आहेत.'' असे ती म्हणते.

आता ही तिची कहाणी डेड एन्डला येऊन पोचली आहे असे वाचक म्हणून आपल्याला वाटते... पण नाही.. ही कहाणी इथे संपत नाही.

एका पार्टीत ही दृष्टिहीन, गॉगल लावलेली तरुणी बघून कोणातरी तरुणाला तिच्याजवळ जावेसे वाटते. त्याला आपल्याबद्दल वाटणारे कुतूहल तिला जाणवते; आणि आपली ही कहाणी त्याला सांगते. ती कहाणी ऐकल्यावर आपल्यात व तिच्यात एक नवे नाते निर्माण झाले आहे असे त्याला वाटते.

पार्टीहून घरी पोचल्यावर तो दार उघडतो. खोलीत काळोख नसतो. सबंध खोली निळ्याजांभळ्या रंगांनी झगमगत आहे असे त्याला दिसते.

रत्नाकर मतकरी यांनी या कथेला शेवटी दिलेले हे वळण त्यांच्या गूढकथाकाराच्या प्रतिभेची खरी कमाल दाखवते. त्या तरुणीने रंगनाथच्या डोळ्यांना आपल्या डोळ्यांतून बघण्यास मज्जाव केला खरा, पण तिच्याच माध्यमातून नवपरिचित तरुणाच्या डोळ्यांचा ताबा घेऊन रंगनाथ आपले अस्तित्व सिद्ध करायला सज्ज झाला होता!

रत्नाकर मतकरी यांच्या अत्यंत नावाजलेल्या गूढकथांमध्ये 'रंगांधळा' गणली जाते. तिची केंद्रीभूत कल्पना खरोखरच नावीन्यपूर्ण आणि चमत्कृतिपूर्ण आहे... वाचकांना शेवटी आणखी एक धक्का देणारी मतकरींचा मास्टर स्ट्रोक या कथेची परिणामकरकता वाढवतो. रंगांशी निगडित असणाऱ्या परिचित संवेदनेला मतकरींनी उलटेपालटे करून, रंगांच्या अभावाऐवजी रंगांच्या अतिरंजित जाणिवेचे परिमाण दिले आहे; त्यामुळे चित्रकाराच्या चित्रांवर पडलेल्या प्रभावाचे स्वरूपही दाखवले आहे. रंगांचा हा मुक्तसंचार बघणारे रंगनाथचे डोळे, ते त्याच्या मृत्यूनेही बंद होत नाहीत. अतृप्त आत्म्याने आपल्या इच्छेच्या पूर्ततेसाठी दुसऱ्या एखाद्या व्यक्तीत संचार करावा त्याप्रमाणे रंगनाथचे हे डोळे त्या तरुणीच्या डोळ्यांचा उपयोग करू पाहतात; तिने ते डोळे निकामी करून घेतल्यावर तिच्यात रस घेणाऱ्या अन्य तरुणाचा ताबा ते घेऊन टाकतात... असा आपल्या पारंपरिक कल्पनेचा एक वेगळा आविष्कार या कथेत दिसतो. चित्रकाराला दिसणाऱ्या रंगांच्या अचाट वैभवाची चुणूक रंगनाथच्या संवदेनक्षमतेद्वारे मतकरी लक्षात आणून देतात. एखादी कल्पना ही चौफेर फुलवण्याची, निसर्ग-व्यक्तिरेखा-कलाविशेष-भावाविष्कार-भाषाविशेष अशा विविध घटकांचे एकजीव रसायन साधण्याची मतकरींची करामत वाचकांना मंत्रमुग्ध करण्यात यशस्वी ठरते. तिच्या अंधत्वाची कल्पना असूनही तो जेव्हा तिच्याजवळ जातो तेव्हा ती त्याला विचारते, ''तुम्ही कधी कुणावर प्रेम केलंय?... नसेल तर नका करू. प्रेमात माणूस फसतं. इतकी सुंदर वाटणारी आणि इतकी डेड्ली गोष्ट जगात दुसरी नसेल. नाही आणखी एक डेडली गोष्ट जगात आहे. रंग...'' कथा वस्तूत रंग भरायलाही अशी विधाने केली जातात असे वाचकाला वाटते, पण या रंगांचे वेगळे जे अस्तित्व नंतर जाणवते- त्यामुळे अशा विधानातले खरे रहस्य पुढे लक्षात येते... 'आयरनी'चे, दैवदुर्विलासाचे हे एक प्रलंयकारी दर्शन असते.

'झुंबर' ही या संग्रहातली कथाही झपाटून टाकणारी ठरेल. भूतपिशाच्च असण्याची कुप्रसिद्धी असलेल्या एका घरासंबंधी ती आहे. दोन दिवसांपूर्वीच प्रेमविवाह झालेले एक नवेकोरे दांपत्य थ्रिल म्हणून आडबाजूच्या खांडववनात मधुचंद्रासाठी जाते. हॉटेलमध्ये गेल्यावर हॉटेल मालक त्या दांपत्याला अगतिक मुद्रेने सांगतो, ''माफ करा. तुमचं पत्र मिळूनही आज रात्री हॉटेलमध्ये खोली देणे

जमणार नाही... एकही खोली रिकामी नाही. उद्या मात्र रूम नक्की देईन. मधुचंद्राची पहिली रात्र... तुम्हाला नाही म्हणणं फार अपराधी वाटतंय मला... आधी जेवून घ्या... काही व्यवस्था करता येते का ते तोपर्यंत मी बघतो.''

शेवटी तो मालक हॉटेलजवळच्या आपल्या भावाच्याच घरातील दोन खोल्यांच्या मांगरात या नवदांपत्याची व्यवस्था करतो. पण नंतर तरुणाला एकट्याला बाजूला घेऊन सांगतो, ''बट, आय मस्ट वॉर्न यू. ते घर चांगलं नाही. तिथं काहीतरी...''

रिकामं घर म्हणजे भुताटकीचा वावर वगैरे कल्पनांना या तरुणाजवळ स्थान नसते. तो आनंदाने त्या घरात जातो.. हॉटेलमालकाचा भाऊ मांगर उघडून देतो.

प्रशस्त पलंग, पांढरीशुभ्र बिछायत... पिण्यासाठी पाणी... सर्व व्यवस्था उत्तम.

पत्नी वैजयंती एका खुर्चीवर बसते. पण त्या बिछान्यावर झोपायला तयार नसते. दुसऱ्याच कुणीतरी घालून ठेवलेल्या शय्येवर अंग टाकणे तिला कठीण वाटत होते. तिच्या मनावर दडपण असते.... एकाएकी खिडकी उघडते. थंड वाऱ्याचा झोत आत येतो... त्याच्या अंगात द्वेषाची उबळ येते.

मिठीतल्या वैजूच्याभोवती तो करपाश आवळू लागतो... ती खंजीर उगारते... तो खंजीर तो तिच्या हातातून काढून घेतो. दिवाणखान्यात येतो. वर असलेल्या झुंबराकडे त्याचे लक्ष जाते. ''हे झुंबर आपण आलो तेव्हा नव्हते... हे त्याला आठवते... त्या झुंबराची दोरी तो हाती घेतो. वैजूला तेथून बाहेर पडायला सांगतो. ती दोरी सोडताच झुंबर खाली येते. काचा सर्वत्र पसरतात..'' ते स्वप्न असते... दोघांना एकच स्वप्न पडावे हे एक आश्चर्यच!

हॉटेलमालक विचारतो, ''कालची रात्र चांगली गेली ना?'' आणि त्या घरात सरदार घराणातल्या एका दांपत्याचा मृत्यू झाल्याची कहाणी तो सांगतो. ती दोघे या जगात नाहीत... पण आपल्या भावाला मात्र ती परत येतील असे वाटते. तो त्यांची वाट बघत घर सजवून लावून ठेवतो... लोकांना वाटतं की त्यांची पिशाच्चं तिथं वावरत असतील... तुम्हाला तसं काही दिसलं नाही ना?''

नवरा उत्तर देतो, ''नाही. तसं काहीच दिसलं नाही.''

या संग्रहातील ती दोन मुलं, चिखल, पुलावरचा माणूस वगैरे कथांमध्येही अशाच कल्पना वापरलेल्या आहेत.


उत्कंठावर्धक निवेदनशैलीमुळे आणि थरारक कथाकल्पनांमुळे या गूढकथा वाचकांना गुंतवून ठेवतात.

मतकरींच्या गूढकथांमधील एकूणच विविधता थक्क करते.

**किंमत : १५०रु. सभासदांना : १०५रु. पोस्टेज : २५रु.**



# पुस्तक परिचय



## माणसाच्या मनाचीच नाती खरी की सामाजिक नीतिमूल्ये?

## मानसी

**छाया महाजन**



**‘मा**नसी’ ही डॉ. छाया महाजन यांची नवी कादंबरी.

त्यांची ‘कॉलेज’ ही आधीची कादंबरी आजच्या ग्रामीण भागातल्या महाविद्यालयाच्या संवेदनशून्य व्यवस्थापनाचे विदारक दर्शन घडवते.

‘मानसी’मध्ये तरुणसुलभ प्रेमभावनेचे स्वरूप कितपत वैयक्तिक आणि कितपत सामाजिक असते याचा शोध घेण्याचा प्रयत्न आढळतो. एखाद्या तरुणीला एखाद्या स्मार्ट, श्रीमंत, यशस्वी विवाहित पुरुषाचे आकर्षण वाटते, ती त्याच्या सहवासात रमते, त्याच्यावर जीव टाकते, घरच्या लोकांचा रोष ओढवून घेते; परंतु जेव्हा तो पुरुष आपल्या पत्नीशी, मुलांशी असलेले आपले संबंध पूर्ववत जपत राहतो, आपल्या सामजिक प्रतिष्ठेला वा प्रतिमेला कुठल्याही प्रकारे धक्का लागू नये याबद्दल कटाक्ष बाळगतो, तेव्हा त्या प्रेमात पडलेल्या तरुणीच्या दृष्टीने अनेक समस्या उभ्या राहतात. एक तर तिचे कायद्याच्या दृष्टीने त्या पुरुषाशी असणारे संबंध हे गैर असतात; तिला सध्याच्या द्विभार्या प्रतिबंधक कायद्यामुळे पत्नीचे स्थान मिळत नाही. संबंध दीर्घकाळ चालले तरी ती त्याची रखेलीच ठरते. तिला त्या पुरुषाच्या संपत्तीत कसलाही कायदेशीर हक्क प्राप्त होत नाही. त्या पुरुषाने तिच्याशी असणारे संबंध तोडले तर तिला काहीही करता येत नाही. (मात्र अशा संबंधातून निर्माण होणाऱ्या संततीला आर्थिक मागणी करता येते असे काही न्यायालयीन निवाडे आहेत.)

‘मानसी’मध्ये ह्याच प्रकारची समस्या केंद्रस्थानी आहे.

मानसी ही आर्किटेक्चरचा अभ्यास करणारी तरुणी. सरळमार्गी, मध्यमवर्गीय, ब्राह्मण, नाकापुढं चालणारी, पापभीरू संस्कृतीत वाढलेली.. कॉलेजमधल्या फजल, शिरीन वगैरे मित्रमैत्रिणींमुळे पेहराव, नृत्याचे कार्यक्रम वगैरे मॉडर्न गोष्टींचा उडतउडत परिचय झालेली. पण घरच्या लोकांपासून ते लपवण्याकडेच तिचा कल जास्त... कारण तिच्यावरचे घरचे संस्कार तसे होते. तिचे वडील म्हणायचे, जीवनात मूल्ये महत्त्वाची. ती मध्यमवर्गीयांनी जपायची असतात. कारण श्रीमंतांना त्यांची गरज नसते आणि गरिबांना कष्ट करून पोट भरायचीच मारामार असते. त्यांना मूल्यांचा विचार करायला वेळच कुठे असतो?

म्हैसूरला प्राचीन वास्तुशिल्पांचा अभ्यास करण्यासाठी कॉलेजच्या स्टडीटूरमध्ये एका मंदिरात गेलेल्या मानसीची चप्पल तुटते, ती पायरीवरून पडते, पाय मुरगळतो तेव्हा त्या मंदिराच्या स्थानिक ट्रस्टीचा मित्र त्रिलोकसिंग तिला कारमधून हॉटेलमध्ये पोचवतो. त्याआधी डॉक्टरांकडे नेऊन एक्सरे करून घेतो... पुन्हा तिला भेटून तब्येतीची चौकशी करतो.

हा त्रिलोकसिंग चार मोठ्या इंडस्ट्रीजचा मालक असतो. दिल्लीला मुख्य ऑफिस. मुंबई, चेन्नई वगैरे ठिकाणी ऑफिसेस, गेस्ट हाऊस. परदेशी कोलॅबोरेशन.

मुंबईत आल्यावर मानसीच्या व त्याच्या गाठीभेटी होत राहतात. गेस्ट हाऊस, फाइव्ह स्टार हॉटेल्स. आउटिंग... जवळीक वाढत राहते.

घरी याची कल्पना येऊ नये याची दक्षता मानसी घेते.

एकदा मुंबईहून बंगलोर हायवेने जाताना कारला अपघात होतो. हेड ऑन कोल्युजन. ड्रायव्हर जागेवरच मृत. मानसीच्या पायाला, बरगडीला फ्रॅक्चर होते. जबड्याचे हाड मोडते. ती बेशुद्ध पडते. त्रिलोकसिंगच्याही हाताला फ्रॅक्चर होते. थोडेफार लागते. पण तो शुद्धीवर असतो. फोन वगैरे करून मुंबईच्या एका हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करतो. सिंगही ब्रीचकँडी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होऊन प्राथमिक उपचारानंतर घरी जातो... त्रिलोकसिंगची सेक्रेटरी स्टेला स्पिट हॉस्पिटलमध्ये मानसीची वास्तपुस्त करते तिला पुष्पगुच्छ देते...

मानसीला हॉस्पिटलमधून डिसचार्ज मिळतो. परंतु दीड-दोन महिने विश्रांतीची गरज असते. जबड्याला दुखापत झाल्याने बोलता येत नाही. सॉलिड फूड घेता येत नाही. तिच्या आई-बाबांना शॉक बसतो. मानसी इतकी पुढं जाईल यावर त्यांचा विश्वास बसत नाही. मुलीला नको एवढं स्वातंत्र्य देऊन ठेवलेलं.

...विश्रांतीसाठी मानसीला लोणवळ्याच्या बंगल्यावर ठेवण्यात येते. तो बंगला मानसीची बहीण वृंदा हिच्या नवऱ्याचा. विवेकचा. तो लष्करात अधिकारी. सध्या पोस्टिंग रोहतांगला. मानसीचा भाऊ समीर अमेरिकेत.

लोणावळ्याला येऊन राहणे मानसीच्या आईवडिलांना काही जमण्यासारखे नव्हते. तेव्हा वृंदा ती जबाबदारी स्वीकारते... बंगल्याची देखभाल करणारे लिंबाजी आणि राधाबाई हे जोडपे मदतीला असतेच.

हळूहळू वृंदा मानसीकडून त्रिलोकसिंग व मानसी यांच्या संबंधाची मजल कुठवर गेलीय हे काढून घेते. तिच्याशी त्याबद्दल वाद घालते.

हा बंगला आबासाहेबांच्या इस्टेटीला लागून. त्यांच्याकडून घेतलेल्या प्लॉटवर बांधलेला.

आबासाहेब जहागीरदार. त्यांची आजारी पत्नी... शिवाय त्यांच्या घरी कलाबाई ही नात्यातली विधवा तरुण निराधार स्त्री... चाळिशीतली... उंचसर, शेलाटी, पण उभार असलेली. गोरा रंग, मोठे डोळे, नऊवार नेसलेली, सरळ नाक, उंच कपाळ, कुंकू नसलेली... कलाबाईबद्दल जहागीरदारबाई वृंदाला सांगतात, ''आमची नातलग आहे. लांबून ह्यांची भाची लागते... तिला जवळचं कुणी नाही... आईवडील गेले. नवरा आधीच गेला होता. आता इथं आमच्याकडेच असते.''

नंतर वृंदाला कलाबाईची आणखी माहिती राधाबाई पुरवते. ''अहो, जहागीरदारीण बाईंच्या बरोबरीनं लुगडं नेसती. अंगावर दागिने... आबासाहेबांची बाइल म्हणतात लोकं... आली आणि ठाण देऊनच बसली इथं... आबासाहेबांचा मुलगा असतो परदेशात, मोठा पगार. तिथल्याच मडमेशी त्यानं लग्न केलंय. ती इकडं येत नाही. नवऱ्यालाबी येऊ देत नाही...''

... मानसीशी वृंदाचे सवालजबाव चालू राहतात...

मानसी म्हणते, ''मी लग्न करणार नाही. लग्न झालेल्या माणसाबरोबर

प्रेमसंबंध ठेवले... त्यात काय बिघडलं? जगात असे हजारो संबंध आहेत.. आपले मामे आजोबा बायकोच्या बहिणीबरोबर राहतात.. आपल्या शेजारचे रोंधे त्यांच्या चुलत आत्याबरोबर राहतात, तेही लग्नाची बायको सोडून. बायकोपासून दोन मुलं आहेत. मान्य केलं ना आपण? प्रत्येक समाजात असं आहे... मुंबईत कितीतरी मुलंमुली तशीच एकत्र राहतात. जग कुठं चाललंय? पण आपण मध्यमवर्गीय. आपल्याला हे कसं जमावं? आपण जुन्या जोखडातून बाहेर पडायचंच नाही असं ठरवलंय...''

त्यावर वृंदा तिला फैलावर घेऊन म्हणते, ''डोकं ठिकाणावर नाही तुझं. स्वत:च्या सोयीचं बोलते आहेस. प्रेमात पडलं की असंच असतं. स्वत:चं म्हणणं बळकट करायला तू रामायण-महाभारतातले दाखलेही देशील. बुद्धी गहाण पडली. दिल दिया गधीपे तो अप्सराभी कुछ नही - असा प्रकार झालाय तुझा!''

मानसीला त्रिलोकसिंग हा विवाहित आहे, त्याला पाच वर्षांची मुलगी आहे हेही ठाऊक आहे. तरीही ती त्याच्यावर फिदा होते. त्याच्या सहवासाची ओढ तिला वाटते. त्याची व तिची एकत्र राहण्याची ही तीव्रता - शरीराची ओढ... ती तीव्रता खेचून नेताना विवेकावर पडदा टाकते... विवेकाला अंधारात ढकलते... आपण धीट आहोत... तो लग्न करील न करील, त्याच्याबरोबर दुसरी बायको म्हणून राहायला काय हरकत आहे? दुसऱ्या बायकोला कायद्यानुसार काही हक्क नाहीत. त्याचा पैसा, त्याची संपत्ती, वैभव, मालमत्ता हे आपल्याला नको. फक्त तोच हवाय. मग त्याच्याबरोबर का राहू नये? तो इतका श्रीमंत आहे की चांगलंच ठेवेल आपल्याला. कदाचित् आपल्या बायकोकडे परतही जाणार नाही.. त्याचं ते प्रेम... जवळ घेणं... मधाळ बोलणं... मलाच का निवडलं त्यानं?... का माझ्याच आयुष्याशी खेळतो तो?'' असे नानाविध विचार तिच्या मनात गर्दी करतात. धुमाकूळ घालतात.

आपल्या या वैयक्तिक प्रेमाचे सामाजिक संदर्भही तिला जाणवतात. त्याबद्दलही वृंदाशी तिचा वाद होतो. ती म्हणते, ''माणसाच्या मनाचीच नाती खरी हे गृहीतक होतं माझं. प्रेमाबरोबर मीही एक नातं विणायला घेतलं. सामाजिक नात्याला झुगारलं.. तरीही ते नातं सामाजिकच होतं... मग लक्षात आलं की माणसाच्या मनाच्या नात्याला तर स्थानच नाही आणि किंमतही नाही.. सत्य हेच की सामाजिक नात्यांचा शिक्का खोलवर रुतून बसलाय आपल्या मानसिकतेत... एखाद्या गुणसूत्रासारखाच रुजलाय आपल्यात... मनातलं नातं उमलणं, कामेजणं हे दिवसरात्रीच्या फेऱ्यासारखं आहे. सतत बदलणारं... रात्रीच्या अंधारात फेकलो गेलो की डोळे खऱ्या अर्थानं पहायला लागतात. यात जास्त दुखावते, रक्ताळते, पिळली जाते ती फक्त बाईच... युगानुयुगं... कदाचित् अंधारात ती तेच जिणं जगतेय. पण दर वेळी नव्या सोनेरी पहाटेच्या प्रतीक्षेत... नित्यनूतन चैतन्याच्या शोधात.'' (१५२)

स्त्री-पुरुष प्रेमाचा, आकर्षणाचा, सहवासाचा, मीलनाचा हा एक चिरंतन शोध चालू असेल. दोघांपुरता...

परंतु त्याचा सामाजिक संदर्भ हा देखील महत्त्वपूर्ण असतो, आणि त्या वैयक्तिक नात्याला वैवाहिक चौकट मिळाली म्हणजे त्याला भौगोलिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, रीतिरिवाज- पारंपरिक अशी परिमाणे लाभतात. खूप ताण निर्माण करणारी असतात.

विवाहसंस्थेने या स्त्री-पुरुष नात्याला काही मर्यादा पडतात. प्रेम आणि विवाह या दोहोंचेही नाते अनेक पातळ्यांवर घोटाळत असते. तेही खूप ताणतणावाचे ठरते.

''प्रेम ही कायमस्वरूपी बांधीलकी नाही.'' अमेरिकेतून आलेला आबासाहेबांचा मुलगा पराग मानसीला सांगतो, ''आपण लग्न केलं की सवयीनं एकत्र राहतो. प्रेमही कदाचित् नंतर तसंच करतो. खरं काय असतं? खरं म्हणजे आपल्याला नवराबायकोंना - एकमेकांबरोबर राहून स्वभाव कळतात. मग ते निगेटिव्ह म्हणून सोडून देतात किंवा निग्लेक्ट करतात. पण दुर्लक्ष करणं अशक्य होऊ शकते. मग खरं प्रेम आहे का या मूळ प्रश्नाकडे येतात. असे टप्पे सगळ्यांच्याच आयुष्यात येतात की नाही- देव जाणे! पण बहुसंख्य माणसं वर्षानुवर्षं संसाराचा गाडा ओढताना दिसतात खरी!'' (१४९)

मानसीला त्रिलोकसिंगवरील आपले प्रेम खरे की खोटे असा प्रश्न पडतो. ती अंतर्मुख होते. ''आपले प्रेम एकतर्फीच होते का? ते नातं पोकळ होतं का? ठिसूळ होतं का? आपण त्याच्यावर जीवापाड प्रेम केलं. निष्ठा ठेवली. त्यासाठी मित्रमैत्रिणींना दूर ठेवलं. आई-वडीलांशी प्रतारणा केली. खोटं बोलत राहिलो. स्वत:ला आपण वेगळं समजत राहिलो. सामान्य मुली लग्न करून संसार थाटतात. आपण ते झुगारून दिलं. आपण लग्नाचा विचार केला नाही. प्रेमाचाच विचार केला. आपल्या नात्याला सामाजिक नाव देणं आवश्यक मानलं नाही. आपण सामान्य नाही, स्वत:ला वेगळं मानत राहिलो... म्हणूनच विवाहित माणसाच्या प्रेमात स्वत:ला झोकून दिलं... आपण कॉर्पोरेट कल्चरला भुललो का? कशाचा कैफ होता स्वत:ला?'' (७४-७५)

कथाकादंबरीतल्या नायिका जातीपातीला, गरीब-श्रीमंतीला झुगारतात, लोकापवादाला धुडकावतात. सामाजिक बंधनाचा काच फेकून देतात... बंडखोरी दाखवतात... तसेच आपण वागलो आहोत का असा प्रश्न मानसी स्वत:ला विचारते. ''महत्त्वाकांक्षी राहून स्वप्नांच्या गावाला गवसणी घालणे हे योग्य झाले का?''

...त्रिलोकसिंगची आणि मानसीची लोणावळ्याच्या पंचतारांकित हॉटेलात गाठ पडते... तो तिची समजूत काढतो... तिला जवळ घेतो... अजूनही मानसीला त्या स्पर्शाने मोहरून येते.

त्याची पत्नी तेथील ब्युटीपार्लरमध्ये आलेली असताना मानसीची आणि तिची

भेट होते. त्रिलोकसिंग आणि त्याची पत्नी यांच्यातील जवळीक तिला जाणवते.

आबासाहेबांचे निधन होते. त्यांचा मुलगा पराग अमेरिकेहून येतो. मानसी-वृंदा यांच्याशी परिचय होतो.

...पराग मानसीला आपले वडील आबासाहेब आणि कलावती यांच्यातील नात्याबद्दल सांगतो. ''ही डिड एव्हरीथिंग फॉर हर... मी जगभर हिंडलो आणि मला आबासाहेब कळायला लागले. आई आणि कदाचित् कलामावशीही! इट इज सो नॅचरल. हा निसर्ग समजायला हवा.. आबासाहेब वेगळे होते. त्यांचे आईवर प्रेम होते. तिला त्यांना दुखवायचं नव्हतं. मावशी घरात राहणार हा निर्णय झाल्यावर त्यांनी सगळ्या जगाला खंबीरपणे तोंड दिलं. आय ॲडमायर हिज करेज...''

नंतर पराग स्वत:चा नुकताच डायव्होर्स झालाय हेही मानसीला सांगतो. आबांना मृत्युशय्येवर असताना ते सांगायचे तो टाळतो. हा सगळा भूतकाळ आहे...

मानसीला ते अनंतकाळचे ओझे झुगारून द्यावेसे वाटते. मुक्त व्हावेसे वाटते.

पराग तिला त्यामध्ये मदत करतो. ''आय नो यू हॅड ॲन अफेअर वुइथ ए फेलो. नसेल त्याची इच्छा तर चटकन विसर. आपल्यापुढं नेहमी दोन पर्याय असतात. दोन दिशांना जाणारे, एक गेला तर दुसरा असतोच. तसा तो असावाच लागतो आणि निवडावाही!''

छाया महाजन यांनी मानसीच्या रूपाने समकालीन शहरी तरुणींच्या समोरचे एक द्वंद्व वेगवेगळ्या पैलूतून स्पष्ट करून दाखवले आहे. स्वातंत्र्य आहे. त्याचा उपभोग घेणेही सुलभ आहे, परंतु वैयक्तिक लहरीचा वा आकर्षणाचा त्यातील भाग म्हणजे सर्वस्व नव्हे. त्याला सामाजिक, नैतिक परिमाणही आहे. काळाचेही परिमाण आहे. त्यामुळे पारंपरिक दृष्टिकोन धुडकावून देऊनही सर्व पत्ते मनासारखे पडतील ही अपेक्षा बाळगणे वास्तव नाही. परंतु आबासाहेब-कलावती यांच्याप्रमाणे हे नाते दोघांच्या निष्ठेने निभावून नेता येणे हेही खरे आहे. तरीही जनसामान्यांना ते आकलन- स्वीकाराच्या पलीकडचे ठरू शकते.

लोणावळ्यातील वातावरणात मानसी आपल्या शारीरिक स्वास्थ्याच्या दिशेने प्रगती करीत असतानाच मानसिकदृष्ट्याही निकोप, निरामय होत जाते. अधिक प्रगल्भ विचार करू लागते. त्या दृष्टीने उपयुक्त पात्रे आणि प्रसंग यांची योजना कौशल्याने केली गेली आहे.

वैयक्तिक आणि सामाजिक या दोन्ही परिमाणातून कोणत्याही नात्याला खरे बळ लाभत असते... आणि ते बळ जगण्याला अर्थपूर्ण बनवत असते, हे 'मानसी'वरून मनावर ठसू शकेल.

**किंमत : १२०रु. सभासदांना : ८४ रु. पोस्टेज : २५रु.**

# मुलाखत



**जुबान बुक्स**
**२१ भाषांमध्ये अनुवादित झालेल्या**
**भारतीय पुस्तकाची नवलाई**

***उर्वशी बुटालिया -***

*ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस या प्रकाशन संस्थेत १९७२ मध्ये व्यावसायिक अनुभव घेण्यास अर्धवेळ उमेदवारीचा आरंभ. नंतर पुस्तक उत्पादन विभागात सहव्यवस्थापक म्हणून काही काळ काम. १९७८ मध्ये पुस्तक प्रकाशन या विषयावर कॉलेज ऑफ व्होकेशनल स्टडीजमध्ये अध्यापन. इंग्लंडमधील झेड बुक्स या प्रकाशन संस्थेत दोन वर्षे पुस्तकांची प्रसिद्धी, प्रसार आणि वितरण याबाबत विशेष प्रशिक्षण घेतले. स्त्रीमुक्तीच्या तेथील वातावरणाचा त्यांच्यावर प्रभाव पडला आणि भारतात परत येऊन स्त्रियांनी स्त्रियांसाठी 'काली' ही प्रकाशन संस्था त्यांनी सुरू केली... त्यानंतर स्वत:ही लेखनाला आरंभ केला. 'दि अदर साइड ऑफ सायलेन्स : व्हायसेस फ्रॉम द पार्टिशन ऑफ इंडिया' हे पुस्तक व्हायकिंग पेंग्विनने प्रकाशित केले. त्याचे दहा भारतीय व परदेशी भाषांमध्ये अनुवाद प्रसिद्ध झाले.*

*इ. स. २००३ मध्ये जुबान बुक्स ही स्वत:ची प्रकाशन संस्था सुरू केली. ए लाइफ लेस आर्डिनरी हे बेबी हलदर या कामवालीचे आत्मकथन प्रसिद्ध केले. त्याला तुफान लोकप्रियता लाभली. २१ भाषांत त्याचे अनुवाद झाले.*

## उर्वशी बुटालिया यांची मुलाखत



उर्वशी बुटालिया

**प्रश्न - प्रकाशनक्षेत्रात आपला प्रवेश कसा झाला?**

उत्तर - १९७२ मध्ये मी पदव्युत्तर अभ्यास करीत होते. तेव्हा एका मित्राने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या व्यवस्थापकांशी माझी भेट घडवून आणली. फावल्या वेळात काहीतरी काम करायची माझी इच्छा होती. संहिता संपादन, मुद्रितशोधन वगैरे कामे मी करू लागले. पदवी मिळाल्यानंतर ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने मला पुस्तक उत्पादन विभागात काम करायला सांगितले. दोन वर्षांनी मला संपादकीय विभागात नेमण्यात आले. 'ऑक्सफर्ड ॲटलास'च्या पंजाबी आवृत्तीच्या चार लाख प्रतींची मागणी पंजाब राज्य सरकारने नोंदवली होती. त्यामुळे मूळ इंग्रजी ॲटलासचे पंजाबीत रूपांतर करायचे होते. त्या निमित्ताने पंजाब सरकारच्या अधिकाऱ्यांशी आणि सर्व्हे ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांशी सतत संपर्क साधण्याची संधी मिळाली. त्यांच्या कामकाजाच्या पद्धतीची त्यामुळे ओळख झाली. १९७८ मध्ये मी कॉलेज ऑफ व्होकेशनल स्टडीज्‌मध्ये पुस्तक प्रकाशन या विषयाची लेक्चरर म्हणून काम स्वीकारले. तशातच मी दोन वर्षांसाठी मी इंग्लंडमध्ये गेले. तेथे झेड बुक्स या प्रकाशन संस्थेत प्रसिद्धी आणि मार्केटिंगचे काम मी पाहू लागले. झेड बुक्सला स्त्री-अभ्यासविषयक पुस्तकांची एक मालिका तयार करायची होती. त्याची जबाबदारी माझ्यावर होती. त्या दृष्टीने स्त्री प्रश्नावर वेगवेगळ्या अभ्यासकांशी व संस्थांशी संवाद साधता आला. दोन वर्षांनी भारतात परतल्यावर १९८४ साली मी 'काली फॉर वुमेन' ही प्रकाशन संस्था सुरू केली. 'झेड बुक्स'मध्ये स्त्री मुक्तीच्या संदर्भात स्त्री-प्रश्नांचा जो अभ्यास झाला, त्यामुळे भारतात स्त्रीमुक्तीसाठी चळवळ उभारण्याची गरज मला भासत होती. चळवळीसाठी साहित्याची गरज असते. स्त्रीविषयक भूमिका मांडण्याची गरज होती. विकास प्रकाशनशी संबंधित असणाऱ्या रितू मेनन यांनीही माझ्याबरोबर या प्रकाशनाच्या उपक्रमात सहभागी होण्याचे ठरवले. कॉलेजमध्ये असल्यापासूनच स्त्रीविषयक प्रश्नांबद्दल मला औत्सुक्य होते. हुंडाविरोधी आणि बलात्कारविरोधी निदर्शनांमध्ये मी सहभागी झाले होते.

स्त्रीमुक्तीचा विचार जेव्हा मांडण्यात येऊ लागला तेव्हा मला साहजिकच त्याचे महत्त्व जाणवले. त्यावेळी कोणीही प्रकाशक स्त्री प्रश्नावरची पुस्तके काढण्याबाबत सक्रिय नव्हता. स्त्रियांनी स्त्रियांकरिता लिहिलेली पुस्तके काढण्यासाठी आणि स्त्रीविषयक प्रश्नांबाबत सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी आपणच प्रकाशनसंस्था काढायला हवी - या कल्पनेने मला झपाटून टाकले.

**प्रश्न - स्त्रियांनी लिहिलेली पुस्तके प्रकाशित करायची ही तुमची कल्पना... स्त्रीप्रश्नावर स्त्रियांच्या भूमिकेतून लेखन करणाऱ्या स्त्रिया शोधण्यात अडचणी आल्या का?**

उत्तर - मुळीच नाही. आपल्याकडे अनेक स्त्रिया लेखन करणाऱ्या आहेत. परंतु त्यांचे लेखन प्रकाशित करायला प्रकाशक उत्सुक नव्हते; स्त्रीलेखनाकडे गंभीरपणे पाहण्याची त्यावेळच्या प्रकाशकांची दृष्टी नव्हती. त्यामुळे स्त्रियांचे लेखन हे बहुतांशी अप्रकाशित राही. 'काली' सुरू केल्यावर 'तुम्ही केवळ स्त्रियांचेच आणि स्त्रीविषयकच लेखन प्रकाशित करायचा आग्रह का धरता?, लेखन करणाऱ्या स्त्रिया आहेतच कोठे?, स्त्रिया पुस्तके वाचतात तरी का?, स्त्रियांची पुस्तके काढली तरी ती विकली जाणार का?, तुमचा त्यामुळे प्रकाशन व्यवसायात जम तरी बसणार आहे का?' अशा प्रकारचे प्रश्न आम्हाला पुन:पुन्हा विचारले जात. सध्या तर बहुतेक सर्व लहानमोठ्या प्रकाशन संस्थांचा स्त्रीविषयक आणि स्त्रीलिखित पुस्तके प्रकाशित करण्यावर कटाक्ष दिसतो.. हा गेल्या पंधरावीस वर्षांत पडलेला फरक नजरेआड करता येणार नाही.

**प्रश्न - रितू मेनन यांनी तुमच्याबरोबर 'काली'च्या स्थापनेत पुढाकार घेतला. पुढे त्या 'काली'पासून दूर झाल्या. त्याचे कारण काय?**

उत्तर - १९८४ साली 'काली' सुरू करताना रितू माझ्याबरोबर होती. तिचा 'विकास' मधील अनुभव, माझा ऑक्सफर्ड व झेडमधील अनुभव यामुळे खूप नवनव्या कल्पना आम्ही उत्साहाने राबवल्या. १९ वर्षे आम्ही बरोबर काम केले. त्यामुळे 'काली फॉर वुमेन' या संस्थेला एक विशिष्ट स्थान प्राप्त झाले. नंतर काही मतभेदांमुळे आणि वेगवेगळ्या अग्रक्रमामुळे आम्ही वेगळे व्हायचे ठरवले. 'काली'मधून रितू बाहेर पडली असली तरी आमची मैत्री कायम आहे.

**प्रश्न - 'दि अदर साइड ऑफ सायलेन्स' हे तुमचे पुस्तक खूप गाजले. स्वतंत्रपणे तुमचे हे स्वतंत्र पहिलेच पुस्तक आहे ना?**

उत्तर - होय. हे माझे पहिलेच पूर्ण लांबीचे पुस्तक. त्या आधी काही पुस्तके मी संयुक्तपणे लिहिली होती.

**प्रश्न - 'दि अदर साइड ऑफ सायलेन्स' मध्ये भारताच्या फाळणीनंतरच्या जनजीवनातील स्थित्यंतराबद्दल वेगवेगळ्या व्यक्तींच्या भावभावना तुम्ही**

**व्यक्त केल्या आहेत. या पुस्तकाचे सर्वत्र उत्तम स्वागत झाले. सिलेब्रिटींमध्ये तुमची गणना होऊ लागली. त्याबद्दल तुम्हाला काय वाटते?**

उत्तर - अर्थातच मला धन्यता वाटते. आनंद वाटतो. कृतज्ञताही वाटते. वायकिंग पेंग्विनने हे पुस्तक प्रकाशित केले. त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. दहा भाषांमध्ये त्याचे अनुवाद झाले. या पुस्तकाला इतके यश लाभेल असे मला वाटले नव्हते; त्यामुळे त्याला मिळालेला हा प्रतिसाद खूपच आनंददायक आहे.

**प्रश्न - प्रकाशक आणि लेखक यापैकी कुठली भूमिका तुम्हाला जास्त आकर्षक वाटते?**

उत्तर - प्रकाशक म्हणून मी जास्त काम केले आहे; परंतु लेखनावरही माझे प्रेम आहे. प्रकाशनक्षेत्रामुळे दररोज नवनव्या व्यक्तींना भेटण्याची, नवनव्या कल्पना जाणून घेण्याची संधी मिळते.

**प्रश्न - पेंग्विनद्वारेही तुम्ही तुमची काही पुस्तके वितरित करता. त्याबाबत काय व्यवस्था आहे?**

उत्तर - जुबानतर्फे आम्ही पुस्तकांची निर्मिती करतो. पुस्तकाचे शीर्षक, त्याचा आशय, त्याची मांडणी, त्याचा वाचकवर्ग, त्याचा आवाका हे सर्व पेंग्विनशी चर्चा करून ठरवतो आणि त्याप्रमाणे पुस्तके काढतो. पेंग्विन त्या पुस्तकांचे व्यावसायिक पातळीवर मार्केटिंग करते, प्रसिद्धी करते. आम्ही थेट ग्राहकाशी व्यवहार करतो. पेंग्विनच्या व्यापक वितरण यंत्रणेमुळे पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघतात. त्यामुळे लेखकांनाही समाधान वाटते. पेंग्विन आणि जुबान यांच्यातील ही वितरण व्यवस्था दोघांनाही लाभदायक ठरली आहे.

**प्रश्न - पेंग्विनतर्फे वितरित न होणारी तुमची जी पुस्तके आहेत, त्यांना पूर्ण न्याय मिळतो का?**

उत्तर - पेंग्विनतर्फे आमची मोजकीच पुस्तके वितरित होतात हे खरे आहे. उर्वरित पुस्तके फाउंडेशन बुक्सच्या माध्यमातून व्यावसायिक पातळीवर वितरित होतात. त्यांचीही वितरण यंत्रणा व्यापक आहे. त्यांचे प्रतिनिधी सर्वत्र फिरत असतात. त्यामुळे इतर पुस्तकांनाही पूर्ण न्याय मिळतो असे आम्हाला वाटते. दरमहा पहिल्या आठवड्यात फाउंडेशन बुक्सकडून नियमितपणे आम्हाला धनादेश मिळतो.

**प्रश्न - जुबान पेंग्विनच्या यादीत आपला समावेश व्हावा म्हणून लेखक गळ घालतात का?**

उत्तर - जुबान आणि पेंग्विन या दोहोंच्या लेखकांकडून आपली पुस्तके जुबान-पेंग्विनच्या यादीत यावीत असा दबाव येत असतो. परंतु आम्ही गुणवत्तेवर भर देतो आणि नवे तरुण लेखकही या यादीत असावेत या दृष्टीने प्रयत्नशील असतो.

**प्रश्न - ए लाइफ लेस ऑर्डिनरी हे बेबी हालदार या लेखिकेचे पुस्तक तुम्ही काढले आणि ते आंतरराष्ट्रीय पातळीवरही लोकांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. या लेखिकेला तुम्ही कसे गाठले?**

उत्तर - आउटलुकच्या एका अंकात बेबी हालदार हिच्या हिंदी पुस्तकावर शैला रेड्डी यांचे परीक्षण मला वाचायला मिळाले. बीबीसीच्या वेब पेजवर बेबी हालदारची एक छोटीशी मुलाखतही माझी सहकारी जया हिला सापडली. या पुस्तकाचा आशय मला लक्षवेधक वाटला. मी लेखिकेचा शोध घेतला. ती प्रबोधकुमार श्रीवास्तव या प्रेमचंदांच्या नातवाकडे काम करते असे कळले... मी बेबीपर्यंत पोचले. ती प्रबोधकुमारांच्या घरी मोलकरीण म्हणून काम करीत होती. मी बेबीशी आणि प्रबोधकुमारांशी चर्चा केली आणि जुबानतर्फे त्या पुस्तकाचे भाषांतर प्रसिद्ध करायचे ठरवले. अनुवादासाठी ते पुस्तक कोणाकडे द्यायचा हा प्रश्न पडला. शेवटी मीच ते काम करायचे ठरवले... हे पुस्तक २१ भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. फ्रेंच, कोरियन, डच, पोर्च्युगीज, नॉर्वेजियन, इटालियन... हिंदी, बंगाली, मराठी, उर्दू, मल्याळम.... हार्पर कॉलिन्सने अमेरिकन आवृत्ती काढली तर पेंग्विन ऑस्ट्रेलियाने ते ऑस्ट्रेलियात प्रसिद्ध केले.

**प्रश्न - या पुस्तकाच्या अनुवादाचे आणि मार्केटिंगचे हक्क आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये तुम्ही यशस्वीपणे हाताळले - याचे अप्रूप वाटते. ही किमया कशी साधली?**

उत्तर - अनेक वर्षे प्रकाशन व्यवसायात गेली आहेत. आपल्या प्रकाशनाची पुस्तके, त्यांचा वाचकवर्ग, त्यांचे वितरण... याबद्दल बरीच तयारी झालेली असते. वेगवेगळ्या लोकांच्या ओळखीपाळखी झालेल्या असतात... त्यामुळे इतर भाषांमध्ये व देशांमध्ये पुस्तकाच्या अनुवादाचे व प्रकाशनाचे सबसिडियरी हक्क विकणे अवघड गेले नाही.


**प्रश्न - तरुण, नवोदित प्रकाशकांना आपण काय संदेश द्याल?**

उत्तर - प्रकाशन म्हणजे एक गंमत आहे. प्रकाशन हा एक उत्साहवर्धक व्यवसाय आहे. त्यामुळे एकदम खूप श्रीमंत होता येते असे नाही; परंतु त्यातून खूप आनंद मिळू शकतो. तरुणांनी या व्यवसायात मोठ्या संख्येने यायला हवे. विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना भेटण्याची, नवनव्या कल्पना जाणून घेण्याची या व्यवसायात जशी संधी मिळते तशी ती अन्य व्यवसायात क्वचितच मिळते.

(पब्लिशिंग टुडे, मे २००७ वरून)

❐

## चौथी आवृत्ती



# *मी भरून पावले आहे*

**मेहरुन्निसा दलवाई**

**किंमत १६०रु.**
**पोस्टेज २५रु.**

“एकोणीस वर्षें माझा दलवाईंच्याबरोबर
सहवास झाला.
त्या काळात मी त्यांना समजू शकले नाही.
मला तेवढा वेळच नव्हता.
माझा संसार, माझी मुलं, आणि माझी नोकरी.
मी काय काय सांभाळणार हो?...
कुठल्याही प्रकारचा त्रास दलवाईंना
आपल्याकडून होता कामा नये,
हे लक्षात ठेवून मी चालण्याचा प्रयत्न
करीत होते...
तीन मे एकोणीसशे सत्त्याहत्तर रोजी
दलवाईंचा अंत झाला.
शेवटी शेवटी ते मला दोन-तीनदा म्हणाले,
‘मेहरू, आज मी जो काही आहे तो
तुझ्यामुळेच आहे.’
याच्यातच मी सगळं भरून पावले आहे.”




# कनिष्ठ चाकरी

**प्रमोदिनी वडके-कवळे**

संध्याकाळी ऑफिसमधून येताना अण्णा दोन खमंग गोष्टी बरोबर घेऊन यायचे. गरम फुटाण्याचा त्रिकोणी पुडा आणि दिवसभरात ऑफिसमधे घडलेल्या गमतीजमतींचा खजिना. .

अण्णा घरी यायचे तेव्हा संध्याकाळ झालेली असायची. शुभं करोति संपवून आम्ही झोपाळ्यावर उच्चस्वरात पाढे घोकत असायचो. ओटीवर फेऱ्या मारत आजोबांचं शिवमहिम्न चालू असायचं. आईने देवापुढे दिवाउदबत्ती लावून तुळशीला पाणी घातलेलं असायचं. अण्णांना आल्याबरोबर चहा लागतो म्हणून चुलीवर एकीकडे दूध तापत असायचं आणि दुसरीकडे भात शिजत असायचा... उदबत्तीचा, पाण्यामातीचा, रटरटणाऱ्या आंबेमोहोराचा आणि तापत्या दुधाचा संमिश्र दरवळ घरभर पसरलेला असायचा. अशा तृप्त कुटंबवत्सल वेळी आपल्या ठराविक पाटावर बसून चहा घेताघेता अण्णांचं कथाकथन सुरू व्हायचं.

खरं म्हणजे रोजच काही सुरस आणि चमत्कारिक घडावं अशी अण्णांची नोकरी मुळीच नव्हती. गावढ्या गावातल्या म्युनिसिपालिटीतल्या कारकूनाचा हुद्दा! त्यात रोज घडून घडून असं काय घडणार? पण त्यांची सांगण्याची हातोटी विलक्षण होती. सहकाऱ्यांचे स्वभाव, वरिष्ठांचा लहरीपणा, कधीमधी एखाद्या राजकीय व्यक्तीची पायधूळ, त्यानिमित्ताने ऑफिसमधे सळसळणाऱ्या उत्साहाच्या लाटा, त्या बड्या व्यक्तीबरोबर मिळणारा चहापानाचा सन्मान, त्यानिमित्ताने वेफर्स किंवा क्रीम बिस्कीटं अशा दुर्मिळ पदार्थांचं होणारं दर्शन... असल्या साध्या गोष्टीसुद्धा अण्णांच्या रसाळ वाणीतून येताना रोमांचकारी होऊन जायच्या. आम्ही भावंड मोठ्या

उत्सुकतेने त्या ऐकत रहायचो. आईही हातातलं काम सांभाळता सांभाळता कौतुकाने एकीकडे अण्णांचं बोलणं ऐकत रहायची.

आपलं जन्मगाव सोडून असं परक्या गावात अण्णांचं नोकरी करणं खरं म्हणजे आजोबांना फारसं पसंत नव्हतं. पण शिवमहिम्न म्हणताम्हणता तेही मध्येच तोंड उघडं टाकून अण्णांच्या गप्पा ऐकायचे.

अण्णांच्या अशा सांगण्यामुळे त्यांचं ऑफिस म्हणजे एखादं मस्त गमतीजमतीचं ठिकाण असावं असं आम्हाला वाटायला लागलं होतं.

आमच्या दिनक्रमातला तो एक अतिशय रसाळ असा कालखंड होता. त्याचा ठसा माझ्या मनावर किती खोल उमटून राहिला होता ते मला एकदा अचानकच जाणवलं.

का कोण जाणे पण आमच्या आजोबांना सगळ्या नातवंडांपेक्षा माझं जरा जास्त कौतुक होतं. माझ्या बुद्धी(!) सामर्थ्यावर त्यांचा कमालीचा विश्वास होता. एकदा त्यांनी माठ्या कौतुकाने आणि अपेक्षेनेही मला विचारले, ''माठेपणी तू कोण होणार?'

क्षणाचाही विलंब न लावता मी ऐटबाज स्वरात उत्तर दिलं ''मी अण्णांच्या ऑफिसात नोकरी करणार.''

अपेक्षाभंगाने आणि त्याहूनही जास्त सात्त्विक संतापाने आजोबांनी माझ्या डोक्यात जोरदार टप्पल मारली. ''ही कसली दरिद्री लक्षणं? नोकरीबिकरी काही करायची नाही. नोकरी म्हणजे गुलामी. आपल्या पूर्वजांनी सांगून ठेवलंय की श्रेष्ठ शेती, मध्यम व्यवसाय आणि कनिष्ठ चाकरी. .''

माझ्या वयाला आणि स्वप्नाळू अकलेला तेव्हा आजोबांचा राग बिलकूल झेपला नाही.

मॅट्रिकला मला चांगले मार्क्स मिळाले. पण रोह्यात पुढच्या शिक्षणाची सोय नव्हती आणि मला होस्टेलला ठेवून पुढे शिकवणं अण्णांच्या कारकूनी खिशाला परवडणारं नव्हतं.

पण पुण्याच्या विद्यार्थी सहाय्यक समितीत कमी खर्चात रहाण्याजेवण्याची व्यवस्था होते असं कळलं आणि मी शिक्षणासाठी पुण्यात यायचं ठरवलं. पुण्यासारख्या शहरात अर्धवेळ नोकरी करून मला अण्णांवरचा भार हलका करता आला असता.

पुण्यातली माझी पहिली नोकरी होती मॉडेल कॉलनीतल्या जगताप लायब्ररीतली. वेळ संध्याकाळी पाच ते आठ. आणि पगार आख्खे चाळीस रुपये.

मी माझ्या नशिबावर कमालीची खूष झाले. कारण ही लायब्ररी आमच्या होस्टेलच्या अगदी जवळ होती. त्यामुळे येण्याजाण्याचाही खर्च नव्हता.

काम खूप असायचं. मला कसलाच अनुभव नव्हता. अगदी त्या नोकरीत रोज साडीच नेसावी लागायची. त्याचासुद्धा अनुभव नव्हता. दोनचार वाचक एकदम येऊन पुस्तकांची नावं सांगायला लागले की साडी सावरत ती पुस्तकं शोधून देताना माझी अगदी तारांबळ उडायची. पण महिन्याच्या पाच तारखेला पगार घेताना मात्र या सगळ्याचा विसर पडून अगदी कृतकृत्य वाटायचं. त्या दिवशी होस्टेलवर परतताना पावलांचं बळ वाढलेलं असायचं.

एक टर्म पुरी झाली. परीक्षा संपून होस्टेल जवळजवळ रिकामं झालं.

दिवाळीची सुट्टी लागली. पण लायब्ररीतल्या त्या तीन तासांच्या नोकरीमुळे मला घरी जाता येईना. उरलेले दहाबारा तास मी बापुडवाण्या चेहऱ्याने घरची आठवण काढत रिकामीच बसून रहायची. अजून सुट्टी न लागलेल्या दोनचारजणीच फक्त होस्टेलवर होत्या.

एक दिवस अभिनव कॉलेजमधल्या कुमुद दळवीने मला विचारले, ''दुपारी रिकामीच असतेस ना? मग माझ्याबरोबर एका बाटिकपेंटिंगच्या क्लासमधे येशील? ट्रेसिंगचं काम असतं. एका ट्रेसिंगचे बारा आणे.''

ड्रॉईंगच्या परीक्षेत ग्रेस मार्क्स मिळवून पास होण्याइतकंच माझं चित्रकलेशी सख्य होतं. बाटिक कशाशी खातात तेही ठाऊक नव्हतं. तरी मी दडपून हो म्हणून टाकलं.

त्या सुट्टीच्या शेवटी मी आयुष्यात पहिल्यांदा बँकेत गेले माझं 'स्वत:चं' बचत खातं उघडायला. पैसे भरण्याच्या फॉर्मवर मी कुबेराच्या ऐटीत आकडा टाकला. 'रुपये सत्तर फक्त.'

नंतर काही महिन्यानी मी लायब्ररीतली नोकरी सोडून पूर्णवेळ बाटिकक्लासमधे जायला लागले. आता मी हिशोबापासून प्रदर्शनाचा व्याप संभाळण्यापर्यत तिथली सगळी कामं करू शकत होते. त्या क्लासच्या संचालिका प्रभा ठकार बाटिकसारख्या कलेत नवनवे प्रयोग करायच्या. बाटिकसारखी वेगळी कला, कॅम्पमधल्या उच्चभ्रू परिसरात भरणारी त्याची प्रदर्शनं. तिथे येणारी परदेशी गिऱ्हाइकं आणि आम्हाला बाटिक येतंय म्हणून त्यांच्या डोळ्यात उमटणारे कौतुकाचे भाव. . . एक वेगळंच जग होतं ते!

या रंगीबेरंगी नोकरीलाही मातीचे पाय होतेच. तिथल्या सगळ्याच मुली माझ्यासारख्या 'झुंजार' होत्या. आईविना भावंडांना मायेने सांभाळणारी पुष्पा, दारूबाज वडिलांच्या संसाराला ठिगळ जोडू पहाणरी उषा, भावाकडे रहाताना त्याला भार नको म्हणून नोकरी करणारी आशा, माझ्यासारखीच स्वकमाईवर शिक्षणाची स्वप्नं बघणारी रेश्मा... एकाच नौकेत प्रवास करणाऱ्या आमच्या मैत्रीच्या गाठी घट्ट जमल्या.

मैत्री ही तर कुठच्याही नोकरीतली 'वरकमाई' असते त्याबद्दल मी एकटी काय आणि किती सांगणार?

एकत्र डबे खाण्यातला आनंद आता मानसशास्त्रज्ञांनीही कबूल केलाय.

बाटिकक्लासमधल्या या नोकरीच्या जिवावरच मी पदवीपर्यंतचं शिक्षण निभावलं. दगदग होत होती. तारुण्यसुलभ मनोरंजनाला वेळ मिळत नव्हता. कॉलेजमधल्या गॅदरिंग, नाटक, वाङ्मयमंडळं, काव्यचर्चा असल्या आवडत्या गोष्टींना वेळ मिळत नव्हता. सुटीसाठी निवांतपणे घरी जाणंही जमत नव्हतं.. हे सगळं जरी खरं असलं तरी माझी नोकरी हा माझा मूलभूत आधार होता.

शिवाय 'नोकरी करून शिकत्येय' म्हणून नातेवाईकांत माझी प्रतिमा एकदम बदलली होती.

शिक्षण संपलं आणि मला नोकरी लागली ती एका बहुराष्ट्रीय कंपनीत. इथल्या अनुभवांनी आर्थिक समृद्धी तर दिलीच पण त्या पलीकडचंही कितीतरी दिलं... समाजातली प्रतिष्ठा, घरातलं आर्थिक स्थैर्य. त्या बळावर मिळणारा आत्मविश्वास मुलांना सुविधासंपन्न आयुष्य देण्याच्या स्वप्नांची पूर्तता, त्यांच्या शिक्षणासाठी कोणत्याही अडचणी निभावून नेण्याची आणि कसल्याही वृत्तीच्या माणसांना तोंड देण्याची ताकद... यादी बरीच मोठी आहे.

हे देणं कशातच मोजता येणारं नाही.

एकदा माझी वहिनी मला म्हणाली, ''तुम्ही मुलांना जशा स्वावलंबनाच्या सवयी लावल्यायत तशा भावाला का नाही लावल्यात? मला किती मदत झाली असती त्यांची!''

''अगं पण करतोच की तो तुला मदत.'' माझ्यातली नणंद फणकारली.

''करतात हो. पण सांगितल्यावर आणि सांगेन तेवढीच! तुमची मुलं कशी समजून घऊन काम करतात. कुठे कमी पडत नाहीत. त्यामुळे त्यांना दुसऱ्यांच्या कष्टाचीही किंमत समजते.''

मी अवाक्! माझ्या मुलांचे हे गुण माझ्या कधी लक्षातच आले नव्हते. कारण मी ते जाणीवपूर्वक जोपासले नव्हते. माझ्या नोकरीमुळे मुलांना आपोआपच स्वावलंबनाचे धडे मिळाले होते.

नोकरीसाठी रोज दीड किंवा कधी ट्रॅफिकजॅमची कृपा झाली तर दोनअडीचसुद्धा तासांचा प्रवास करावा लागे. अर्थात कंपनीने ती सोय केलेली असल्यामुळे, एकदा का 'वेळेवर'कंपनीची बस गाठली - खरं म्हणजे सगळ्यात अवघड काम तेच असायचं. की मग पुढचा वेळ पूर्णपणे माझ्या स्वत:च्या मालकीचा

असायचा. त्यावेळेत माझं निवांत वाचन व्हायचं. कधी अर्धवट राहिलेली झोप. कधी चिंतन. किंवा अगदी निसर्गावलोकनसुद्धा

आता नोकरी सोडल्यावर त्या रिकाम्या वेळेची किंमत कळतेय. आता चोवीस तास घरी असूनसुद्धा साधं रोजचं वर्तमानपत्रही तितकं निवांतपणे वाचता येत नाही.

आजोबांनी तुच्छतेने 'गुलामी' म्हणून ज्याचा उल्लेख केला होता त्या चाकरीचे मी असे गोडवे गातेय याचा अर्थ असा नाही की माझी नोकरी अगदी बर्फावरच्या चाकासारखी सुरळीतपणे पुढे गेली. मलाही नोकरीत वेडीवाकडी वळणं आणि मनस्ताप देणारी माणसं भेटलीच. तीस वर्षाच्या नोकरीत सर्वसामान्य बाईला येऊ शकणाऱ्या सगळ्या अडचणी मलाही आल्या. पण त्या सोडवण्याची ताकददेखील नोकरीतूनच मिळाली.

सक्षमीकरण हा अवघड शब्द मी जगले तो केवळ वेगवेगळ्या प्रकारच्या नोकऱ्यांमधल्या अनुभवामुळेच.

स्त्रियांच्या पूर्णवेळ नोकरीबद्दलचे वेगवेगळे मतप्रवाह, त्याचे समाजव्यवस्थेवर आणि गृहव्यवस्थेवर होणारे उलटसुलट परिणाम, अर्थव्यवस्थेला मिळणारं वेगळं वळण, पुरुष कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय.. या सगळ्या गोष्टी माझ्याही वाचनात आल्या आहेत. त्यातले काही मुद्दे मला मनापासून पटतात. तरीही आज पर्ज्यन्यावलंबी शेतीतली हतबलता आणि स्पर्धात्मक वातावरणातल्या व्यवसायातून येणारं नैराश्य किंवा पैशाचा माज याचा विचार करताना वाटतं... पूर्वजांनी म्हटलं होतं ते तेव्हाच्या परिस्थितीत खरं असेलही पण आता ते पुन्हा तपासून पहायला नको?

आत्मविश्वास, मनोबल, व्यक्ती म्हणून स्वतंत्र ओळख, आत्मभान, कर्तव्याची जाणीव आणि कर्तृत्वाचा सार्थ अभिमान, व्यवहार आणि जिव्हाळा यांचा मिलाफ साधणारी मैत्री आणि आयुष्याशी लढताना केव्हाही उपयोगी पडणारं अनुभव नावाचं शस्त्र.□□

आयुष्यातल्या साठा उत्तराची कहाणी वाचताना नोकरीने त्यातल्या कितीतरी प्रश्नांची सार्थ उत्तरं मिळवून दिली. पण एक प्रश्न मात्र अजून अनुत्तरितच राह्यलाय.□

हे एवढं सगळं देणाऱ्या नोकरीला कनिष्ठ का म्हणायचं?

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.

# पुरस्कार

*** 'पुणेरत्न' पुरस्कार**

अभियान प्रतिष्ठानतर्फे चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते प्रसिद्ध संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांना 'पुणेरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव अध्यक्षस्थानी होते. 'प्रतिमा प्रकाशन'चे अरुण पारगावकर, खंडणीविरोधी पथकाचे पोलिस निरीक्षक भानुप्रताप बर्गे, शिक्षण क्षेत्रातील जयवंत पाटील, 'इनफ्लक्स'चे शिवाजीराव चमकिरे, कलाकार आस्ताद काळे, नृत्यांगना अस्मिता सत्पती, डॉ. अभिजित जोशी, संभाजी थोरवे, शरद मोरे, अविनाश कलाटे आणि हर्षल वैद्य यांना 'पुणे कार्यरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण मंडळाचे अध्यक्ष महेश लडकत, डॉ. सतीश देसाई, अण्णा थोरात, रणजित बाबर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश पवार, कार्याध्यक्ष विनायक धारणे याप्रसंगी उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, ''विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सर्वांना या पुरस्काराने अधिक जोमाने काम करण्याचे बळ आणि नवी उमेद मिळणार आहे.'' कुलकर्णी म्हणाले, ''या पुरस्काराला पुणे हे नाव जोडले असल्याने मला हा पुरस्कार जवळचा वाटतो. रसिकांच्या आशीर्वादानेच मला गीताची चाल सुचते.''

*** जयश्री गडकर यांना 'चित्रभूषण' पुरस्कार**

कॅमेरा हे माझे टॉनिक आहे. त्याला कदापि विसरणे शक्य नाही. आतापर्यंत रसिकांनी मला भरभरून प्रेम दिले आहे. त्यांच्या कौतुकाची थाप सतत पाठीवर पडलेली आहे.

मायबाप प्रेक्षकांचे प्रेम असेच शेवटपर्यंत टिकून राहो, अशी अपेक्षा ज्येष्ठ अभिनेत्री जयश्री गडकर यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय चित्रपट महामंडळातर्फे जयश्री गडकर यांना चित्रभूषण पुरस्कार ३ जून रोजी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात हा रंगतदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यास ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचनादीदी, ज्येष्ठ अभिनेते रमेश देव व अभिनेत्री सीमा देव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रकृती ठीक नसतानाही जयश्रीताई या सोहळ्याला उपस्थित राहिल्या होत्या. त्यांचे मनोगत पती बाळ धुरी यांनी वाचून दाखविले.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे म्हणाले, जयश्रीताई हे एक असामान्य व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे चित्रपटसृष्टीतील कार्य अफाट आहे. 'सांगते ऐका' या चित्रपटात एक रुपयाचे नाणे जयश्रीबाई कपाळाने उचलतात तो सीन खूप आवडला. या दृश्याकरिता आपण हा चित्रपट १५ वेळा पाहिला याची आठवण बाबासाहेबांनी या वेळी सांगितली.

*** शरद पवार यांना 'डॉक्टर ऑफ ह्युमॅनिटीज' पदवी**

''अन्नटंचाईच्या जागतिक समस्येची तुलना अर्थतज्ज्ञांनी 'सुनामी'शी केली आहे. राजकीय आणि सैद्धांतिक मतभेद विसरून या समस्येला भिडावे'' असे आवाहन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी जागतिक नेत्यांना केले.

चार दशकांच्या यशस्वी सामाजिक जीवनाबद्दल 'लॉरेन्स टेक्नॉलॉजिक युनिव्हर्सिटी' ने श्री. पवार यांना 'डॉक्टर ऑफ ह्युमॅनिटीज' पदवीने सन्मानित केले. २१ मे रोजी या निमित्ताने विद्यापीठातील विद्यार्थ्यांसमोर त्यांचे व्याख्यान झाले. भारतीय शेतीची सद्य:स्थिती आणि पुढील वाटचालीचा ऊहापोह करतानाच, शेतीसुधारणेच्या दृष्टीने भारत आणि अमेरिकेकडून सुरू असलेल्या संयुक्त प्रयत्नांचा आढावा त्यांनी घेतला.

जगाची लोकसंख्या इ.स. २०५०मध्ये ११ अब्जांच्या घरात असेल, याची जाणीव करून देऊन श्री. पवार म्हणाले, ''इंधनाचे वाढते दर, अन्नधान्य पिकांचा जैवइंधननिर्मितीसाठी वाढता वापर; तसेच काही देशांनी निर्यात रोखल्याने अन्नटंचाई निर्माण झाली. अन्न आणि शेती संघटनेच्या अहवालानुसार, अन्नधान्याच्या जागतिक साठ्याने किमान पातळी गाठली आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज पूर्ण करण्यासाठी जागतिक नेत्यांनी एकत्रित काम करणे अनिवार्य बनले आहे.''

भारत स्वतंत्र झाला तेव्हा ३६ कोटी लोकसंख्येपैकी सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून होते, तर सध्या एक अब्ज १२ कोटीपैकी साठ टक्के लोकसंख्या शेतीवर गुजराण करते, अशी माहिती श्री. पवार यांनी दिली.

ते पुढे म्हणाले, ''हरितक्रांतीच्या काळातील भरभराटीनंतर नव्वदच्या दशकात भारतीय शेतीची पीछेहाट झाली, ही वस्तुस्थिती आहे. तंत्रज्ञानाचा अतिवापर आणि राज्यांकडून शेतीकडे झालेले दुर्लक्ष ही त्याची कारणे मानली जातात. सद्य:स्थितीत

विशेषत: अवर्षणप्रवण क्षेत्रातील शेतकरी अडचणीत आहेत. ऐंशी टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन असल्याने अडचणींत भर पडली आहे. मात्र, गेल्या चार वर्षांत उपाय योजण्यात आले असून, दुसऱ्या हरितक्रांतीकडे वाटचाल सुरू झाली आहे.''

शेतीला कमी व्याजदरात कर्जपुरवठा, शेती संशोधनासाठी अधिक निधी, शेतीमालासाठी नव्या बाजारपेठांची निर्मिती, पीकविमा योजनेची फेररचना आणि पणन कायद्यातील सुधारणांमुळे शेतीला संजीवनी मिळेल, असे ते म्हणाले. औपचारिक शिक्षण ही शिक्षणाची पहिली पायरी आहे, हे लक्षात ठेवून भविष्यातील बदलांना सामोरे जाण्यासाठी व्यक्ती आणि संस्थांनी शिक्षणात सातत्य ठेवण्याची गरज आहे, असे पवार म्हणाले.

विद्यापीठाचे अध्यक्ष लुईस वॉकर, विश्वस्त डॉ. मारिया वाघ, शिकागोचे कॉन्सुलेट जनरल अशोककुमार अत्री, उद्योगपती प्रल्हाद छाब्रिया, डॉ. सूर्याजी भोसले, डॉ. गायत्री भोसले, सुहास पाटील, स्टीव्ह भोसले आणि त्यांच्या पत्नी आदी या प्रसंगी उपस्थित होते.

१९३२मध्ये सुरू झालेल्या 'लॉरेन्स टेक' विद्यापीठाने सायंकाळच्या वर्गांची सुरुवात ७५ वर्षांपूर्वी सर्वप्रथम केली. साउथफील्डमध्ये १०२ एकरांमध्ये उभारलेल्या या विद्यापीठाचे अनेक 'ऑनलाइन' वर्ग असून शेतीपासून अभियांत्रिकीपर्यंत आणि विज्ञानापासून व्यवस्थापनापर्यंत ऐंशी अभ्यासक्रम येथे उपलब्ध आहेत. वास्तुविशारद शिक्षणामध्ये हे विद्यापीठ जगात पाचव्या स्थानावर आहे.

### * वामनराव अभ्यंकर यांना आगाशे पुरस्कार

''प्रत्येक विद्यार्थ्याकडून शिक्षक काहीतरी नवीन गोष्ट शिकत असतो, म्हणजे विद्यार्थी एका अर्थी गुरू असतात. माझ्या गुरुजनांनी मला शिकायचे कसे हे शिकविले आणि त्यातूनच शिक्षण प्रक्रिया ही मनुष्य निर्मितीची प्रक्रिया आहे याच श्रद्धेने आजपर्यंत काम करत आलो,'' असे प्रतिपादन वामनराव अभ्यंकर यांनी केले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे ल. वि. आगाशे पुरस्काराने अभ्यंकर यांना सन्मानित करण्यात आले.

शोभना गोखले यांनी लिहिलेल्या 'प्राचीन भारतीय इतिहासाची साधने' या पुस्तकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. सुरेश महाजन यांना 'संस्कृत नाट्यवाङ्मयाचा इतिहास' या पुस्तकासाठी श्रीमती कमल तांबे पुरस्काराने गौरविण्यात आले. तुषार चिंधडे यांना गो. ग. कुलकर्णी पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्चना नेमाडे आणि अभिजित पाटील या शिक्षकांनाही सन्मानित करण्यात आले.

डॉ. दीपक टिळक म्हणाले, ''वामनराव अभ्यंकरांसारखे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व शून्यातून जग निर्माण करते. त्यांच्या शिक्षणावरील श्रद्धेतून खूप काही शिकण्यासारखे आहे.''

### * भालचंद्र मुणगेकर यांना राजर्षी शाहू पुरस्कार

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा यावर्षीचा राजर्षी

शाहू छत्रपती पुरस्कार केंद्र सरकारच्या नियोजन आयोगाचे सदस्य. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांना २६ जूनला देण्यात आला.

५१ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

राजर्षी शाहू महाराज यांना अभिप्रेत असलेले, बहुजन समाजासाठी कार्य करणारे, विकासविषयक अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक व सर्वसामान्यांतून उच्च पदावर विराजमान झालेले डॉ. मुणगेकर महाराष्ट्राबरोबरच देशाला परिचित आहेत.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू ते नियोजन आयोगाचे सदस्य असा त्यांचा प्रवास आहे.

*** उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार**

पत्रकारांसाठी जीवनगौरव पुरस्कार सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी मुंबई येथे केली. राज्य सरकारचे सन २००५ चे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. या वेळी बोलताना विधिमंडळ, सरकार, न्यायपालिका आणि वृत्तपत्रे या लोकशाहीच्या चार स्तंभांत समन्वयाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. पत्रकारांनी प्रशासनातील त्रुटी आणि दोष दाखविण्याबरोबरच ते दुरुस्त करण्याचे उपाय सुचवावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

''पत्रकारांनी जनतेच्या प्रश्नात लक्ष घालून न्याय मिळवून द्यावा. त्यामुळे मिळणारा आनंद आगळाच असतो.'' असे ते म्हणाले. विकास वार्तांकडे अधिक लक्ष दिल्यास अवांतर प्रश्न बाजूला पडतील, अशी कोपरखळीही त्यांनी मारली.

सन २००५ चा राज्य स्तरावरील प्रथम क्रमांकाचा ४१ हजार रुपयांचा बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार 'सकाळ' (कोल्हापूरचे) मुख्य वार्ताहर विश्वास श्यामराव पाटील यांना मिळाला. विभागीय पुरस्कारात अमरावती विभागात 'सकाळ'चे बुलडाणा येथील वार्ताहर गोपाळ जगभाय हागे यांना २१ हजार रुपयांचा लोकनायक अणे पुरस्कार मिळाला.

पुरस्कारप्राप्त पत्रकारांच्या वतीने उत्तर देताना विश्वास पाटील यांनी शेती लेखनाबद्दलही पुरस्कार देण्याची सूचना केली.

*** मसापचे पुरस्कार**

'प्रमाणभाषेचे गोडवे प्रमाणाबाहेर गात बोलीभाषा दडपल्याने मराठीची पीछेहाट झालेली दिसते,' असे मत प्रसिद्ध लेखक डॉ. फ्रान्सिस दिब्रेटो यांनी व्यक्त केले. 'प्रत्यक्षात बोलीभाषा बोलणाऱ्या खेड्यापाड्यातल्या माणसांनीच मराठी जपली आहे,' असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १०२ व्या वर्धापनदिनी डॉ. मु. श्री. कानडे यांना 'मसाप गौरव पुरस्कार' आणि बेळगाव येथील पंढरीनाथ कुलकर्णी यांना 'डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' डॉ. दिब्रेटो यांच्या हस्ते प्रदान करण्यात

आला. प्रत्येकी पाच हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. 'आजचा मराठी माणूस आणि त्याचा भाषिक व्यवहार' या विषयावर डॉ. दिब्रेटो यांनी या प्रसंगी विचार माडले.

डॉ. दिब्रेटो म्हणाले, ''आजचा समाज व्यामिश्र आहे, जीवनशैली बदलली आहे, हे मान्य केले तरी यामुळेच समाजातील भाषिक दरी वाढते आहे. आपण 'भारतीय' आहोत की 'इंडियन' असे विचारण्याची वेळ आली आहे. मराठी ही ज्ञानभाषा आणि इंग्रजी ही संपर्कभाषा, असे न राहता आता बालवाडीपासून सरसकट इंग्रजी सक्तीचे केल्याची खंत वाटते. समाजात एकीकडे लेखक, कवी, प्रकाशक आणि एकूणच ग्रंथव्यवहार वाढत आहे आणि त्याच वेळी समाजातील काही गट केवळ इंग्रजी बोलण्यात धन्यता मानत आहे. या सगळ्याच्या मुळाशी असलेले प्रमुख कारण म्हणजे मराठीवर महाराष्ट्रातच न्यूनगंडाचे सावट पसरलेले आहे. विदेशात किंवा अन्य राज्यांतही मराठी माणूस मराठी माणसाशी मराठीत बोलत नाही, हे या न्यूनगंडाचेच उदाहरण आहे. हा न्यूनगंड दूर होत नाही, तोवर मराठीला चांगले दिवस येणार नाहीत.''

आणखी काही निरीक्षणेही त्यांनी नोंदवली.

* 'भैया' हातपाय पसरी कारण मराठी माणूस हातपाय आवरी
* 'व्याकरण', 'कोश' हा भाषेचा कणा आज दुर्लक्षित
* उच्च मध्यमवर्गीयांनी मराठीची तिरडी बांधली
* इंग्रजी नाही म्हणजे व्यक्तिमत्त्व नाही, हा भ्रम
* महाराष्ट्रात 'मराठी दिन' साजरा करावा लागणे दुर्भाग्याचे
* न्यूनगंडामुळे आत्मविश्वास हरवलेला समाज

पूर्वार्धात प्रा. वंदना बोकील-कुलकर्णी यांनी 'कथालेखिका - शतकाची वाटचाल' यावर दृक्-श्राव्य सादरीकरण केले. डॉ. कानडे आणि श्री. कुलकर्णी यांनीही मनोगत मांडले. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी परिषदेच्या उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी प्रास्ताविक केले.

परिषदेचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांनी अध्यक्षीय समारोप केला.

### * संतोष पवार यांना नटरंग पुरस्कार

'नटरंग ॲकॅडमी'तर्फे प्रख्यात लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता संतोष पवार यांना 'नटरंग प्रतिष्ठान कलागौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नगरसेवक दीपक मानकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार शिवाजीराव आढळराव पाटील होते. शाहीर मधू कडू यांच्या स्मृतिदाखल हा पुरस्कार पवार यांना देण्यात आला. या प्रसंगी नगरसेवक माधुरी मिसाळ, अशोक येनपुरे, दत्ता सागरे, उद्योजक ललित जैन उपस्थित होते. मानकर म्हणाले, ''नवोदित

कलाकारांना व्यासपीठ देण्याचे काम या ॲकॅडमीने केले आहे. यामुळे लहान वयातच मुलांना योग्य दिशा मिळेल.'' ॲकॅडमीचे प्रमुख जतिन पांडे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या निमित्ताने तीनशे बाल कलाकारांच्या 'तारे नृत्यमय' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

### * 'शोधयोग'ला स्वा. सावरकर पुरस्कार

''मोठ्या व्यक्तींचे मोठेपण हे निर्विवादच असते. फुलपाखरासारखे त्यांच्यातील चांगले गुण टिपणे हीच आपली संस्कृती आहे,'' असे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे यांनी व्यक्त केले.

धनागरे म्हणाले, ''महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू ही सारी व्यक्तिमत्त्वे मोठीच आहेत. मतांसाठी अकारण वाद निर्माण न करता त्यांचे मोठेपण निर्विवादपणे मानावे.''

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे देण्यात येणारा स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार यंदा प्रदीप कुलकर्णी यांनी विज्ञान आणि अंधश्रद्धांवर लिहिलेल्या 'शोधयोग' पुस्तकाला मिळाला, तसेच राजस्थानातील राजेंद्र सिंग यांच्या 'जलसमृद्धी' प्रकल्पावर सुरेखा शहा यांनी लिहिलेल्या 'जोहाड' पुस्तकाला चेतना पुरस्कार मिळाला.

ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रकाश फडके, कार्यवाह मुकुंद अनगळ, कोषाध्यक्ष प्रतिभा पटवर्धन व्यासपीठावर होते. पाच हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

### * मराठी नाट्य परिषदेचे पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुणे शाखेतर्फे रवींद्र खरे यांना केशवराव दाते पुरस्कार, डॉ. क्षमा वैद्य यांना माणिक वर्मा पुरस्कार, डॉ. राम साठे यांना यशवंत दत्त पुरस्कार आणि नेपथ्यकार प्रकाश मयेकर यांना पु. श्री. काळे पुरस्कार देण्यात आला.

शाखेच्या तिसाव्या वर्धापनदिनानिमित्त २५ मे रोजी टिळक स्मारक मंदिर येथे ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री फैयाज यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण झाले.

नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांना गो. रा. जोशी पुरस्कार, तर शशिकांत कुलकर्णी यांना सेवाकार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला. 'चंद्रलेखा' नाट्यसंस्थेचे मोहन वाघ यांनी केशवराव दाते, माणिक वर्मा आणि पु. श्री. काळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कारांच्या रकमेची ठेव परिषदेकडे सुपूर्द केली आहे.

**परिषदेचे पुरस्कार पुढीलप्रमाणे :**

वाळवेकर स्मृती चषक - पी. डी. ए. पुणे (सहस्रचंद्रदर्शन),
केळकर स्मृती चषक - कामगार कल्याण मंडळ, सहकारनगर पुणे,
भालबा केळकर पुरस्कार (दिग्दर्शन) - प्रदीप वैद्य (सहस्रचंद्रदर्शन),
राज्य नाट्य स्पर्धा उत्कृष्ट अभिनय पुरुष - प्रदीप कोथमिरे,

स्त्री कलाकार - प्रिया गुजर,
राजा नातू पुरस्कार (दिग्दर्शन) - उमेश देशमुख,
डॉ. वा. पां. बापट पुरस्कार - प्रिया नेर्लेकर,
कामगार कल्याण स्पर्धा (अभिनय) - आशुतोष वाडेकर,
पार्श्वनाथ आळतेकर पुरस्कार (व्यावसायिक नाट्यदिग्दर्शन) - रवींद्र सांभारे,
विद्या विकास पुरस्कार - स्नेहल पोमण,
गंगाधरपंत लोंढे पुरस्कार - दीपक रेगे,
मधू आपटे पुरस्कार (बालकलाकार) - सुयश झुंझुरके,
राम नगरकर पुरस्कार -सदानंद चांदेकर,
डॉ. वसंतराव देशपांडे पुरस्कार (उद्योन्मुख गायक) - निनाद जाधव,
भार्गवरारम आचरेकर पुरस्कार (प्रदीर्घ सेवा) - रजनी भट,
आरोग्य सेवा पुरस्कार - रघुनाथ माटे.
राम गणेश गडकरींच्या नाटकातून काम करणारा कलावंत - अशोक अवचट,
रंगुमामा जोगळेकर पुरस्कार - अविनाश फाटक,
वसंत शिंदे पुरस्कार - शेखर लोहोकरे,
स्वरराज छोटा गंधर्व पुरस्कार - दत्तोबा भाडळे,
राजा कामतेकर पुरस्कार - प्रदीप कोथमिरे,
राम गडकरी पुरस्कार - श्रीमती शितोळे,
अखंड नाट्यसेवा पुरस्कार - श्रीराम रानडे,
प्र. श्री. दिवाकर पुरस्कार - वंदना घांगुर्डे,
नाना रायरीकर पुरस्कार (पडद्यामागच्या कलाकारांचे पाल्य) - मयुरी दरेकर, नयन गोळेकर.

### * 'चित्रसृष्टी'ला तीन पुरस्कार

'चित्रसृष्टी'या चित्रपटविषयक नियतकालिकाच्या 'विश्व नववास्तववादी चित्रपट' या दिवाळी विशेषांकास तीन पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये कल्याण येथील साहित्य विचारमंथन आणि श्रीराम सेवक मंडळ यांचा संयुक्त पुरस्कार, मुंबईच्या भागुजी जाधव फाउंडेशन आणि पुणे जिल्हा मराठी पत्रकार संघाचा पुरस्कार यांचा समावेश आहे, असे नियतकालिकाचे संपादक मनोज कुलकर्णी यांनी कळविले आहे.

### * विठ्ठल वाघ यांना 'विवेकानंद पुरस्कार'

स्वामी विवेकानंद सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'स्वामी विवेकानंद काव्य पुरस्कार' यंदा ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांना साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कवी गंगाधर महांबरे, माजी आमदार विश्वास गांगुर्डे, महापालिकेतील विरोधी

पक्षनेते विकास मठकरी, नगरसेविका मेधा कुलकर्णी आदी या वेळी उपस्थित होते. मृणालिनी कानिटकर-जोशी, सुनील मोरे यांचा या वेळी गौरव करण्यात आला.

*** सामाजिक कृतज्ञता पुरस्कार**

जनसेवा व्यक्ती विकास प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'सामाजिक कृतज्ञता पुरस्कार' पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव व भारती विद्यापीठाचे कार्यवाह विश्वजित कदम यांना ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या हस्ते देण्यात आला.

अध्यक्ष मधुकर धिवार, विकास देशपांडे, नितीन कदम, राजेंद्रसिंह राजपूत, मिलिंद तिरमारे, विठ्ठल गायकवाड, मुकेश धिवार उपस्थित होते.

*** इमेज वेल्फेअर ॲचिव्हर्स फोरमचे पुरस्कार**

''अस्पृश्यता, जातिव्यवस्था आणि स्त्री-पुरुष विषमता नष्ट झाल्याशिवाय देश महासत्ता होणार नाही. त्यामुळे नागरिकांमधील सर्जनशीलता मारली जाते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. मा. प. मंगुडकर यांनी पुणे येथे केले.

'इमेज वेल्फेअर ॲचिव्हर्स फोरम' यांच्यातर्फे 'राष्ट्रीय एकात्मता-व्यक्तिगत सहभाग' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले.

या प्रसंगी कृषितज्ज्ञ डॉ. मुकुंद गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष नितीन विरखरे, सहसंयोजक कांतिलाल संचेती आणि डॉ. सुधा कांकरिया आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सकपाळ यांना डॉ. मंगुडकर यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. मंगुडकर म्हणाले, ''सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात विचारांचा ऱ्हास होत आहे. यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. वेशीच्या बाहेरील जग वेशीमध्ये येईल, त्या वेळी खऱ्या अर्थाने अस्पृश्यता नष्ट होईल. स्त्री सुधारणेचा प्रश्न हा पुरुष सुधारणेशी संबंधित आहे. या बाबतीत विचारप्रबोधन न झाल्यास समाज प्रगती करू शकणार नाही.''

सकपाळ म्हणाल्या, ''शेतकरी आत्महत्या करत असल्याची कित्येक उदाहरणे समाजामध्ये दिसत आहेत. मात्र, त्याच्या बायकोने आत्महत्या केल्याचे उदाहरण समोर आलेले नाही, यावरून स्त्रियांची परिस्थितीशी झुंजण्याची जिद्द स्पष्ट आहे.''

अशोक जवांजल, प्रमोद घोणे, चंद्रकांत ज्येष्टे यांना 'विकासरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल डॉ. अनिल व ज्योती तोष्णीवाल, नेत्रतज्ज्ञ डॉ. पी. एस. हार्डीया, डॉ. संजय टेकवडे, डॉ. नैना भुरट, डॉ. सोहम जैन यांचा; तर बांधकाम क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल रवींद्र राऊत, शीतेश आग्रवाल यांचा सत्कार करण्यात आला. मदनलाल बोरा यांना 'उद्योगरत्न' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अशोक समेळ, अश्विनी एकबोटे आणि आदिती भागवत यांना 'कलारत्न' पुरस्कार तर निखिल नहार यांना 'युवारत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## * श्री माणकेश्वर वाचनालयास राष्ट्रीय पुरस्कार

निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालयास राजा राममोहन रॉय पुस्तकालय प्रतिष्ठान कोलकाता यांच्याकडून सर्वोत्कृष्ट ग्रंथालय म्हणून नुकताच पुरस्कार प्राप्त झाला.

दि. २१ जानेवारी रोजी चेन्नई येथे भारत सरकारचे सचिव, सांस्कृतिक मंत्रालय व राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. अभिजीत सेनगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली तामिळनाडूचे शिक्षणमंत्री मा. श्री. तंगम तेन्नरसु यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी वाचनालयाचे माजी अध्यक्ष व विद्यमान ज्येष्ठ संचालक श्री. दत्ताकाका उगावकर हे चेन्नई येथे गेले होते. या पुरस्काराचे स्वरूप रुपये २५,०००/- रोख स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.

भारतातील अठरा राज्यातून प्रत्येकी एका वाचनालयाची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. त्यात महाराष्ट्रातील श्री माणकेश्वर वाचनालय निफाड या वाचनालयाला सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागातील ग्रंथालयीन चळवळ ८८ वर्षांपासून चालविणाऱ्या या वाचनालयाची दखल राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानने घेतली. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालक मा. दि. श्री. चव्हाण साहेब, आमदार मा. प्रतापदादा सोनावणे, सहाय्यक ग्रंथालय संचालक नाशिक विभाग मा. कविता महादूरे, नाशिक जिल्हा ग्रंथालय संघ, सुभाष सार्व. वाचनालय नाशिक, कवी विवेक उगलमुगले, कवी रवींद्र मालुंजकर, श्री संत ज्ञानेश्वर सार्व. वाचनालय नाशिक यांनी अभिनंदन केले आहे.

## * विक्रम गोखले यांना पु. ल. देशपांडे जीवनगौरव पुरस्कार

मराठी आणि अमराठी माणसांमध्येदेखील तेवढीच गुणवत्ता असते. आताचा प्रेक्षक सहनशील आहे पण त्याच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. मराठी नाटक व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे, असे मत ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी औरंगाबाद येथे व्यक्त केले.

पु. ल. देशपांडे जीवनगौरव पुरस्कार त्यांना देण्यात आला. मराठी कलावंताला मार्केटिंग करता आले नाही आणि येणारही नाही. त्यासाठी मार्केटिंग जर जमत नसले तर मग आपले नाणे एवढे खणखणीत असले पाहिजे की तुम्हाला टाळून कोणी पुढे जाऊ शकणार नाही. शेवटी नशीब, मार्केटिंग आणि प्रेक्षकांचे बौद्धिक वय जमले की नटाला प्रेक्षक डोक्यावर घेतात; परंतु हे मार्केटिंग जास्त काळ चालत नाही. कधीतरी पितळ उघडे पडते, असे विक्रम गोखले म्हणाले.

गेल्या २० वर्षांत म्हणजे १९८८ पासून आपण कोणताच पुरस्कार जाणीवपूर्वक स्वीकारला नाही. यात उद्धटपणा नाही. ज्या पद्धतीने पुरस्कारासाठी विचार केला जातो त्या पद्धतीलाच आपला आक्षेप होता आणि आहे. मात्र पु. ल. देशपांडे यांच्या नावे असलेला पुरस्कार कोणीच नाकारणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

चांगले नाटक नाही, सिनेमा नाही, चांगले कोणी लिहीत नाही; त्यामुळेच की काय मराठी नाटक व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे. पूर्वी प्रेक्षक पहाटे सहा-सात वाजेपर्यंत नाटक बघायचा. आज मात्र दोन तासांपेक्षा जास्त वेळ नाटक बघायला रसिक तयार नाहीत. अर्थात याला दूरदर्शन हे एक कारण आहे. प्रेक्षकवर्गाचे बौद्धिक वय सात वर्षे आहे. दूरदर्शनवर कार्यक्रम दाखविले जातात. सध्या हेच माध्यम स्वस्त असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

मराठी चित्रपट सध्या जोमाने येत आहेत. चांगल्या मराठी चित्रपटांना प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसादही मिळत आहे. व्यावसायिकदृष्ट्या मराठी चित्रपट चांगला व्यवसाय करत आहे ही एक चांगली बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

राज ठाकरे यांच्या मराठी माणूस या मताशी विक्रम गोखले यांनी असहमती व्यक्त केली. नट म्हणून त्यांच्या भूमिकेला माझा विरोधच असणार आहे. कारण हिंदी सिनेमाने आम्हाला चांगले जग दिले आहे. विविध प्रांतातले लोक जात, धर्म विसरून या ठिकाणी येतात. पण तुमच्या घरात काही दिवसांसाठी रहायला म्हणून आलेला परप्रांतीय माणूस घरचेच नियम तोडत असेल तर आवडेला का असा प्रतिप्रश्नही विक्रम गोखले यांनी पत्रकारांना केला.


बलराज साहनी, अशोककुमार, दिलीपकुमार, अमिताभ बच्चन हे महानायक झाले ते काही रातोरात झालेले नाही. त्यामागे त्यांची प्रचंड मेहनत आहे. विजया मेहता, वडील चंद्रकांत गोखले हे आपले गुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

❐


**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email :**
**info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.



# वाचकांचा प्रतिसाद



**सौ. आशाताई आपराद,**

तुमचा गुलमोहोर आता सर्वत्र फुलला आहे... ज्याचा शेवट गोड - शेवट चांगला; ते सर्व चांगलेच. आयुष्याच्या संध्याकाळी तुम्ही सर्वजण चांगल्या यशस्वी जागी पोहोचला आहात की आता त्या जीवनास एक 'कृतार्थ जीवन' असे म्हणता येईल. मला तर खात्रीपूर्वक वाटते की दि. २५ एप्रिल २००८ पासून त्या 'शाहू स्मारक' मधील सोहळ्यापासून तुम्हाला पीडा देणाऱ्या, छळणाऱ्या, सर्वच सर्व मानसिक/ शारीरिक यातना कायमच्या दूर निघून गेल्या असतील; तुम्हाला एक वेगळा चिंतामुक्त सदैव उत्साही 'पुनर्जन्म' मिळाला असावा की त्याचा उपयोग आता तुम्ही समाजासाठी करीत रहावे.

एक आशयसंपन्न आणि प्रेरणादायी म्हणून हा ग्रंथ प्रत्येक घरातून वाचला जाईल.

आत्तापर्यंत माझ्यासह आणखी तिघांनी हे पुस्तक वाचले. थक्क झाले, 'अरे या दोघा पतीपत्नींना आपण आपल्या घरी भोजनास बोलवू या! आपल्या लेकीसुना आणि आपली भावी पिढी आपली नातवंडे यांच्याशी त्यांचा परिचय करून देऊन त्यांना त्यांचा आशीर्वाद मिळवून देऊया...' अशी त्यांची प्रतिक्रिया होती.

माननीय लीलाताई, अण्णा, डॉ. सुनीलकुमार, रावसाहेब इत्यादी सर्वांना लांबून लांबून दुरून दुरून आम्ही सर्वजण ओळखतो. त्यांच्या सर्व कार्यक्रमांना हजर राहतो.

स्नेहांकित
चंद्रकांत पिलारे

**प्रिय आशाताईंना**

स. न. वि. वि.

आपले 'भोगले ते दुःख त्याला' हे पुस्तक वाचले. लगेचच आपल्याला फोन करण्याचा प्रयत्न केला पण आपला नंबर लागला नाही. तुमचे पुस्तक खूप आवडले ते सांगायला शब्द नाहीत. तुमचा झगडा वाचून कितीतरी वेळा डोळ्यांत पाणी आले. कुठून आणलेत एवढे बळ? घरातला एकही माणूस तुमच्याबरोबर नसताना कसं गाठलंत तुमचं ध्येय? ठाम निश्चय करणाऱ्याच्या मागे दैवी शक्ती असते हेच खरे! तुमच्या पुढच्या वाटचालीसाठी असंख्य शुभेच्छा.

तुमची
सुषमा जोगळेकर

**भोगले जे दुःख त्याला...**

**आशा आपरापद**




**२२०रु.**

**पोस्टेज २५ रु.**

**दक्षिणायन**

केप हॉर्न
ते
कॅरिबियन

**डॉ. रणजित मिरजे**




**२५०रु.**

**पोस्टेज २५ रु.**

**डॉ. रणजित मिरजे,**

स. न. वि. वि.

आपले दक्षिणायन हे प्रवासवर्णन नुकतेच वाचनात आले. हे पुस्तक अतिशय रोचक आहे. तीन वेळा त्याचे पुनर्लेखन केल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे असेल, हे आपले पहिलेच पुस्तक आहे असे मुळी वाटतच नाही. इतके सफाईदार लेखन झाले आहे. ब्राझील, चिली वगैरे देशांची माहिती मनोरंजक आहे. अभिनंदन!!!

शशिकांत गद्रे
विलेपार्ले, मुंबई ४०००५७

❐

## इमेल द्वारे आलेली 'बारबाला'या पुस्तकाविषयीची प्रतिक्रीया

तुमचे बारबाला हे पुस्तक वाचले. अत्यंत प्रभावी आहे. वाचकांचा बारबालांबद्दलचा दृष्टिकोन या पुस्तकाने संपूर्णपणे बदलून जातो.

लेखिका वैशाली हळदणकर यांचे आत्मनिवेदन अगदी रोखठोक आणि हृदयस्पर्शी आहे. तिची हकीकत कल्पनेपलीकडची आहे; तरीही सत्यच आहे. तिचे सत्य खूपच धक्कादायक आहे. म्हणतात ना, 'सत्य हे कल्पनेपेक्षाही अद्भुत असते'!

हे पुस्तक ऑर्केस्ट्राबार आणि डान्सबार यांच्या अर्थकारणावरही प्रकाश टाकते. सामान्य लोकांना बारबालांबद्दल काय माहीत असतं? काही नाही, काहीच नाही. या पुस्तकामुळे बारबालांच्या बंदिस्त, अंधाऱ्या जगाच्या खिडक्या सर्व लोकांसाठी खुल्या झाल्या आहेत. अधिकाधिक बारबालांनी हिमतीने पुढे येऊन आपले अनुभव जगाला सांगितले पाहिजेत. ज्यामुळे आपण त्यांना अधिक समजून घेऊ शकू.

लेखिकेने प्रामाणिकपणे आपले सर्व अनुभव दिले आहेत, हे मान्यच करावे लागेल. तिने प्रत्येक बारीकसारीक तपशील कोणताही आडपडदा न बाळगता सांगितला आहे. अपमान, पिळवणूक आणि शोषण यांनी भरलेलं आयुष्य, दुर्दैव आणि दु:खाने व्यापलेली शोकांतिका !

तिचे आईवडील आणि भाऊ यांच्याकडे बघा. अशा हृदयशून्य कुटुंबात जन्म घेणं हेच तिचं दुर्दैव. वडील स्वत:ला कलावंत म्हणवतात, पण त्यांना आपल्या मुलीशी प्रेमाने कसं वागावं हेही समजत नाही. स्वत:च्या मुलीला आत्मसन्मान द्यावा हे कळत नाही. एक वेळ अशी येते, की तिचा भाऊ पैशांसाठी ह्याच वडिलांचा छळ करतो; तेव्हा वाटतं हा काव्यात्म न्याय झाला.

आणि या स्त्रीचा मोठेपणा बघा - प्रत्येकाकडून अपमान आणि पिळवणूक सहन करून सुद्धा तिने कोणाबद्दल एकही अपशब्द उच्चारलेला नाही!

लेखिकेच्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक पुरुषाने तिचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण केले, हे वाचून धक्का बसतो. कोणीही तिच्यावर खरंखुरं प्रेम केलं नाही की तीच खराखुरा प्रेमी शोधण्यात अपयशी ठरली?

विचारवंत म्हणतात, 'माणूस स्वत:च्या आयुष्याला स्वत:च जबाबदार असतो.' पण लेखिकेच्या या शोकांतिकेला कोण जबाबदार आहे ? काही काळ ती दारू

आणि फक्त दारूवरच जगत होती. त्यातून ती कशी बाहेर पडली कुणास ठाऊक!

म्हणूनच मी त्या स्त्रीच्या जिद्दीला सलाम करतो. ही बारबाला, खुलेआम सांगते की 'बारबाला असण्यामध्ये  काहीच गैर नाही.' ती अजूनही पूर्वीप्रमाणेच, हॉटेल मध्ये गाऊन रसिकांचं मनोरंजन करायला उत्सुक आहे.

तुमचं स्वत:वर प्रेम असेल, स्वत:बद्दल ठाम विश्वास, आदर असेल, तर आपोआपच जगही तुमच्यावर प्रेम करतं, तुमचा आदर करतं; हेच यावरून सिद्ध होतं. हे पुस्तक लिहिण्यासाठी वैशाली हळदणकरांनी जे कष्ट घेतले, आयुष्याचा तो दु:खदायक प्रवास पुन्हा अनुभवला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

श्रीमती वर्षा काळे यांनी त्यांना आत्मचरित्र लिहिण्यासाठी उद्युक्त केले, प्रेरणा दिली याबद्दल त्यांना आणि असं वेगळं, चांगलं पुस्तक बाजारात आणल्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांना धन्यवाद देतो!

किशोर पटेल, मुंबई.





**बारबाला**

**वैशाली हळदणकर**

बारमध्ये गाऊन
लोकांचं मन रिझवणाऱ्या
एका बारबालेचं
प्रांजल आत्मकथन...


**किंमत २००रु.**
**पोस्टेज २५रु.**

**नवे कोरे**

# ऑपरेशन मोलॅसिस

**अरुण हेबळेकर**

**१२०रु. पोस्टेज २५रु.**




*परदेशात काम करणारा एक तरुण, जिज्ञासू भारतीय संशोधक. संशोधन करता करता हाती आलेल्या एका अत्यंत महत्त्वाच्या गुपितापायी मारला जातो, आणखी एक अनाकलनीय गुपित मागे ठेवून.*
*त्या गुपिताचा एक हिस्सा असते त्याची बहीण. एक सामान्य मुलगी.*
*ही सामान्य मुलगी त्या नवख्या देशात आपल्या मृत भावाचे शरीर ताब्यात घ्यायला निघते.*
*तेथील अपरंपार अडचणींना तोंड देत स्वत:ला खंबीर बनवते. प्रत्यक्षात संकटांची एक जीवघेणी मालिकाच तिच्याभोवती सुरू होते...*
*ते गुपित आणि त्या जीवघेण्या गुपिताची पाळंमुळं जिथपर्यंत पोहोचली होती, तो भयानक मार्ग!*
*सारंच गूढ, अनपेक्षित...*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# श्रद्धांजली

*** अण्णासाहेब देऊळगावकर**

'माहेरची साडी', 'दे दणादण', 'लेक चालली सासरला', 'धूमधडाका' या अत्यंत गाजलेल्या चित्रपटांसह सुमारे पन्नासहून अधिक मराठी चित्रपटांच्या कथा, पटकथा आणि संवाद साकारणारे सुप्रसिद्ध लेखक अण्णासाहेब देऊळगावकर (वय ८७) यांचे २ जून रोजी प्रदीर्घ आजाराने नागपूर येथे निधन झाले.

त्यांच्या पश्चात मुलगी लेखिका प्रीती वडनेरकर, जावई प्रमोद वडनेरकर असा परिवार आहे. अण्णासाहेब मागील आठ वर्षांपासून नागपुरात राहत होते.

२२ ऑगस्ट १९२० रोजी पुण्यात डेक्कन जिमखाना येथे त्यांचा जन्म झाला. त्यांची संपूर्ण कारकीर्द पुण्यात गेली. आठ वर्षांपूर्वी त्यांनी नागपुरात मुलीकडे राहणे पसंत केले.

प्रमोद वडनेरकर यांनी अणासाहेबांच्या पार्थिवावर सकाळी अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार केले. यावेळी प्राचार्य राम शेवाळकर यांच्या उपस्थितीत शोकसभा झाली. मराठी चित्रपटसृष्टीवर अवकळा पसरली असताना वैभवाचे दिवस देणारा शिल्पकार हरपला अशी भावना प्राचार्य शेवाळकर यांनी व्यक्त केली. ''अण्णांच्या काळात प्रयोगशील चित्रपट मराठीत निघू लागले आणि त्यात अणांचा मोलाचा वाटा होता'' असे त्यांनी सांगितले.

कायम स्मरणात राहील अशा 'माहेरची साडी' या चित्रपटाच्या कथालेखनानंतर मराठी चित्रपटसृष्टीकडे रसिकांचे आकर्षण खुऱ्या अर्थाने वाढले. महाराष्ट्र चित्रपट महामंडळ आणि राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणारा 'चित्रभूषण'

पुरस्कार आणि गदिमा प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा ‘गदिमा’ पुरस्कार देऊन अण्णासाहेबांना गौरविण्यात आले होते. शासनाच्या सर्वांत गौरवाच्या अशा ‘व्ही. शांताराम’ पुरस्काराचेही ते मानकरी ठरले. ‘सुभद्रा हरण’, ‘नवरा-बायको’, ‘सतीचं वाण’, ‘भक्त पुंडलिक’, ‘थापाड्या’, ‘सासुरवाशीण’, ‘सतीची पुण्याई’, ‘खट्याळ सासू नाठाळ सून’, ‘नशीबवान’ यांसह अनेक चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिल्या. अलका कुबल, सविता प्रभुणे, नीतिश भारद्वाज, लक्ष्मीकांत बेर्डे, मोहन जोशी, चंदू पारखी अशा दिग्गज कलावंतांना चित्रसृष्टीत चमकविण्याचे श्रेय अण्णासाहेब देऊळगावकर यांच्याकडे जाते.

*** चोखंदळ अभिनेता**

जेष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले (वय ८७) यांचे दि. २० जून रोजी निधन झाले. अभिनेते विक्रम गोखले हे त्यांचे पुत्र.

सात जानेवारी १९२१ मध्ये मिरजेत जन्मलेल्या गोखले यांनी १९३८ मध्ये ‘लक्ष्मीचे खेळ’ पासून ते २००८ मधील ‘वळू’ पर्यंत असा जवळपास ८० मराठी; तर १६ हिंदी चित्रपटांमध्ये आणि ६४ नाटकांमध्ये भूमिका केल्या. संगीत रंगभूमीचा सुवणकाळ त्यांनी सक्रिय अनुभवला. त्यानंतर विजया मेहतांच्या ‘बॅरिस्टर’ पर्यंत त्यांनी विविध नाटकांत अनेक ढंगांच्या भूमिका केल्या आणि त्यातल्या अनेक भूमिका गाजल्या. त्यामध्ये ‘राजेमास्तर’ मधली मध्यवर्ती भूमिका, शिरवाडकरांच्या ‘नटसम्राट’ मधले बेलवलकर, आणि ‘बॅरिस्टर’ मधील तात्यांची खल भूमिका हे त्यांच्या कारकीर्दीतील मानाचे शिरपेच म्हणता येतील.

मनोहर स्त्री नाटक कंपनीत ‘पुन्हा हिंदू’ या नाटकात महादजीची भूमिका करणाऱ्या गोखले यांना प्रेक्षकांनी मोठी दाद दिली.

सिनेमांमध्ये ‘सुवासिनी’, ‘मानिनी’, ‘धर्मकन्या’, तर हिंदीतील ‘विश्वासघात’ आणि ‘इर्षा’ मधील त्यांची कामेही गाजली होती. ‘धाकटी जाऊ’ आणि ‘मानिनी’ साठी राष्ट्रपती पुरस्कार तर महाराष्ट्र सरकारचे एकंदर आठ पुरस्कार त्यांना मिळाले.

आपले काम पूर्ण झाले नाही तर निर्मात्याचे आर्थिक नुकसान होईल. या सिनेमाचे काही भागाचे चित्रण पूर्ण करून पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल होतो, अशी गळ ते नेहमी घालत असत असे त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. राहुल भदे यांनी सांगितले.

लष्करी जवानांबद्दल विलक्षण सहानुभूती असणारे गोखले दरवर्षी आपल्या उत्पन्नातील एक लाख रुपये अपंग आणि निवृत्त जवानांच्या कल्याण निधीसाठी देत.

त्यांना आमची श्रद्धांजली.

❐




# अनुक्रमणिका

पंडितजी १०१



# पंडितजी



गंगाराम नावाचा एक ब्राह्मण होता. त्याचे वडील, आजोबा, पणजोबा संस्कृत विद्वान होते. लोक त्यांना 'पंडितजी' अशी हाक मारायचे.

गंगारामला कोणीच 'पंडितजी' म्हणून बोलावत नसे. त्याला या गोष्टीचं फार वाईट वाटायचं.

गंगारामने खूप विचार केला. त्याला काही सुचेना. त्याला एकदम बिरबलाची आठवण झाली. बिरबल काहीतरी युक्ती करेल अशी त्याला खात्री वाटली.

पळतपळत तो बिरबलाकडे गेला.



बिरबलला म्हणाला, ''माझी अडचण तुम्हीच सोडवू शकता.''

''बोल. काय अडचण आहे?'' बिरबलने विचारले.

गंगाराम हळू म्हणाला, ''बिरबल, माझ्याजवळ शिक्षण नाही, पैसा नाही.''

''मग नोकरीसाठी आलास का?'' बिरबलने विचारले.

गंगाराम म्हणाला, ''नाही,नाही. मला पैसा-नोकरी काही नको. एकच इच्छा आहे. माझ्या वडील-आजोबांसारखं लोकांनी मलाही पंडितजी म्हणावं. हे सोपं नाही मला माहितेय. बिरबल, तुम्हाला काय कठीण आहे? काहीतरी कराच.''

बिरबल हसत म्हणाला, ''एवढंच? हे फारच सोपं आहे. दोन-तीन दिवसांत हे काम करून दाखवतो. फक्त माझं ऐकायचं.''

गंगाराम खुषीत म्हणाला, ''तुम्ही सांगाल तसंच करीन.''

बिरबल त्याला समजावत म्हणाला, ''हे बघ, मोठी माणसं तुला 'पंडितजी' म्हणतील तेव्हा खूप रागावल्याचं नाटक कर.'' गंगारामला काहीच कळेना.

बिरबल म्हणाला, ''तुझ्या घराचा पत्ता सांग. मी सांगितलं ते लक्षात ठेव. समजलं?''

गंगाराम मान डोलवत घरी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच बिरबल गंगारामच्या शेजारच्या गल्लीत गेला. तिथे काही मुलं खेळत होती.

बिरबलाने मुलांना विचारले, ''काय रे, तुम्हाला गंगाराम माहितेय का?''

मुलं एकदम ओरडली, ''हो हो माहितेय. सारखे आमच्यावर ते ओरडत असतात.''

बिरबल हसत म्हणाला, ''असं? मग मी सांगतो ते करून बघा. गंगाराम दिसले रे दिसले की लगेच त्यांना 'पंडितजी' म्हणून हाका मारा.''

झालं. मुलांना मजाच झाली.

तेव्हापासून पंडितजी, पंडितजी म्हणत मुलं मागेच धावायची. बिरबलने सांगितले म्हणून गंगाराम काठी घेऊन त्यांच्या अंगावर धावायचा. चिडल्याचं नाटक करायचा. लहान-मोठे सगळयांनाच यात मजा वाटायला लागली.

हा प्रकार बरेच दिवस चालला. मग मुलं कंटाळली.

पण गंगारामला आता 'पंडितजी' म्हणूनच सगळे बोलवायला लागले.

काही दिवसांनी बिरबल त्या गल्लीत आला. मुलांना त्याने सहज विचारले, ''गंगाराम कुठे राहतात?'' मुले म्हणाली, ''म्हणजे तुम्हाला पंडितजींकडे जायचंय?''

बिरबल गालातल्या गालात हसला.

**अनु.माया वळामे**


## 'मेहता पब्लिशिंग हाऊस' ची अभिनव योजना




**धूमधडक योजना**

लहान मुलांची १० पुस्तकं खरेदी करा

अधिक

फक्त ६०/- रुपये भरून

''मेहता मराठी ग्रंथ जगत'' चे

एक वर्षाचे वर्गणीदार व्हा !

# चित्र रंगवा



## सुविचार

आनंदाचं एक दार बंद होतं
त्याचवेळी कुठंतरी दुसरं दार उघडलेलं असतं.

# जुलै दिनविशेष



२ जुलै - संत नामदंव पुण्यतिथी

५ जुलै - आझाद हिंद सेनेची स्थापना (१९४३)

८ जुलै - स्वा. सावरकरांची सागरात उडी (१९१०)

११ जुलै - विश्व लोकसंख्या दिन

१४ जुलै - समाजसुधारक आगरकर जयंती (१८५६)

१८ जुलै - गुरुपौर्णिमा

१८ जुलै - अण्णा भाऊ साठे जयंती

२१ जुलै - मानवाचे चंद्रावर पहिले पाऊल (१९६७)


२३ जुलै - लो. टिळक जयंती (१८५६)

२५ जुलै - वनसंवर्धन दिन

२८ जुलै - पहिले महायुद्ध सुरू (१९१४)

# जगातील सर्वांत प्राचीन शहर

'बॅबिलॉन' हे जगातील सर्वांत मोठे प्राचीन शहर मानले जाते. ते 'बॅबिलोनिया' या प्रदेशाची राजधानी होते. 'बॅबिलॉन'चा अर्थ आहे 'देवांचे दार'. ते मेसोपोटेमियाच्या सुपीक प्रदेशात टायग्रेस आणि युफ्राटिस नद्यांच्या मध्ये वसलेले होते.




'बॅबिलॉन' या प्राचीन शहराचा नकाशा

आत्ताच्या काळात ती जागा इराकमध्ये, बगदादच्या दक्षिणेला नव्वद किलोमीटरवर दाखवता येते. आता तो सर्वच प्रदेश ओसाड आणि पडझड झालेला आहे.

हम्मुराबी हा बॅबिलॉनचा सर्वात प्रसिद्ध राजा. १९७२ पासून त्याने सिंहासन भूषविले असे मानले जाते. हम्मुराबी आणि त्याचा मुलगा साम्सुइलुना यांच्या काळात बॅबिलॉनने जास्तीत जास्त प्रगती केली. सांस्कृतिक भरभराटीचा उच्चांक याच काळात गाठला गेला आणि राजकीय सत्ताही प्रभावी राहिली.



**सिंहासनावर बसलेला राजा हम्मुराबी**

जगातील सात आश्चर्यांपैकी 'हँगिंग गार्डन्स' हे याच काळातले. आपल्या राणीचे मन रिझवण्यासाठी राजाने ही बाग तयार केली.

जगातले पहिले पायदळ सैन्य हम्मुराब्बीने उभारले होते. शत्रू राज्यांवर एकामागून एक हल्ले करून त्याने सर्व प्रदेश जिंकून घेतला आणि कालांतराने तो संपूर्ण मेसोपोटेमियाचा राजा बनला.



'कोड ऑफ हम्मुराबी'चा सापडलेला शिलालेख

हम्मुराबीने तयार केलेले कायदे प्रसिद्ध आहेत. ते 'कोड ऑफ हम्मुराबी' म्हणून ओळखले जातात. आपल्याला माहीत

असलेली ती सर्वांत प्राचीन कायद्याची नियमावली आहे.

कोड ऑफ हम्मुराबी - सन १९०१ मध्ये पुरातत्त्व शास्त्रज्ञांची एक फ्रेंच तुकडी इराकमधील 'सूसा' या ठिकाणी गेली होती. त्यांना खोदकामात या नियमावलीची एक प्रत सापडली. डायोराइटच्या एका काळया मोठ्या दगडी ठोकळयावर ती कोरलेली होती. हा आठ फूट उंचीचा ठोकळा तीन तुकड्यांत विभागला गेला होता. तो परत जोडण्यात आला. आता हा ठोकळा पॅरिसमधल्या लूव्र म्युझियम मध्ये पहायला मिळतो.


**अनु.रश्मी खानवेलकर**




**बॅबिलॉन शहराचे कल्पनाचित्र**

# विज्ञान नवलाई

**डॉ. बाळ फोंडके**










रॉकेट, यान यांचं अंतराळातलं भ्रमण होतं कसं? पृथ्वीच्या आतबाहेर नक्की काय आहे? जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे? पशू-पक्षी आले कुठून? कसे? आणि जगतात कसे? प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का? सुरुवातीला आपण माणसं कुठून आलो? कसे होतो? त्यावेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते?


हो! हो! हो!

या सगळया प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतील एकाच खजिन्यात!




**६ विषयांचं वैविध्य असणारा आगळा वेगळा संच!**

**पोस्टेज खर्च वेगळा**

**किंमत प्रत्येकी ३० रु.**

# ओळखा पाहू

संपूर्ण विश्वाला आपल्या सुरांनी मोहिनी घालणारे सुप्रसिद्ध वादक कोण? आणि त्यांचे वाद्य कोणते?



विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

जून अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

**प्रख्यात गीतकार - ग. दि. माडगूळकर**

स्पर्धेचे विजेते - **कु.अश्लेषा देशमुख, अमरावती.**

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक -**

कु. अवंतिका संगई - अमरावती, व्यंकटेश माणेकरी - सोलापूर, अरुंधती यादव, चिन्मय कुलकर्णी - सांगली, शामल पराडकर - रत्नागिरी, अशोक सोनवणे - जळगाव, सुरेश म्हात्रे - मुंबई, राघव चोपकर - नागपूर, अनुजा कदम - सातारा, धरणकर दशरथ - नाशिक, ज्योती उपाध्ये, माधवी काळे, राजश्री पायगुडे, वि. आ. आठवले - पुणे, द. ज. सोमठाणकर - कल्याण, भा. ना. गोठोस्कर - सिंधुदुर्ग, ललिता खैरनार - नंदूरबार, शरद मराठे - डोंबिवली.

**प्रायोजक**

**श्री राजू जगदीशचंद्र मेहता, मे.हिराचंद नानचंद अँड कंपनी,**
**(साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी.)**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीचे नूतनीकरण करा.

एक वर्षाची वर्गणी
१५० रु.

तीन वर्षांची वर्गणी
३५० रु.


पाच वर्षांची वर्गणी
५०० रु.

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**



**३ वर्षांची वर्गणी पाठविल्यास 'वपु ८५' वपु काळे हे ६०रु.चे पुस्तक भेट! पोस्टेज २०रु.**

**५ वर्षांची वर्गणी पाठविल्यास 'सुवर्णमुद्रा' शान्ता ज. शेळके हे ८०रु.चे पुस्तक भेट! पोस्टेज २०रु.**



**भेट पुस्तके - प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L-2/RNP/PNW/M/38/2006-2008 / L.NO.LWP-50/
Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 July 2008.

**बालमित्रांसाठी स्पर्धा**



# माझे आवडते शिक्षक/ माझा जिवलग मित्र



## पत्र लिहा, बक्षीस मिळवा

बालमित्रांनो,

तुम्ही ७ वी ते १० वी च्या वर्गात शिकत असाल तर तुमच्यासाठी ही स्पर्धा.

तुम्हाला शाळेत बराच वेळ घालवावा लागतो. शिक्षक, इतर विद्यार्थी यांच्या सहवासात राहावे लागते.

तुमच्या शाळेतील एखादे शिक्षक वा एखादा विद्यार्थी तुम्हाला सर्वात जास्त प्रभावशाली वाटत असेल, आवडत असेल तर त्याच्याबद्दल तुम्ही आम्हाला पत्राने कळवा.

ते का आवडतात ते पत्रात लिहा.

उंच फुलस्केपच्या वहीच्या दोन कागदांवर बसेल इतपत पत्र असावे. त्यापेक्षा मोठे नको.

ज्यांची पत्रे आम्हाला आवडतील ती आम्ही दिवाळी अंकात छापू. तुमच्या फोटोसह. शिवाय प्रत्येकी ३००/- रुपयांची पुस्तकेही बक्षीस म्हणून पाठवू.

पत्र पाठविण्याची शेवटची तारीख - १ ऑगस्ट २००८

**आमचा पत्ता: मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

**१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,**
**टेलिफोनभवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४.**

प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३०. येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : प्रेसोग्राफ, ५२६, नारायण पेठ, पुणे ३०.